Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



सुधारकाचार्य आगरकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ओ३म्
पुस्तक संख्या 8324/83
पञ्जिका संख्या 26262
पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है। कोई सज्जन पन्द्रह दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

२६८६८

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४३५
४३
२६८६८

गुरुकुल ... कांगड़ी

स्टाक प्रमाणीकरण १९८४-१९८५

CHECKED 1973

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुधारकाचार्य

प्रिं. गो. ग. आगरकर

लेखक :

दामोदर नरहर शिखरे
एम्. ए.

किंमत दीड रुपया

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुद्रक व प्रकाशक :
दा. त्र्यं. जोशी, बी. ए. (टिळक),
मॅनेजर, चित्रशाळा प्रेस,
१०२६, सदाशिव पेठ, पुणें नं. २.

प्रथमावृत्ति :
१९५०.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कृतज्ञता

प्रथम मला आभार मानले पाहिजेत ते मुंबई विद्यापीठाचे. त्याच्या रजिस्ट्रारनीं अवघ्या आठ दिवसांत उत्तर पाठविलें आणि आगरकर बी. ए. व एम्. ए. कोणत्या विषयांत किती गुणांनीं उत्तीर्ण झाले ही माहिती शोधून मला कळविली. जन्म-तारीख त्यांच्या दप्तरींच नाहीं. १९१३ पूर्वींच्या जन्म-तारखांचें दप्तर विद्यापीठानें ठेवलेलें नाहीं.

विद्यापीठानें नाहीं, पण प्राथमिक विद्यालयानें तरी तें ठेवलें असेल म्हणावें, तर तेथेंहि नन्नाचाच पाढा. खुद्द कऱ्हाड येथेंच रहाणारे आमदार श्री. पु. पां. ऊर्फ बाबूराव गोखले यांच्या चौकसबुद्धीलाहि आगरकरांच्या जन्म-तारखेचा पत्ता लागला नाहीं. ‘ गोपाळ गणेश आगरकर हे ८ व्या वर्षी म्हणजे १७ नोव्हेंबर १८६४ रोजीं कऱ्हाड शाळा नं. १ मध्यें दाखल झाले ’ एवढाच इतिहास संशोधनानंतर त्यांना उपलब्ध झाला! त्या वेळीं विद्यार्थ्यांच्या वयाचें वर्ष नोंदवीत, जन्माची तारीख नव्हे. आगरकरांच्या वंशजाकडे केलेल्या शोधांतूनहि जन्म-तारीख निघूं शकली नाहीं.

इतिहासाच्या साधनांचा अपुरेपणा मला आणखी जाणवला तो आगरकरांच्या भावंडांचे बाबतींत. प्रा. आळतेकरप्रभृतींच्या चरित्र-ग्रंथांत गोपाळराव आगरकरांच्या मातु:श्रीला पांच मुलें झाल्याचा उल्लेख आहे. पण श्री. बाबूराव गोखले यांच्या पुस्तकांत सात मुलें झाल्याचें लिहिलें आहे. समक्ष चर्चेंतहि त्यांनीं ही संख्या ठासून सांगितली. पण खुद्द गोपाळरावांच्या सहधर्मचारिणीनें ‘ स्त्री ’ मासिकांतील आपल्या मुलाखतींत सरस्वतीबाईंना अकरा मुलें झाल्याचा इतिहास कथन केला आहे! जवळच्या काळांतील उघड घटनेंतील सत्यहि इतकें दुरापास्त आहे!!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आगरकरांच्या शिकवणीची निर्विवाद गरज आतांच आपल्याला आहे. स्वातंत्र्याच्या प्राप्तीमुळें 'आधीं राजकीय कीं सामाजिक?' हा वाद इतिहासजमा झाला आहे. स्वतंत्र भारतांतील सामाजिक व्यवस्था न्यायाची, समतेची, स्वतंत्रतेची व बंधुतेची राहील अशी प्रतिज्ञा आपल्या नव्या राज्य-घटनेनें जगजाहीर केलेली आहे. या गुणांची पेरणी वाचकांच्या मनोभूमिकेंत करण्यास आगरकरांच्या लेखाइतकें दुसरें अमोघ साधन मराठींत सांपडणें कठीण.

अशा योग्य वेळीं आगरकरांचें चरित्र लिहिण्याची संधि चित्रशाळेनें मला आणून दिली म्हणून मी त्यांचा आभारी आहें.

'महात्मा' मासिक कार्यालय,
नातूबाग, पुणें २.
ता. ५ जून १९५०

दा. न. शिखरे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सत्यनिष्ठ भूमिका

पुण्यांतील फर्ग्यूसन कॉलेजचे प्रिन्सिपल–शिक्षणाचे एम्. ए.चें शिखर गांठलेले ! कसें गांठलें त्यांनीं तें शिखर ? हिमालयाच्या शिखरावर चढण्याचे मार्ग भिन्नभिन्न असतात. कोणी विमानानें एकदम उड्डाण करतात–त्यांना ना विघ्नें ना विलंब. आगगाडी, मोटारगाडींचा आश्रय कोणी करतात. बैलगाडींतूनहि हिमालयास जाणारे यात्रेकरू आढळतात, आणि पायीं जाणारे, किंबहुना रस्त्यावरून दंडवत घालीत घालीत हिमालय-यात्रा पार पाडणारे भाविकहि असतात. आणि त्याच यात्रेचें पुण्य सर्वांत जास्त अशी त्यांची श्रद्धा ! या शेवटच्या कष्टाच्या व विलंबाच्या मार्गानें प्रिं. गोपाळराव आगरकर यांना विद्यार्जन करावें लागलें. नगरपालिकेच्या दिव्याखालीं बसून अभ्यास केल्याचे दाखले कित्येक महाभागांनीं महाराष्ट्रा-पुढें ठेवलेले आहेतच; पण आगरकरांची विद्या–साधनेची ऊर्मि विलक्षण व तपस्याहि खडतरच.

एकच हिमालय पर्वत ! त्याच्यापासूनच सिंधु व ब्रह्मपुत्रा या दोन मोठ्या नद्या निघतात, लांबवर वहात जातात, विस्तीर्ण भूमि 'सुजला–सुफला' बनवितात, पण एकमेकींच्या अगदीं विरुद्ध दिशांना जाऊन. एकाच महाराष्ट्रभूमीच्या कुशींत एकाच वर्षी जन्मास आलेले टिळक व आगरकर एकाच देशप्रेमानें प्रेरित होऊन आपल्या त्यागानें, धैर्यानें व सेवेनें, महाराष्ट्रांतील किंबहुना अखिल भारतांतील जनतेला सज्ञान व निर्भय करण्यासाठीं आमरण झटले, पण त्यासाठीं दोघांनीं आपली वाणी व लेखणी हीं तिखट शस्त्रें परस्परविरोधी पद्धतीनें चालविलीं. राजकीय स्वातंत्र्याचा पुरस्कार लो. टिळकांनीं जितक्या तीव्रतेनें केला, तसाच प्रिं. आगरकरांनीं सामाजिक स्वातंत्र्याचा केला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपलें भाग्य असें कीं, राजकीय स्वातंत्र्य आपल्या पदरांत आतां पूर्णपणें पडलें आहे आणि सामाजिक स्वातंत्र्यहि आपण बरेंचसें हस्तगत केलें आहे. या दोन्ही स्वातंत्र्यांचा प्रचार व आचार तीस पस्तीस वर्षें अहोरात्र करणारे म. गांधी म्हणजे टिळक-आगरकरांचे महानद आपल्या पोटांत सामावणारे हिंदी महासागरच नव्हेत काय ?

योगायोग असा कीं, टिळक–आगरकरांचा जन्म एकाच वर्षी झालेला; एकाच डेक्कन कॉलेजांत दोघांनीं देशसेवेचा निश्चय केलेला; दोघांनींहि न्यू इंग्लिश स्कूल स्थापण्यासाठीं जिवापाड श्रम केले; दोघांनींहि फर्ग्यूसन कॉलेज-मध्यें अध्यापनाचें काम केलें; ‘ केसरी ’ पराक्रमी करण्यासाठीं दोघांनींहि सारखाच घाम गाळला; त्यापायीं तुरुंगवास वांट्यास आला, तर दोघांनीं त्याचा सहभोग एकत्रच घेतला; दोघांचीहि राहणी साधी, वृत्ति परोपकारी व लेखणी तिखट. पण एकाचा भर आधीं परिस्थितींत क्रांति करण्यावर, तर दुसऱ्याचा मनःस्थितींत क्रांति करण्यावर. स्थितिक्रांति झाली कीं मनःक्रांति होते, का मनःक्रांति झाल्यावर स्थितिक्रांति होते ? हा वाद अद्याप सुटलेला नाहीं. दोन्ही परस्परांना पूरक आहेत अशा गुळगुळीत समारोपानें कोणाचें समाधान होईल ? गरिबी गेली कीं गुन्हेगारीहि गाडली जाईल असें म्हणावें तर श्रीमंतांच्या गुन्हेगारीलाच ऊत आलेला दिसत आहे. उलट, लक्ष्मीच्या नूपुरांचा ध्वनि कानीं पडला, तरी आपली समाजसेवेची तपश्चर्या खंडित न करणारे आगरकरासारखे मानधन काय थोडे आहेत ? भिल्लिणीच्या नृत्यापुढें भगवान् शंकरहि चळले आणि मेनकेच्या नृत्यानें तर विश्वामित्राच्या तपाची राख करून सोडली. पण त्या दोहींपेक्षां अधिक मादक व मोहक असणाऱ्या लक्ष्मी व सत्ता यांच्या नृत्याकडे डोळे किलकिले करूनहि न पाहणारे आगरकर हे केवढे योगी म्हणावे ! यासंबंधीं आगरकरांना काय वाटत असेल याची कल्पना त्यांच्या एका वाक्यावरून करतां येण्यासारखी आहे. ते लिहितात:—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" बुद्धिमंदिरांत सत्याचा दीप प्रकाशित झाल्याबरोबर वृत्ति आनंदमय होऊन एका प्रकारें ज्यांचें देहावसान सुटतें असा एकादा महात्माच आईबापांची, गणगोतांची, धनद्रव्याची, जातीची, देशाची किंबहुना सर्व मनुष्यतेची पर्वा न ठेवतां, अंतरोत्थित अमर्याद प्रेरणाबलाच्या भरंवशावर हवें तेवढें महत्कृत्य हातीं घेऊन तें तडीला नेतो. "

स्वतःच्या जीवनाचा हा आरसाच आगरकरांनीं बनविला आहे काय ? 'सत्याचा दीप' हाच त्यांच्या जीवनाचा मार्गदर्शक होता. सत्यापासून निघणारी निर्भयता त्यांचे अंगीं पुरेपूर होती. अंतर्बाह्य आपत्तींचा वर्षाव होत असतांहि त्यांची वृत्ति विनोदी व 'आनंदमय' राहिली याचें कारण ही अचल सत्यनिष्ठाच ! त्यांचें "अंतरोत्थित प्रेरणाबल" अमर्याद होतें आणि त्याच्या–व केवळ त्याच्याच भरंवशावर–त्यांनीं महत्कृत्यें तडीस नेलीं म्हणून ते त्यांच्याच व्याख्येप्रमाणें "महात्मा" ठरतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुक्रमणिका

प्रकरण	पृष्ठ
१ गरिबीवर पहिला विजय	१
२ शिक्षणाचें शिखर गांठलें !	८
३ दोन गंडांतरें	२१
४ मतभेदाचे अंकुर	४३
५ सुधारकाची शिकवण	५८
६ कलहाचे कांटे	८१
७ जीवनाची सिद्धि	९९
८ स्वभावाचे पैलू	११२
९ मोठेपणाचें मोजमाप	१२४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गरिबीवर पहिला विजय : : १

साऱ्या महाराष्ट्राचें काळीज म्हणजे सातारा जिल्हा. श्रीसमर्थांनीं त्याला 'आनंदवनभुवन' म्हणून गौरविलें तें काय उगीच ? त्या साताऱ्याची रक्त-वाहिनी म्हणजे कृष्णा नदी. तिला कोयना नदी कऱ्हाड येथें भेटते. आणि ती कशी ? तर अगदीं सख्ख्या प्रेमळ बहिणींनीं, समोरासमोर येऊन, गळ्यांत गळा घालून आलिंगन द्यावें त्याप्रमाणें. म्हणूनच कऱ्हाडच्या कृष्णा–कोयना संगमाला "प्रीति–संगम" म्हणतात. कऱ्हाडपासून तीन-चार मैलांवरच एक लहानसें खेडें आहे. त्याचें नांव टेंभू. आतां तेथें पन्नास साठ उंबरठा असेल. त्या गांवांत आगरकरांचा जन्म १८५६ सालीं झाला. कोणत्या महिन्यांत, कितव्या तारखेस याचा कांहीं पत्ता लागत नाहीं. अवघ्या एका शतकामागच्या इतिहासाबद्दलहि आपली ही आस्था ! कोंकणांत आगरी नांवाचें गांव आहे. तेथले रहाणारे म्हणून आगरकर. हे कोंकणस्थ ब्राह्मण. कऱ्हाडजवळील टेंभू येथें राहावयास गेले.

गोपाळरावांच्या पणजोबांनीं टेंभू गांवीं लक्ष्मीनारायणाचें एक सुंदर मंदिर बांधलें आणि त्याला सालिना ७५ रुपयांचें उत्पन्न लावून दिलें. पणजोबांनींच बांधलेला उंच तटबंदी असलेला वाडाहि मोठा प्रशस्त होता. या दोन्ही इमारतींचा चिरान् चिरा आतां काढला गेलेला आहे. गोपाळरावांच्या वेळेलाच त्यांच्या घराण्याच्या वैभवाला उतरती कळा लागली होती. त्यांच्या घरांतून लक्ष्मीनें पाय काढला, पण सरस्वतीनें पाय ठेवला. त्यांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आईचें नांव सरस्वती हेंच होतें. त्या कऱ्हाडच्याच. जुन्या काळच्या बायकांप्रमाणें त्या बहुश्रुत होत्या व पद्यरचनाहि करणाऱ्या होत्या. एका पद्यांत त्यांनीं कऱ्हाडच्या कृष्णाबाईचें स्तवन केलें आहे.

रत्नखचित सिंहासन, दशभुजांवरि ध्यान।
पायीं साखळ्या पैंजण, शुक्रवारीं हो पूजन॥

इत्यादि वर्णन एखाद्या अलंकारसंपन्न महाराज्ञीला शोभेसें आहे. त्यांची भक्ति अशी त्यागमय कीं, लक्ष्मीनारायणाचें मंदिर दुरुस्त करण्यासाठीं त्यांनीं, घरीं अठराविश्वे दारिद्य असतांहि, आपल्या हातांतील सात तोळ्यांच्या पाटल्या काढून दिल्या. त्यांचे यजमान गणेशराव–किंवा गणूआप्पा. ते पुराणकीर्तनें करण्यापलीकडे फारसा कांहीं उद्योग करीत नसत. या दांपत्याला एकूण सात मुलें झालीं. त्यापैकीं गोपाळराव हे कनिष्ठ चिरंजीव. त्यांच्या तीन बहिणी लग्न होण्यापूर्वीं लहानपणींच वारल्या.

गोपाळरावांचें आजोळ म्हणजे कऱ्हाड येथील भागवतांचें घराणें. तेथेंच त्यांचें बाल्य सरलें आणि शिक्षण सुरू झालें. दत्तूमामाबरोबर गोपाळचा अभ्यास चालू झाला. बाराव्या वर्षी त्यांनीं इंग्रजी तीन इयत्ता पुऱ्या केल्या. शिक्षणमंदिराच्या या पहिल्या तीन पायऱ्या चढतांनाहि त्यांची किती दमछाट झाली! गोपाळची बुद्धि तरतरीत व हजरजबाबी. शिक्षकांचें त्याच्यावर मोठें प्रेम. शाळेंतील अभ्यास संभाळून त्यानें आपल्या बुद्धीची चमक शाळेबाहेरहि दाखविली. कऱ्हाडचे मुनसफ रावसाहेब नागपूरकर दर रविवारीं निबंधाची स्पर्धा लावीत. त्यांत गोपाळ बक्षिसें कमावी. स्वावलंबनानें शिक्षण करण्याचा श्रीगणेशाच गोपाळनें कऱ्हाड येथें गिरविला. त्याच्या विद्यार्जनाची नौका पुढें पुढें चालली होती, ती केवळ स्वतःच्या बाहूंचे बळानें तो वल्हीं मारीत राहिल्यामुळें. प्रवाह उलटा, वारा विरुद्ध, कोठें धार तर कोठें भोंवरे, खडक व मगर पाण्यांत दडलेले, विसाव्यासाठीं एखाद्या झाडाला नाव बांधूं पाहावें, तर तें झाडच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उन्मळावें—अशा अंतर्बाह्य अडचणींतून गोपाळनें आपलें विद्यार्जन चालविलें होतें. डोंगरावर चढणें, संगमांत डुंबणें, वाळवंटांत हुतूतू खेळणें वगैरे बाल्यांतील सहज खूडपणामुळें त्याचें शरीर–संवर्धनहि आपोआप होतच होतें.

तेरावें वर्ष म्हणजे किती कोवळें वय! त्यांत विद्येची चटक लागलेली. बुद्धि तीव्र त्यामुळें गुरुजनांचें प्रेम. एकाहून एक परीक्षा देऊन आपण पदवीधर बनूं, विद्वान होऊं, वाहवा मिळवूं, पैसा कमावूं—अशा आकांक्षांचे पतंग गोपाळनें किती तरी उडविले असतील! आपल्या बुद्धिमत्तेची दोरी चिवट व टणक असल्यामुळें आपला पतंग आकाशांत उंच उंच जाईल अशी त्यांना किती आशा वाटली असेल! पण दारिद्र्याचा वारा म्हणजे सोसाट्याचा! त्यानें तो पतंग फाटून–तुटून गिरक्या खात खात जमिनीवर येऊन आदळला! इंग्रजी तिसरी इयत्ता हीच गोपाळच्या शिक्षणाची सरहद्द ठरली. तेरावे वर्षी, तीन इयत्तांच्या ज्ञानावर, गोपाळला मुनसफ कचेरींत उमेदवारी पतकरावी लागली. त्याच्या शिक्षणाची हत्या झाली! वरून शांत दिसणाऱ्या समाजांत नकळत हिंसा किती तरी प्रकारांनीं चाललेली असते. ही बौद्धिक उपासमार म्हणजे समाजाची हानिच नव्हे काय? गोपाळची बुद्धि तर इतकी तेजस्वी होती कीं, मुनसफाकडून त्याला निबंधाबद्दल दोन रुपये बक्षीस मिळालें, तेव्हां तेथील मामलेदारानें शंका घेतली, "हे निबंध मुलें दुसऱ्याकडून लिहवून घेत नसतील कशावरून?" त्यावर गोपाळनें आत्मविश्वासपूर्वक उत्तर दिलें, "आत्तांच्या आत्तां तुम्हीं विषय द्या, त्यावर मी येथल्या येथें निबंध लिहून दाखवितों."

अशा तीव्र व तेजस्वी बुद्धीला गवसणी घालून गोपाळला मुनसफ कचेरींत नोकरी पतकरावी लागली. पण पृथ्वीच्या पोटांत रटरटा शिजणारे तप्त रस पृथ्वीचें कठीण कवच फोडूनहि ज्वालामुखींतून बाहेर पडतातच ना? गोपाळच्या मनांतील विद्याप्रेमहि नोकरीच्या दडपणाखालीं फार वेळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दबून राहिलें नाहीं. महत्त्वाकांक्षा त्याला पुढें ढकलीत होती पण गरिबी त्याचे पाय मागें ओढीत होती. " आपला सारा जन्म असाच अज्ञानांत व कारकुनींत जाणार काय? " अशी शंका त्याचें चित्त पोखरीत होती. मामा तर यापुढें आधार देऊं शकत नव्हते आणि नोकरींत त्याचें मन कधीं रमत नव्हतें. आपल्यापेक्षां बुद्धीनें उणी पण लक्ष्मीची लाडकीं अशीं कैक मुलें विद्यामंदिराच्या एक एक पायऱ्या चढत जाणार आणि आपण मात्र अस्पृश्यांप्रमाणें त्या मंदिराच्या बाहेर बसून नुसतें कळसाचें दर्शन घेत राहणार—असे कोणते आणि किती विचार गोपाळच्या बालमनांत वावटळीसारखे भिरभिरत असतील हें कोण सांगूं शकेल? आट्यापाट्या-च्या खेळांतील कोंडी कशी फोडावी हें त्याला ठाऊक होतें, पण ही आर्थिक कोंडी कशी फोडतां येईल याचा उलगडा त्याच्या बाल बुद्धीला होईना. थकला-भागलेला व भुकेलेला एखादा मुशाफीर जसा निवाऱ्याचें ठिकाण शोधण्यासाठीं दूरवर नजर टाकतो, तसा बारकाईचा शोध गोपाळच्या महत्त्वाकांक्षी मनानें सुरू केला. त्याच्या दुर्बिणींत रत्नागिरी शहर आलें. तेथें एक हायस्कूलहि दिसूं लागलें. तेथील एक डेप्युटी एज्यु-केशनल इन्स्पेक्टर त्याच्या शोधक बुद्धीला दिसूं लागले. त्यांचें नांव वामन-राव आगरकर. गोपाळचे ते सख्खे चुलते. " बस्स, आपलें काम झालें " असें गोपाळला वाटलें. आपलें शिक्षण आपले काका खास पुढें चालवितील असा विश्वास त्याच्या चित्ताला वाटला. वाळवंटांतून रखडणाऱ्या वाट-सरूला स्वच्छ सरोवरच आढळलें.

पण कऱ्हाडहून रत्नागिरीस जावयाचें कसें? हा पल्ला तरी थोडथोडका आहे काय? पुरें १५० मैल! ना आगगाडी ना मोटारगाडी! दुसऱ्या वाहनांतून जाण्यास जवळ ना अडका ना पैसा. पण कोलंबसाला अमेरिका दिसली होती. आतां तो तिच्या पृष्ठभागावर पाय ठेवल्याशिवाय कसा राहील? गोपाळनें पायीं जाण्याचा निश्चय केला. १५० मैलांचा प्रवास—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांत तो अंत्रा घाट—ती किर्र झाडी—अधून मधून निर्जन प्रदेश आणि वय पाहिलें तर अवघें १३ वें. काशीला रामशास्त्र्यानें बालपणांत विद्यार्जनासाठीं जावें तसेंच हें धाडस! या धाडसाचें, या विद्याप्रेमाचें कौतुक कोण करणार? कऱ्हाडचे विद्याप्रेमी मुनसफ रावसाहेब नागपूरकर यांनीं ७५ रुपयांची शिदोरी या बटूचे हातीं ठेवली. पण चुलत्यानें त्याच्या या धाडसी विद्याप्रेमाचें चीज निराळ्याच रीतीनें केलें. त्यांनीं गोपाळच्या हातावर वाटाण्याच्या अक्षता ठेवल्या. आजवर कैक पाणीदार मुलें गरिबीचें गांठोडें पाठीशीं बांधून देशावर आलीं. आणि त्यांना येथें विद्यार्जनाची वाट सुलभ रीतीनें सांपडली. पण देशावरून कोंकणांत गेलेल्या या विद्येच्या वारकऱ्याला त्याच्या प्रत्यक्ष चुलत्यानेंहि थारा दिला नाही. पण गोपाळचा निश्चय म्हणजे भीष्म-प्रतिज्ञाच होती. त्यानें रत्नागिरींत वार लावले, लोकांच्या घरीं शागिर्दी केली, आणि अभ्यासास सुरुवात केली. दोन इयत्ता कशाबशा झाल्या. पण नोकरी व अभ्यास दोन्ही जमणें अशक्य झालें. गोपाळचें मन निराशेनें पार करपून गेलें. दारिद्र्य दैत्याला शरणचिठ्ठी देऊन गोपाळ फुटलेल्या अंतःकरणानें कऱ्हाडास परत आला.

आतां गोपाळ कऱ्हाडास काय करणार? शाळेचे दरवाजे त्याला बंद झाले होते. तेव्हां त्यानें एका दवाखान्यांत कंपौंडरची नोकरी पत्करली. त्या वेळीं त्याचें वय पुरतें सोळावेंही नव्हतें. त्यामुळें दवाखान्यांतील प्रेतांची चिरफाड पाहून त्याला शिसारी आली, अन्न नकोसें झालें आणि स्वप्नांत प्रेत नाचूं लागलें. त्यामुळें त्यानें त्या नोकरीला रामराम ठोकला.

गोपाळची ज्ञाननिष्ठा ध्रुवाप्रमाणें अचल होती. त्याला आशेचा एक किरण दिसूं लागला. वऱ्हाडांत अकोला येथें त्याचे थोरले मामा होते. त्यांनीं आपले धाकटे बंधु दत्तोपंत यांना अकोल्यास नेलें. त्यामुळें गोपाळलाहि अकोल्यास जावयास मिळालें. तेथें एका थोर, प्रेमळ व विद्वान् गृहस्थाचें कृपाछत्र गोपाळला लाभलें. हे गृहस्थ म्हणजे रा. ब. विष्णु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोरेश्वर महाजनी. त्यांचें घर गोपाळच्या मामाच्या घराला लागूनच होतें. त्यामुळें घरीं व शाळेंत त्यांची गोपाळवर स्नेहमय व दक्ष दृष्टि होती. १८७२ च्या जून महिन्यांत गोपाळनें अकोलें हायस्कुलांत प्रवेश केला. त्या वेळीं तो कसा दिसत असे याचें हुबेहूब वर्णन या गुरूनेंच केलें आहे. रा. ब. महाजनी लिहितात, "गोपाळरावांचें वय या वेळीं पंधरा सोळा वर्षांचें होतें. अंगयष्टि उंच, सडपातळ व काटक होती. डोळे पाणीदार होते. भाषण ठसक्याचें व आत्मप्रत्ययानें मुसमुसलेलें असें होतें. स्वभाव मनमिळाऊ, लोकांच्या उपयोगी पडणारा असा होता. बुद्धि चपळ व ग्राहक होती. स्मृति मध्यमावर. शब्दापेक्षां अर्थाकडे लक्ष विशेष होतें. अभ्यासावर लक्ष फार. वेळ फुकट दवडावयाचा नाहीं, असा निश्चय." पण दारिद्य हा एकच दोष असा आहे कीं, जो अशा सर्व गुणराशींवर पार बोळा फिरवितो. अकोल्यास राहणें गोपाळला जमेना, तेव्हां त्यानें पुण्यास जाण्याचें ठरविलें. पुणें म्हणजें विद्येचें माहेरघर, उदार पुरुषांचें आगर, अशा थोर अपेक्षेनें गोपाळनें महाराष्ट्राच्या राजधानींत प्रवेश केला. रा. ब. महाजनींनी त्याला कांहीं शिफारसपत्रें दिलीं होतीं. त्यांच्या आधारावर गोपाळनें आपणाला कोठें थारा मिळतो हे पाहिलें. पण गरिबाचा वाली कोण असणार ? आपल्याजवळ पात्र नसेल तर अथांग समुद्राजवळ जाऊनहि; पाण्याशिवाय परतावें लागतें. उभ्या पुणें शहरांत या विद्येच्या वारकऱ्याला कोठें थारा मिळाला नाहीं.

पतित–पावन अससी म्हणुनी आलों तुझिया दारां ।
पतित–पावन नससी म्हणुनी जातों मी माघारा ॥

असेच निराश व करुण सूर काढीत गोपाळनें पुण्यांतून काढता पाय घेतला. पुनः अकोल्याला तो गेला. मामांच्या कलानें राहूं लागला. तीन वर्षें अकोल्याच्या हायस्कुलांत गोपाळनें मन घट्ट करून काढलीं. वर्गांत मुलें ८।१० च. व्हर्नाक्युलर स्कॉलरशिप गोपाळला दोन वर्षें मिळालीं. काव्य,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाटकें व इतिहास हे विषय त्यांचे आवडते. संस्कृत व्याकरणाचा कंटाळा. अशा खडतर तपश्चर्येनंतर १८७५ सालीं, म्हणजे वयाच्या १९ वे वर्षी, गोपाळची मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाली. त्यांच्याबरोबरच जन्मलेले टिळक १८७२ सालींच प्रवेश–परीक्षेतून पार पडले होते; पण गोपाळचें शिक्षण म्हणजे एक संग्राम होता ! दारिद्र्याच्या शत्रूंशीं झटापट करीत, निराशेचे खंदक ओलांडीत, कऱ्हाड–रत्नागिरी–पुणें–अकोलें अशा दूरदूच्या बुरजावर हल्ले चढवीत, कधीं माघार घेत तर कधीं जिवावर उदार होऊन झुंजत, गोपाळानें मॅट्रिकमधील यशाचा गड कष्टानें, धैर्यानें व चिकाटीनें सर केला. ना. गोखल्यांसारख्या कैक बुद्धिमंतांना विद्यार्जनासाठीं गरिबीशीं सामना द्यावा लागला हें खरें, पण आगरकरांच्या मार्गांत कांटेकुटे फारच होते आणि ते दूर सारून त्यांनीं केवळ स्वतःच्या हिंमतीवर शिक्षणाचा दूरवरचा पल्ला गांठला ही त्यांची शहामत खरी !

● ● ●

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिक्षणाचें शिखर गांठलें ! : : २

एका इंग्रज कवयित्रीनें उत्कंठित पण दरिद्री विद्यार्थ्याच्या मनाचें शब्द-चित्र पुढील हृदयस्पर्शी भाषेनें रंगविलें आहे. " पुस्तकाच्या दुकानांत तो विद्यार्थी जातो, तेथील एक पुस्तक उचलतो—उघडतो—वाचूं लागतो. पण दुकानदार त्याच्या अंगावरील फाटके कपडे पाहून म्हणतो, " राजेश्री, पुस्तकं विकत घेणं हें आपलं काम नव्हे; ठेवा तें पुस्तक खालीं." मुलानें, एक उसासा टाकला आणि जड पावलांनीं घरचा रस्ता सुधारला. तेव्हां तो मनांतल्या मनांत पुटपुटला, " मला वाचायलाच येत नसतं तर किती बरं झालं असतं. मग त्या दुकानदार दादाचं पुस्तक घेण्याची मला इच्छाच झाली नसती." एखाद्या उपाशी पण कंगाल बालकाच्या डोळ्यां-पुढें मेवामिठाईचीं ताटें दिसलीं म्हणजे त्याला वाटतें, " कशाला ही खाण्याची इच्छा परमेश्वरानें उत्पन्न केली ! " तसेंच त्या विद्यार्थ्याला वाटलें.

गोपाळरावांचीहि ओढाताण अशीच चालली होती. त्यांनीं हाय-स्कुलांतला अभ्यास संपविला, पण त्यांच्या मागचा दारिद्र्याचा त्रास कांहीं संपला नाहीं. कॉलेजांत शिक्षण घेणें म्हणजे गुलाबाच्या शय्येवरून लोळत जाणें असा सुखद अनुभव त्यांच्या वेळीं बऱ्याच विद्यार्थ्यांना येत असे. पण गोपाळराव मॅट्रिक झाले तरी आर्थिक अडचण त्यांच्यापुढें 'आ' वासून उभी होतीच ! मामांच्या मदतीला मर्यादा होती आणि तशीच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाजनांच्या ममतेलाहि. त्यांच्या बरोबरीचे दत्तूमामा आदले वर्षींच मॅट्रिक झाले व पुण्यास डेक्कन कॉलेजांत दाखल झाले. २०।२५ रुपये इतका खर्च त्यांना येई. एवढा भार सोसल्यावर थोरले मामा गोपाळरावांच्या कॉलेज-खर्चाचें दुसरें ओझें कसें घेणार ? इतर आप्तांनीं त्यांना एकच मदत दिली. ती म्हणजे " कॉलेजचा नाद सोडा " अशी सल्ला. पण विद्यानंदाचा पहिला गोड घास घेतल्यावर व स्वावलंबनाचा यशस्वी प्रत्यय आल्यानंतर गोपाळराव असला थंड वेदान्त कसा ऐकतील ? त्यांच्या जुन्या क्लेशांना यशामुळें नवा उजळा मिळाला. हाताला बोचलेले कांटे ते विसरले आणि हातांत राहिलेले गुलाब तेवढे त्यांना दिसूं लागले. नवी हिंमत, नवी चिकाटी, नवी सहिष्णुता, या सैनिकांनिशीं गोपाळरावांनीं विद्यार्जनाची दुसरी मोहीम काढण्याचें ठरविलें. आतां त्यांच्या गुणांचा थोडाफार विकासहि झाला होता. त्यामुळें मुनसफाच्या कचेरींत किंवा डॉक्टरांच्या दवाखान्यांत निव्वळ हमाली करण्याचें त्यांच्या कपाळीं यापुढें आलें नाहीं. अकोला येथील 'वऱ्हाड समाचार' या वर्तमानपत्रानें त्यांना लेखनाबद्दल मोबदला देण्याचें कबूल केलें. त्या वेळीं आणि तशा पत्रानें त्यांना मासिक पांच रुपये देण्याचें ठरविलें; हें खरोखर अभिनंदनीय धाडस होय. आजमितीलाही कागदछपाईपायीं महिना हजारों रुपये खर्चणारीं मराठी नियतकालिकें लेखकाला मात्र 'रिक्तोऽसि यज्जलद सैव तवोत्तमा श्रीः' या सुभाषिताचाच तेवढा अहेर करतात, फार तर संशोधनपर निबंधाला तीनचार रुपयांचा लांबरुंद चेक फाडून देतात, या पार्श्वभूमीवर 'वऱ्हाड समाचार' कर्त्यांचें औदार्य फारच खुलून दिसतें ! सहा महिने ही रसद गोपाळरावांना मिळत गेली. डेक्कन कॉलेजांतील 'ज्यूनिअर स्कॉलर्शिप' हि त्यांना मिळाली. पण तेवढ्यानें सारा खर्च कसा भागणार ?

वाणी व लेखणी शक्य तेथें त्यांनीं शिणविली. 'एकत्र हिंदुकुटुंब-पद्धति' या विषयावर डेक्कन कॉलेजनें निबंध मागविले होते; त्यांत गोपाळरावांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बक्षीस पटकावलें. तसेंच पुण्यांतील एका वक्तृत्व–समारंभांतहि भाषण करून त्यांनीं ५० रु. कमावले. गुं. महाजनी प्रभृतींनीं साठ रुपयांची शिदोरी त्यांचे हवालीं केली होती. पण कॉलेजची फी सुमारें १० रु. व इतर खर्च १५ रु. महिन्याच्या महिन्याला कोठून मिळणार? त्यांत परीक्षा आली; तिची फी कोठून देणार? काटकसर करण्यास जागाच नव्हती. रेषेला रुंदीच नाहीं, तर ती कमी कशी करणार? एकच सदरा! गोपाळराव तो रात्रीं धूत व वाळत टाकीत. रजनी व वारा त्यांची सेवा करीत आणि तो सदरा सकाळीं झक्क वाळवून देत. तो अंगांत घातला कीं, गोपाळराव निघाले डेक्कन कॉलेजांत–जेथें पुष्पशय्येवर लोळणारे लक्ष्मीपुत्र रेशमी वस्त्रांनीं मढविलेले असत, अत्तरांनीं दरवळलेले असत, आणि पंचपक्वान्नांत आकंठ बुडालेले असत! सोनेरी राजहंसांच्या पंक्तीला हा सामान्य दिसणारा पक्षी बसत होता–पण त्याच्या पंखांत होती गरुडाची भरारी मारण्याची ताकद!

परीक्षेची फी भरण्यास गोपाळजवळ पैसा नाहीं, तो देणारा आधाराचा हातहि कोठें दिसत नाहीं, असें पाहिल्यावर गोपाळरावांनीं आपलें डोकें चालविण्याचें ठरविलें. एक नाटक लिहिण्यास त्यांनीं घेतलें. तें पुरें झालें कीं त्याचा मोबदला आपल्याला मिळेल व त्या पैशांतून आपण परीक्षेची फी भागवूं असा हिशेब त्यांनीं बसविला. यांत किती अडचणी, किती हाल आहेत याची पर्वा त्यांचे महत्त्वाकांक्षी मन कशाला करतें? पण ती जबाबदारी त्यांच्या एका गुरूनें उचलली. त्यांचें नांव प्रो. केरूनाना छत्रे. अकोल्यास जसे रा. ब. महाजनि, तसे पुण्यास प्रो. केरूनाना. गणिताचे महापंडित. विद्यार्थ्यांविषयीं विलक्षण कळकळ. तिचें वर्णन पुढें गोपाळरावांनींच मार्मिकपणें केलें आहे. "नाना पेन्शन घेऊन कॉलेजांतून बाहेर पडले त्या दिवशीं आगरकर लिहितात, "त्यांच्या पायावर डोकीं ठेवून त्यांना कडकडून भेटतांना गहिंवर न सावरल्यामुळें आम्हांस विल-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्षण रडूं कोसळलें." आणि गुरुजी कसे? तर त्या दिवशीं कॉलेजांत येण्यास घर सोडल्यापासून रडून रडून ज्यांचे डोळे सुजून गेले होते." असे! अशा वात्सल्यपूर्ण केरूनानांना, आपला एक बुद्धिमान् शिष्य परीक्षेच्या फीसाठीं, अभ्यासाचा वेळ मोडून, नाटक लिहीत आहे, असें कळतांच स्वस्थ कसें बसवेल? त्यांनीं गोपाळरावांची फी भरली व त्यांना केवळ अभ्यास करण्यास मोकळें ठेवलें. त्यामुळें ते पहिल्या वर्षाच्या परीक्षेंत सहजच उत्तीर्ण झाले.

कॉलेजांतील पहिली परीक्षा!—अगदीं त्रिनत्रासाची—लोळत लोळत खुशाल उत्तीर्ण व्हावी अशी—अपेश घेण्याची कोणी पैज मारली तरच विद्यार्थी त्या वर्गांत मागें राहावयाचा, नाहीं तर सारे भराभर पुढें झटकतात. मॅट्रिक-नंतराची पहिली परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांना सिंहगड चढून गेल्यावर आढळलेलें देवटाकेंच वाटतें. पण आगरकरांना दारिद्र्यामुळें ही सुलभ परीक्षाहि उत्तीर्ण होणें बिकट गेलें. त्यांतून ते पार पडले तेव्हां त्यांना अपरंपार आनंद झाला. पण त्याहून आनंदाची, असामान्य योगायोगाची आणि सर्व आयुष्यावर छाप पाडणारी एक घटना कॉलेजांतील पहिल्या वर्षांच घडली. ती म्हणजे निबंधमालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची भेट. या वेळीं शास्त्रीबुवांचा कीर्ति-सूर्य उदयास येत होता. जनतेंतील नैराश्य, आत्म-निंदा व सुखलंपट निष्क्रियता या दोषांचे डोंगर जमीन-दोस्त करण्यासाठीं, त्यांनीं सरकारी नोकरीची रुपेरी बेडी तोडून, निबंध-मालेचें वज्र हातीं घेतलें होतें. स्वदेश, स्वभाषा व स्वधर्म यांविषयीं, भ्रमानें वा मोहानें, तुच्छतेची व धिक्काराची भावना व भाषा बाळगणाऱ्या आंग्लशिक्षितावर त्यांचे वज्राघात नुकतेंच चालू झालें होतें. गाईचा हंबरव ऐकतांच तिच्या वासरांनीं तिच्याकडे धावावें व कासेस लागावें; त्याप्रमाणें ध्येयानें भारलेले, चैतन्यानें रसरसलेले व कर्तृत्वाच्या प्रेरणेनें तळमळणारे तरुण साहजिकच शास्त्रीबुवाकडे धाव घेत. आगरकर याहून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुसऱ्या कोणत्या मार्गानें जाणार? राजकीय विषयावर आपण लिहिलेला एक निबंध दाखविण्याच्या निमित्तानें आगरकरांनीं चिपळूणकरांची मुलाखत घेतली. त्या निबंधाच्या निमित्तानें त्या दोघां ध्येयवादी तरुणांत काय काय बोलणीं झालीं हें कोण सांगूं शकेल? पण एवढें खास कीं, आगरकर आपल्या चित्तांत त्या नर-केसरीबद्दल आदराची भावना घेऊनच घरीं गेले. आगरकरांपेक्षां चिपळूणकर सहा वर्षांनीं वडील. या भेटीचे वेळीं, म्हणजे १८७६ सालीं चिपळूणकर बी. ए. होऊन सहा वर्षें झालेलीं व निबंधमाला काढूनहि दोन वर्षें होत आलेलीं. जगाचा बराबाईट अनुभवहि त्यांना बराच आलेला होता. पुढील महत्कार्यांच्या योजनाहि त्यांच्या डोक्यांत खेळत होत्या. त्यांनीं आगरकरांकडे आपला एक भावी सहकारी म्हणून पाहिलें असेल काय?

१८७७ सालीं गोपाळरावांचा विवाह झाला. या वेळीं त्यांचें वय २१ वर्षांचें होतें. एकोणिसाव्या शतकांत हें वय म्हणजे फारच पुढारलेलें. ' आमच्या देशाला लागलेला महाक्षयरोग" व "अतिप्रबळ आणि दुष्ट दावानल" या विशेषणांनीं आगरकरांनीं पुढें वर्णिलेला बालविवाह तेव्हां सर्रास रूढ होता– पाळण्याला बाशिंग बांधण्यापर्यंत कळसाला पोंचलेला होता! ' या भरतभूमीच्या तोंडाला काळिमा देणारा हा अपकीर्तीचा कज्जलकरंडक आहे " अशा तीव्र शब्दांनीं आगरकरांनीं पुढें या रूढीवर हल्ले केले. या विचारांचे अंकुर कॉलेजांत असतांनाच आगरकरांचे मनांत उगवलेले असतील, शिवाय त्यांचें अठराविश्वे दारिद्र्य. या दोन्ही कारणामुळें त्यांचा विवाह इतक्या उशीरां–म्हणजे २१ वे वर्षी–झाला. न्या. रानडे यांचें विवाह–वय १३ होतें. व टिळकांचें लग्न झालें १५ वे वर्षी. त्या मानानें तेव्हां आगरकरांचा हा प्रौढ विवाहच मानला गेला. कऱ्हाडपासून दहा मैलांवर कृष्णाकांठीं उंब्रज म्हणून एक गांव आहे. धनाजी जाधवाचा हा गांव–श्रीसमर्थांच्या अकरा मारुतीपैकीं एक तेथें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. या उंब्रजेंतील मोरभट फडके यांची मुलगी अंबुताई. ती ' यशोदा ' या नावानें गोपाळरावांची गृहिणी झाली. तिला लिहिण्यावाचण्याचा गंध कोठला ? गोपाळरावांनींच पुढें थोडें लिहावाचायला शिकविलें. न्या. रानड्यांनाहि रमाबाईना श्रीगणेशाचा धडा द्यावा लागला,–'त्यांचें मोठें यश म्हणजे आपल्या पत्नीला शिक्षणसंपन्न व कर्तृत्वसंपन्न करणें (His greatest achievement was his wife !) असें वर्णन एका आंग्ल लेखिकेनें आपल्या ग्रंथांत केलें आहे. तत्कालीन स्त्रीशिक्षणाच्या अधारावर या वाक्यानें स्वच्छ प्रकाश पडतो.

एकदां यशोदाबाई माहेरीं असतां गोपाळरावांनीं कांहीं पुस्तकें उंब्रजेस पाठवून दिलीं व मोरभटांना विनंति केली कीं, आपल्या मुलीकडून हीं पुस्तकें वाचून घ्या. मोरभटांनीं जबाब काय दिला असेल ? "पुस्तकाच्या अगोदर लुगडीं पाठविण्याची व्यवस्था करा " असें पत्र आलें. गोपाळरावांनीं उलट उत्तर न देतां लुगडीं घेण्यासाठीं आठ रुपये पाठविले.

शिक्षणाचे संस्कार नसल्यामुळें यशोदाबाईच्या मनावर जुन्या–धार्मिक संस्कारांची छाप असे. इतर दहाजणींप्रमाणें त्या व्रतवैकल्यें, उपासतापास, जपजाप्य करीत. पुण्यांत जोगेश्वरीच्या देवळांत त्यांनीं सुवासिनींच्या खणानारळांनीं ओट्या भरल्या. पण गोपाळराव व्यक्तिस्वातंत्र्याचे उपासक; मतांची सक्ति त्यांना अमान्य. युक्तिवाद करून आपले विचार शांतपणें पटवून देण्यास ते सदैव तत्पर; पण ते विचार पटेपर्यंत नवरेपणाच्या अविचारानें जुलूम करणें त्यांना पूर्ण नापसंत. " मी म्हणजे कांहीं मिसेस् आगरकर नव्हे " असें उत्तर शंकेखोर विद्यार्थ्यांना देऊन त्यांनीं आपली उदार मतसहिष्णुता पुढें व्यक्त केली.

कॉलेजांत गोपाळरावांचे ऐच्छिक विषय इतिहास, तर्कशास्त्र व तत्त्वज्ञान हें होतें. इतिहासाची त्यांना लहानपणापासून गोडी. तत्वज्ञानांतहि ते रंगलें. प्लेटो–ॲरिस्टॉटलपासून स्पेन्सर–मिलपर्यंतच्या पाश्चात्य तत्ववेत्त्यांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ग्रंथांत ते मनसोक्त डुंबत. स्त्रियांची परवशता (Subjection of Women) इत्यादि मिल्लच्या ग्रंथांनीं तर त्यांच्यावर विलक्षण मोहिनी पाडली. "पुनर्जन्म असलाच तर तो मला मिल्लसारख्याच्या पोटीं मिळावा" असे उद्गार ते काढूं लागले. "रामायणभारत वाचण्यापेक्षां गिबनचा रोमन साम्राज्याचा इतिहास वाचा" असा उपदेश ते आपल्या विद्यार्थ्यांना पुढें पुढें करीत. पाश्चात्यांचा प्रवृत्तिवाद, येथल्या पराभूत पार्श्वभूमीवर, त्यांना फारच आकर्षक वाटूं लागला. बुद्धिप्रामाण्य व व्यक्तिस्वातंत्र्य या तत्वावर उभारलेला जडवाद–भोगवाद नव्हे !–त्यांच्या हृदयावर या वयांतच आपला पगडा बसवीत चालला. इंग्लंडांतील राजकीय उदारमतवाद आपल्या देशांत अवतीर्ण व्हावयास हवा, अशीं तळमळ त्यांना लागून राहिली. युरोपांतील नव–विचारांचें आकंठ पान करीत ते १८७८ सालीं नोव्हेंबर महिन्यांत दुसऱ्या वर्गांत बी. ए. झाले.

त्या परीक्षेंतील विषयवार गुण: इंग्रजी– $\frac{१०१}{२५०}$, संस्कृत–$\frac{१५०}{२५०}$ गणित–$\frac{१०३}{२००}$, इतिहास-अर्थशास्त्र $\frac{२०८}{४००}$, एकूण $\frac{५६२}{११००}$

या वेळीं डेक्कन कॉलेजचे प्रांचार्य डॉ. सेल्बी हे होते. ते तत्त्वज्ञानाचे भोक्ते. गोपाळरावांचें त्या विषयांतील प्रावीण्य पाहून ते त्यांच्यावर खूष असत. साहजिकच त्यांनीं गोपाळराव बी. ए. होतांच त्यांना आपल्या कॉलेजांत 'फेलो' (उपप्राध्यापक) म्हणून नेमून घेतलें. फेलो-शिप् म्हणून गोपाळरावांना दरमहा ७५ रु. मिळूं लागले. अशा "संपन्न" स्थितींत, प्रसन्न मनानें, गोपाळराव एम्. ए. चा अभ्यास करूं लागले. आपलें ध्येय दृष्टीच्या टप्प्यांत आलें म्हणून त्यांचें मन किती हरखलें असेल ! कऱ्हाडच्या प्रीतिसंगमांत इंग्रजी तिसऱ्या इयत्तेनंतरच आपल्या शिक्षणाला जल-समाधि देण्याचा प्रसंग त्यांचेवर ओढवला होता. पण ऐन वादळांत आपली चिमुकली होडी समुद्रांत सोडणाऱ्या बेगुमान नावाड्याच्या छातीनें गोपाळरावांनीं रत्नागिरी, अकोलें, पुणें येथें अड-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चणीच्या लाटांशी टक्कर देत बी. ए. चें बंदर गांठलें—नव्हे, एम् ए. चा मुक्कामहि ते जवळ करूं लागले. या कष्टार्जित विद्या-धनाचा उपयोग ते कसा करणार होते ? " दोन पैसे मिळाल्यास कॉलेजचे विद्येसाठीं केलेले कर्जपाणी फेडून बाकीची माया बँकेंत टाकण्यांत, किंवा बायको बाहेर पडली म्हणजे ती अक्कडबाज दिसावी म्हणून तिला दोन दागिने करून देण्यासाठीं ती तिकडे लावण्यांत सदा दंग ! " ही तत्कालीन पदवीधरांची रहाटी गोपाळरावांनींच वर्णिलेली आहे. त्या सर्वसामान्य रहाटगाडग्यांत गोवले जाणारे गोपाळराव नव्हते. फेलो होतांच त्यांनीं आपल्या आपत्तींत आयुष्य कंठलेल्या मातेस पत्र लिहून स्पष्टपणें कळविलें कीं,

> " आपल्या मुलाच्या मोठाल्या परीक्षा होत आहेत, आतां त्याला मोठाल्या पगाराची चाकरी मिळेल आणि आपले पांग फिटतील, असे मोठाले मनोरथ, आई ! तूं करीत असशील. पण मी आतांच सांगून टाकतों कीं, विशेष संपत्तीची हांव न धरतां मी फक्त पोटापुरत्या पेशावर संतोष मानून, सर्व वेळ पराहितार्थ खर्च करणार. "

सर्व वेळ पराहितार्थ खर्च करणें—हाच एक मनोरथ ज्यांचें मनोभूमीवर वेगानें दौडत होता; त्यांना आतां अनुकूल काळ येत चालला. माला-कारांची भेट कॉलेजच्या पाहिल्या वर्षी झाली. हा जसा एक शुभयोग; तसाच दुसरा फेलोशिपच्या पाहिल्या वर्षी लाभलेला टिळकांचा सहवास. आगरकर एम्. ए. साठीं आणि टिळक एल्एल्. बी. साठीं १८७९ सालीं डेक्कन कॉलेजांत एकत्र गेले. महाराष्ट्राच्या कुंडलीतील शुभग्रह एकामागून एक एकत्र येत चालले. पारतंत्र्याच्या गारठ्यांत " थंड गोळा " होऊन पडलेल्या देशाला चैतन्याची ऊब न्या. रानडे यांनीं दिली. त्यानंतर व्हावयाची प्रत्यक्ष हालचाल चिपळूणकर—टिळक—आगरकर या त्रिमूर्तीचें द्वारें प्रगट झाली. " सरकारी नोकरी न पतकरतां देशसेवेंत आयुष्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घालविण्याचा ज्या दिवशीं निश्चय केला, त्या दिवसापासून आम्हीं जें जें बोललों–चाललों" त्याची आठवण आगरकरांनीं लिहून पुढें ठेवलीच आहे. "आपल्या देशाची दुर्दशा होण्याचीं दोन मुख्य कारणें म्हणजे पारतंत्र्य व दारिद्र्य; तीं नष्ट करण्याचे प्रमुख उपाय म्हणजे शिक्षण व उद्योगधंदे यांची वाढ. लोकांना शहाणे करून कसें सोडतां येईल, त्यासाठीं शाळा काढावी कीं वृत्तपत्र चालवावें, उद्योगधंदे कोणते काढणें शक्य आहे? हिताचें आहे?" इत्यादि विचारांचें मंथन करतां करतांच टिळक-आगरकरांच्या कैक रात्री उजाडल्या असतील! आपल्या योजनांतील अडचणी दूर कशा कराव्यात, आपला मार्ग रास्त आहे ना, इत्यादि शंकाकिंतूचें जाळें तोडून घेण्यासाठीं ही देशभक्तांची जोडी कधीं न्या. रानडे यांना भेटे, तर कधीं दुसऱ्या एकाद्या पुढाऱ्याची गांठ घेई. पुणें-लष्करांत ते असेच एकदां कोणास भेटावयास गेले असतां रात्रीं दोन वाजतां त्यांची वाट चुकली व ते बंडगार्डनपाशीं जाऊन पोंचले. एकदां मालाकार विष्णुशास्त्र्यांशीं वाटाघाट करून परत डेक्कन कॉलेजांत येतांना गरम रक्ताचे हे तरुण थंडीनें कुडकुडले!

"अवनत राष्ट्रांचें बौद्धिक, नैतिक आणि धार्मिक पुनरुज्जीवन करून, धीम्मेपणानें आणि शांततायुक्त क्रांतीच्या मार्गानें त्यांना बहुतेक पुढारलेल्या राष्ट्रांच्या पंक्तीला आणून बसविणें हें कार्य केवळ शिक्षणानेंच घडून येतें" असें आगरकरांना पूर्णपणें पटलें होतें. बी. ए. झाल्यानंतर ते कऱ्हाडला गेले असतां त्यांचे मामा रामभाऊ भागवत बोलण्याच्या ओघांत एकदां म्हणाले, "सब-जज्जाची जागा याला योग्य आहे. कारण याला लिहिण्याची तशीच बोलण्याची हौस आहे. या साऱ्या हौशी प्रोफेसर अथवा हेडमास्तर झाल्यास साधतील. पण तें काय? रडवें खातें. त्यास विचारतो कोण?" तेव्हां आगरकरांनीं तावडतोब उत्तर दिलें कीं, "कर्णाला छपरावर ठेवून कर्णाचें दातृत्व वर्णन करण्यासारखेंच हें आहे. ज्यांच्यापासून चांगले चांगले मुनसीफ, मामलेदार, वकील, बॅरिस्टर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निपजावयाचे तेंच जर रडवें खातें, तर मग माळावर ऊंस लावण्यास काय हरकत आहे ? जातिवंत व जीवंत झरा आणि पर्जन्यानें सांठलेलें डबकें कधींहि एक व्हावयाचें नाहीं." सरकारी यंत्रांतून जें निर्जीव शिक्षण दिलें जात होतें त्याच्याच कावडी पोंचाविण्यासाठीं आगरकर तळमळत नव्हते. त्यांना शिक्षक व्हावयाचें होतें, पण कशासाठीं ? तर " लोकांत स्वतंत्र विचार उत्पन्न होऊन स्वोन्नतीचे मार्ग लोकांना दाखविण्यासाठीं."

शिक्षण संपादण्याची आगरकरांना स्वत:ला अनिवार ओढ होती. आणि म्हणून त्यांनीं अपार कष्ट सोसले. तेव्हां साहजिकच इतर तरुणांच्या शिक्षणाची वाट सुलभ करून ठेवावी अशी तळमळ त्यांना सहानुभूतीमुळें लागली होती हें तर खरेंच, पण त्याशिवाय परतंत्र झालेल्या आपल्या देशांतील अज्ञान व दारिद्र्य यांचा संहार करण्यास शिक्षणासारखें दुसरें अमोघ शस्त्र नाहीं, अशी त्यांची बालंबाल खात्री झाली होती. आणि भाग्य त्यांचें कीं, तशा विचाराचे व निश्चयाचे श्री. बाळ गंगाधर टिळक हे त्यांना भेटले. समविचारी असा सहकारी लाभणें म्हणजे अंगीकृत कार्याच्या यशाचा विमाच उतरणें होय. एम्. ए.चा अभ्यास करणारे आगरकर आणि एल्एल्. बी.चा अभ्यास करणारे टिळक—या दोघा ध्येयवादी तरुणांच्या महत्त्वाकांक्षी मना- मध्यें राष्ट्राच्या उन्नतीचे वारे किती वेगानें वहात होते याचें गमक म्हणून पुढील संवाद संस्मरणीय आहे.

आगरकर: मला राजकीय सुधारणाऐवजीं सामाजिक सुधारणा करणेंच आजचें आमचें आद्य कर्तव्य आहे असें वाटतें. अगोदर घर नंतर दार.

टिळक: अहो, घर कोणाला नको असतें ? आगरकर, " घर सुधारा ! घर सुधारा !" असा डांगोरा तुम्हीं पिटविणार ना ? पिटवा कीं, आनंदानें पिटवा. जोरजोरानें पिटवा. पण—मला तर घरच नाहीं.

आगरकर: आम्ही आमच्या घराकरितां झगडूं. पण टिळक, आम्हांला सरकारबरोबर आमच्या अज्ञानाशींहि झगडावें लागेल, झगडाल तुम्ही ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टिळक : ती हृदयाची जखम आहे. तेथें मी गोड बोलून, किंबहुना मुळींच न बोलतां, नुसत्या आचारानेंच जखम भरून काढीन. आपणां दोघांना सर्वांगीण शिक्षण हातीं घ्यायला हरकत नाहीं ना ?

आगरकर: मुळींच नाहीं. ठरलें. आमच्या देशाचें शिक्षण आम्हींच हातीं घ्यायचें.

असे उदात्त संवाद या दोघां देशभक्तांमध्यें किती तरी वेळां झाले असतील. आणि त्यामध्यें किती तरी तास नकळत निघून गेले असतील. किंबहुना कैक रात्रीच्या रात्री उजाडल्या असतील. मुसलमानांच्या पकडींतून महाराष्ट्र सोडविण्याच्या आधीं शिवाजीमहाराजांनीं ज्या जबाबदारीनें आपल्या सहकाऱ्याशीं खलबतें केलीं असतील, मनसुबे रचले असतील, व्यूह आंखले असतील त्याच जोखमीच्या भावनेनें टिळक-आगरकर राष्ट्रोद्धाराच्या मार्गातील एकेक पाऊल जपून जपून टाकत होते. आतां काय ! कोणी उठतो नि शाळा काढतो. तो मार्ग आतां मळलेला आहे, बिनधोक झालेला आहे. पण ज्यांना पाऊलवाट नसलेल्यालाहि किर्र झाडीनें झांकलेल्या घाटांतून रेल्वेलाइन नेण्यासाठीं पहिली आंखणी करावी लागते, त्यांचीच बहादुरी खरी. एकदां कोलंबसानें अमेरिकेचा शोध लावला म्हणजे मग त्या खंडांत जाण्यास, राहण्यास, चैन करण्यास, शेंकडों-लाखों छोटे छोटे कोलंबस उड्या मारीत पुढें येतात. प्रश्न असतो तो नव दर्शनाचा ! तें बिकट व जबाबदारीचें कार्य या दोघां तरुणांनीं आपल्या शिरांवर घेतलें होतें. त्या कामीं त्यांनीं न्या. रानडे यांना पत्रानें सल्ला विचारला होता. 'माला'कार चिपळूणकर यांची तर प्रत्यक्ष मुलाखतच घेतली होती. दोघांनीहि टिळक-आगरकरांना प्रोत्साहन दिलें. फार काय ! चिपळूणकरांनीं पुण्यांत शाळा काढण्याची जी योजना ठरविली होती तिच्यांत त्यांनीं या दोघां तेजस्वी तरुणांना सहभागी करून घेतलें. या घटनेचें वर्णन खुद्द शास्त्रीबुवांनींच आपल्या डौलदार भाषेंत असें केलें आहे कीं, "टिळक-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आगरकर मला मिळण्यास आपखुषीनें तयार झाले आहेत. आमचें निशाण उभारण्याला ता. १ जानेवारीचा मुहूर्त आम्हीं मुक्रर केला आहे. आमच्या तोफखान्याच्या सरबत्तीपुढें सरकारी हायस्कूल केव्हांच धुळीस मिळून जाईल."

आणि ता. १ जानेवारी १८८० रोजीं या तेजस्वी तरुणांचें क्रांतीचें निशाण उभारलें गेलें. ती शाळा नव्हती, भावी स्वतंत्र सैनिकांची छावणी होती. नवीन ध्येयानें, नवीन पद्धतीनें सर्वांना सुलभ अशा स्वस्त दरानें शिक्षण देण्यासाठीं "न्यू इंग्लिश स्कूल" उघडण्यांत आलें. बुधवार पेठेंतील मोरोबा दादा फडणीसांच्या वाड्याच्या चौकांत ही इंग्रजी शाळा सुरू झाली. आदल्या दिवशीं शाळेच्या खोल्या सारवण्याचें काम टिळकांनीं स्वतः केलें व रात्र झाली म्हणून शाळेंतचं फळें अंथरून व उशाला उपरणें घेऊन ते निजले. सुरवातीला १९ मुलें हजर होतीं. पण पहिल्याच दिवशीं १५० मुलांनीं नावें नोंदविलीं व ३ महिन्यांत मुलांची संख्या ५०० पर्यंत चढली. शाळा उघडण्याच्या दिवशीं विष्णुशास्त्री व टिळक हे दोघेच शिक्षक होते. कारण आगरकर हे एम्. ए. मध्यें नापास झाले होते. विष्णुशास्त्री चिपळूणकर व लोकमान्य टिळक यांच्याशीं आगरकरहि नापास होण्याच्या बाबतींत समानधर्मा राहिले. १८८० च्या नोव्हेंबर महिन्यांत आगरकर एम्. ए. झाले. या परीक्षेंत त्यांना मिळालेलें यश अगदींच सामान्य प्रतीचें आहे. याचा अर्थ अभ्यासाव्यतिरिक्त राष्ट्रीय कार्याच्या मनोरथांत, चिंतनांत, संवादांत त्यांचा बराच काळ उडालेला असावा. त्यांना एम्. ए. मध्यें पुढीलप्रमाणें गुण मिळाले:—

इतिहास (पहिला पेपर) –४२/१००, इतिहास(दुसरा पेपर) ३२/१००, तर्कशास्त्र–४१/१००, राजकारण–४१/१०० ग्रीक तत्त्वज्ञानाचा इतिहास–४१/१००, अर्वाचीन तत्वज्ञानाचा इतिहास–२९/१०० एकूण–२२६/६००

ताबडतोब ते न्यू इंग्लिश स्कूलमध्यें काम करूं लागले. टिळकांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उदाहरणामुळें जसें ना. गोखले, तसे आगरकरांच्या उदाहरणामुळें प्रि. आपटे न्यू इंग्लिश स्कूलला येऊन मिळाले. "कांहीं उनाड व हुच्चे तरुणांचीं ही शाळा कुत्र्याचे झाडाप्रमाणें क्षणभंगुर आहे," असें तुच्छ भविष्य सरकारी हायस्कूलच्या हेडमास्तरांनीं केलें होतें. पण ते सपशेल पालथे पडले. प्रो. वर्ड्सवर्थ, डॉ. मरेमिचेल, सर विल्यम हंटर आणि गव्हर्नर वगैरे सरकारी अधिकारी या सर्वांनीं शाळेच्या कार्याची तोंडभर तारीफ केली. आणि "हिच्या तोडीची एकहि शाळा मला सर्व हिंदुस्थानांत दिसून आली नाहीं," अशी प्रशंसा मुक्तकंठानें केली. डॉ. भांडारकरांनीं चार वर्षांनंतर या शाळेला असे प्रशंसा-पत्र दिलें कीं, "स्वतः निरपेक्ष व उदार पदवीधरांनीं स्वतःच्या हिमतीवर शाळा स्थापून ती नांवारूपास आणली व आपल्या कर्तबगारीनें ती लोकांच्या आश्रयास पात्र करून घेतली."

• • •

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८३५ / ४३ २८-२-६८

दोन गंडांतरें : : ३

शिक्षण म्हणजे काय ? केवळ लेखन, वाचन व गणन हें तीन 'न'कार म्हणजे शिक्षण काय ? सरकारी कचेरीचें कुलूप उघडण्याची किल्ली म्हणजे शिक्षण, ही रूढ कल्पनाच मुळीं चिपळूणकर–टिळक–आगरकर या त्रिमूर्तींनीं उध्वस्त केली. लोकांत व सरकारांत मानमरातब मिळविण्याचें व पदव्या पटकावण्याचें एक साधन म्हणजे शिक्षण हें समीकरण या तिघां देशभक्तांनीं मोडून टाकलें. पाश्चात्य ग्रंथांतील ज्ञानानंद लुटण्याचा दरवाजा उघडून देणें एवढेंच शिक्षणाचें स्वार्थी ध्येय आहे, असें हे तिघे मानीत नव्हतें. स्वार्थापेक्षां राष्ट्रहिताकडे आणि सुखापेक्षां कर्तव्याकडे जनतेचें तोंड वळवावें या ईर्षेनें हे तीन तेजस्वी तरुण महाराष्ट्राच्या अग्रभागीं कमर कसून उभे होते. आपल्या देशबांधवांना स्वातंत्र्य, समृद्धि व ज्ञान यांचा लाभ लौकरांत लौकर घडून देण्यासाठीं किती झटूं, कोणतीं नवीं नवीं साधनें वापरूं, किती नवीं नवीं कार्यें उभारूं असे विचार त्यांच्या अंतःकरणांत एकसारखे उसळून येत होते. शाळा काढली, यशस्वी झाली, भरभराटीस पोंचली, नांवालौकिकास चढली, पण म्हणून काय झालें ? तेवढयानें देशाचा प्रश्न संपतो थोडाच ? आमचें बौद्धिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय पारतंत्र्य नष्ट करण्याचें कार्य किती अवाढव्य आहे ! त्यासाठीं नुसती शाळा कशी पुरी पडणार ? शाळेंत तरुण पिढी तयार होईल. पण तरुण माणसांना देशभक्तीचें व स्वातंत्र्य-

पुस्तकालय गुरुकुल कांगड़ी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रेमाचें धडे कोठून मिळणार ? देशभक्ती व स्वातंत्र्यप्रेम यांचा अमृत-वर्षाव करणारी 'निबंधमाला' चिपळूणकर चालवीत होते हें खरें. पण ती महिन्यांतून एकदां निघणारी, कधीं कधीं सहा सहा महिन्यांनीं निघणारी आणि तिचे विषय मुख्यतः तात्त्विक. दैनंदिन घडामोडीचा परामर्श घेण्याचें व त्यायोगें लोकमत स्वातंत्र्यानुकूल करण्याचें कांहीं साधन आपल्या हातीं असावें अशी तीव्र इच्छा या तरुणांच्या मनांत खेळूं लागली.

"वर्तमानपत्रें हीं लोकांचे कोतवाल होत. या कोतवालांनीं सर्वत्र गस्त घालीत असावें आणि कोठें जुलमाचा, अन्यायाचा, अडचणींचा किंवा त्रासाचा प्रकार दिसून आल्यास लोकांच्या, सरकारच्या आणि विशिष्ट अधिकाऱ्यांच्या नजरेस आणावा" असें चिपळूणकरांचें मत होतें. त्या वेळीं पुण्यांत 'ज्ञानप्रकाश', 'ज्ञानचक्षु', 'पुणेंवैभव', व 'शिवाजी' अशीं फक्त चार मराठी वृत्तपत्रें चालू होतीं. पण चिपळूणकरप्रभृतींना वर्तमानपत्र जें काढावयाचें होतें तें अगदीं वेगळ्या स्वरूपाचें, स्वतंत्र बाण्याचें, नवीन विचारांचें. चिपळूणकर-टिळक-आगरकर वगैरे सहा जणांनीं १८८० सालीं दसऱ्याचे मुहूर्तावर 'केसरी'ची उद्देशपत्रिका प्रसिद्ध केली. तींत त्यांनीं आपलें ध्येय स्पष्टपणें जाहीर केलें तें असें होतें, "या पत्रांत प्रत्येक विषयाचें विवेचन जें करावयाचें तें केवळ निःपक्षपात बुद्धीनें व आम्हांस जें खरें वाटेल त्यास अनुसरून करावयाचें असा आमचा कृत-संकल्प आहे. अलीकडे बादशाही अमलाच्या सुरवातीपासून तोंडपुजेपणाचा प्रकार बराच वाढत चालला आहे, यांत संशय नाहीं. हा प्रकार अत्यंत अश्लाघ्य असून देशाच्या हितास अपायकारक होय, हें कोणीही मनुष्य प्रांजलपणें कबूल करील. तर सदरील पत्रांतील लेख त्यास ठेवलेल्या नांवा-प्रमाणेंच येतील असें समजावें."

केसरीची वर्गणी दोन रुपये होती. त्यांत चिपळूणकर-टिळक आगरकर अशा ध्येयवादी साहित्यधुरंधरांचे लेख येत. त्याशिवाय प्रो. आपटे, गोळे,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केळकर, नामजोशी, भानु वगैरे विद्वानहि आपापल्या आवडीच्या व व्यासंगाच्या विषयावर लेख लिहीत असत. त्यामुळें ,केसरीचा खप भराभर वाढत चालला. तारीख १ जानेवारी १८८१ सालीं निघालेल्या केसरीला १८८३ सालीं १००० व १८८७ सालीं ४७०० वर्गणीदार झाले. केसरीबरोबरच "मराठा" या नांवाचें इंग्रजी साप्ताहिकहि या मंडळींनीं १८८१ सालच्या जानेवारींतच सुरू केलें. आपलें मत सरकारच्या कानीं यथातथ्य व अधिकृत स्वरूपांत जावें या हेतूनें हें इंग्रजी पत्र सुरू करण्यांत आलें. त्याचें संपादकत्व टिळकांकडे होतें. केसरीचे संपादक म्हणून आगरकरांचें नांव प्रसिद्ध झालें होतें. पण दोन्ही पत्रांत हे सर्व ध्येयवादी तरुण लेख लिहीत असत.

वैभवाचा वारा आणि स्वातंत्र्याचा प्रकाश यांचा उपभोग घेणारें आपलें राष्ट्र उत्कर्षाच्या शिखरावरून पारतंत्र्याच्या व दैन्याच्या खोल व अंधाऱ्या दरींत येऊन कोसळलें. तेव्हां त्यांतून राष्ट्राचा तो गाडा पुन्हां वर उचलून नेण्यासाठीं त्याला चोहों बाजूंनीं हात दिला पाहिजे, आणि सर्व शक्ति खर्च केली पाहिजे अशा सर्वांगीण उतावीळीनें केसरीचे संपादक व लेखक लेखन करीत होते. "राजकीय प्रकरणें, व्यापारासंबंधीं माहिती, लोकस्थिति, नवीन ग्रंथावर टीका, विलायतेंतील राज्यप्रकरणांची घाटाघाट,"—एक ना दोन, छप्पन्न विषय केसरींत हाताळले जात. खुद्द मालाकार चिपळूणकर यांनीं वाङ्मयविषयक लेख लिहून निबंधमालेचा डौल केसरीस मिळवून दिला. केसरीच्या पहिल्याच अंकांत "वर्तमानपत्रें" या नांवाचा एक लेख आला आहे. "जागोजागच्या बातम्या प्रसिद्ध करण्याचें साधन" या स्वरूपाचीं वर्तमानपत्रें त्यावेळीं थोडीं फार होतीं. पण केसरीपुढें याहून उच्च ध्येय होतें. "रस्तोरस्तीं रात्रीं दिवे लागलेले असल्यानें व पोलिसांची गस्त सारखी फिरत असल्यानें जो उपयोग होतो" तोच निर्भीड वर्तमानपत्रांचा सरकारी अधिकाऱ्यांवर दबदबा ठेवण्यास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होतो. त्याचप्रमाणें लोकस्थिति सुधारणें हेंहि वर्तमानपत्रांचें कर्तव्य आहे. "विलायतेची कारस्थानें कुटणें, नवे धर्म तयार करणे, ज्ञातिभेदान्चा एका तडाख्यासरसा विध्वंस करून टाकणें असल्या अकटोविकट कृत्यांत त्याजपर्यंत पुष्कळ अमोलिक वेळ व्यर्थ गेला." अशी टीका करून केसरीकार या लेखांत असें आत्मविश्वासानें घोषित करतात कीं, "वरील चुकीची दुरुस्ती करण्याचाहि आमचा विचार आहे." हा अलोट आत्मविश्वास, पूर्वीच्या पुढाऱ्यावर केलेलें वाक्ताडन आणि व्यापक राष्ट्रोद्धाराची तीव्र तळमळ वगैरे गुणांवरून हा लेख खुद्द शास्त्रीबुवांच्या हातचा असावा असा तर्क करतां येतो. सरकारवर वचक व समाजाची सुधारणा या दोन कर्तव्यांबरोबर तिसऱ्याहि एका कर्तव्याचा उल्लेख या लेखांत आलेला आहे. तो विषय म्हणजे शिक्षण. "आम्ही मोठे झालों तरी आमचें जुनें आंगडेंटोपडें आम्हांस अद्याप सुटत नाहीं." म्हणून शिक्षण आणि साहित्य या दोन विषयांसंबंधानेंहि केसरीची गर्जना वरचेवर होत जाईल असें आश्वासन शास्त्रीबुवांनीं या पहिल्याच अंकांत देऊन ठेवलें आहे.

पहिल्या वर्षी केसरींत याच धोरणानें लेख आले. राजसत्तेची उत्पत्ति आणि अभिवृद्धि, आमच्या देशांतील सभा व मंडळ्या, करांविषयीं संक्षिप्त विचार या विषयाप्रमाणेंच बालविवाह, व्यायाम, ग्रंथसंग्रह, शास्त्र-कलांचें पुनरुज्जीवन, शेक्सपीअर, भवभूति व कालिदास इत्यादि विषयांचाहि परामर्श केसरीनें विद्वत्तापूर्ण पद्धतीनें घेतला. १८८२ सालीं शास्त्रीबुवांनीं केसरीच्या तीन अंकांत "देशोन्नति" हा आपला शेवटचा लेख पूर्ण केला. त्याच वर्षी मार्च महिन्याच्या १७ तारखेस केसरीवर दैवानें दारुण आघात केला. तो म्हणजे शास्त्रीबुवांचा अकालीं अंत !

अवघें बत्तीस वर्षांचें आयुष्य !—अंधारांत क्षणमात्र वीज चमकून जावी तसें तेजःपुंज ! महाराष्ट्राचा कोपरान् कोपरा त्या प्रकाशांत उजळून निघाला आणि त्याच्या उष्णतेनें शेंकडों राष्ट्रभक्तांच्या, धर्मभक्तांच्या व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मापाभक्तांच्या अंतःकरणांत चैतन्य निर्माण केलें. टिळक—आगरकर हें तर त्यांचे औरस वारसच ! पण इतिहासाचार्य राजवाडे, साहित्याचार्य केळकर, संतलेखक पांगारकर, वक्रोक्तिकुशल शिवरामपंत परांजपे—अशी एकेका क्षेत्रांतून जीं भरघोस व सकस पिकें पुढें तयार झालेलीं दिसतात त्या सर्वांना जीवन पुरविणारे शास्त्रीबुवाच ! त्यांच्यापासूनच सर्वांनीं स्फूर्ति घेतलेली. नव्या महाराष्ट्राचे ते जनकच ! त्यांच्याविषयीं केसरींत आगरकरांनीं जो मृत्युलेख लिहिला त्यांत त्यांची गाढ भावना तर व्यक्त होतेच, पण त्याशिवाय दुर्दम्य आत्मविश्वासहि प्रगट होतो. “ आज महाराष्ट्रवाणीचा पति परलोकवासी झाल्यानें ती गतभर्तृका झाली व महाराष्ट्रियानें अद्वितीय रत्न गमाविलें. ” अशी आपली भावना आगरकरांनीं लेखाच्या सुरवातीसच मांडली आहे. शास्त्रीबुवांचें गुणवर्णन करतांना आगरकर लिहितात, “ आपल्या देशाचें पारतंत्र्य आणि दारिद्र्य हीं शास्त्रीबुवांच्या अंतःकरणाला जशीं खात तसें दुसरें कांहींहि खात नसे. आपल्या लोकांची दैन्यावस्था पाहून त्यांचा जीव तिळतिळ तुटे. पारतंत्र्याला ज्ञान आणि दारिद्र्याला उद्योग हींच वस्ताद औषधें असें ते नेहमीं म्हणत...... ज्याला ज्याला म्हणून “ हिंदु ” हें विशेषण लावतां येईल त्याचा त्यांना मोठा अभिमान असे. सर्वांपेक्षां मराठी भाषेवर त्यांचें जें प्रेम होतें तें कांहीं पुसूंच नये. आपल्यामागें आपलें नांव चालविण्यास त्यांनीं एक सप्तसंवत्सरा निबंधमाला कन्येखेरीज दुसरें कांहीं ठेविलें नाहीं. द्रव्यासंबंधानें शास्त्रीबुवा जितके निरपेक्ष होते तितका दुसरा पुरुष सांपडणें कठीण. ” देशभक्ति, धर्मभक्ति व भाषाभक्ति यांचा असा हा अमोल खजिना काळानें हिरावून नेला म्हणून केवळ दुःखाश्रु ढाळीत आगरकर बसले नाहींत. “ ग्राज्येट पांडवांतील ” धर्मराज स्वर्गवासी झाला, “ आमच्या बंधाचा ग्रंथमणि हिरावला ” असे शोकाचे उद्‌गार काढणारे आगरकरच आत्मविश्वासानें अशी ग्वाही देतात कीं, “ शास्त्रीबुवांचीच कथा काय,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पण आम्हांपैकीं एक जरी तळावर असला तरी तो आम्हीं सर्वांनीं आरंभिलेला उद्योग अविच्छिन्न चालविण्यास होईल तितकी खटपट करील." एखाद्या युद्धांत चार सेनापतींपैकीं सरसेनापति कामास आला तरी बाकीचे सेनानी आपापल्या आघाडीवर पूर्वीपेक्षां अधिकच निकरानें लढत राहतात. तसाच कार्याचा अभिनिवेश या तरुण देशभक्तांमध्यें संचारलेला होता. कारण 'सत्याचा कैवार घेऊन, शुद्ध अंतःकरणानें लोकहितासाठीं भांडणारे' ते होते. आगरकरांनीं केलेलें हें वर्णन त्यांना स्वतःला तंतोतंत लागू पडतें. त्यांच्या सर्व जीवनाचा पट ज्या तीन धाग्यांनीं विणलेला आहे ते म्हणजे (१) सत्याचा कैवार, (२) शुद्ध अंतःकरण आणि (३) लोकहितासाठीं भांडणें. सत्यापासून निर्माण होणारी निर्भयता, चित्तशुद्धीपासून निपजणारा आनंदी स्वभाव आणि लोकहिताच्या ध्येयापासून उत्पन्न होणारी बेपर्वाई हेहि गुण आगरकरांच्या अंगीं उत्कट होते.

शास्त्रीबुवांवरील या मृत्युलेखांतील आगरकरांचें एक विधान आजमितीला फारच अर्थपूर्ण वाटतें. आज आपण स्वातंत्र्यांत नांदत आहोंत—प्रजासत्ता राज्याचा उपभोग घेत आहोंत पण सुमारें सत्तर वर्षीपूर्वी शास्त्रीबुवा मनानें या स्वातंत्र्याचा व या प्रजासत्ताकाचा लाभ कसा घेत असत हें आगरकरांनीं सूचित केलें आहे. ते लिहितात, "एखाद्या वेळेस त्यांचा (शास्त्रीबुवांचा) कल्पनाविहंग पूर्ण पंख पसरून भराऱ्या मारूं लागला म्हणजे त्याला हिंदुस्थान देश स्वतंत्र होऊन प्रजासत्ताक राज्याखालीं सुखानें नांदत आहे असें दिसे."

दुसऱ्याच वर्षी केसरीच्या कपाळीं अस्मानी–सुलतानी अशा दोन्ही आपत्ति आल्या. शास्त्रीबुवांचा मृत्यु ही अस्मानी आपत्ति आणि त्यानंतर तीनच महिन्यांनीं "केसरी–मराठा"वर खटल्याची घोरपड आली. ही सुलतानी आपत्ति. या वेळीं टिळक–आगरकरांचें वय अवघें २६ वर्षांचें होतें. पण त्यांनीं आपल्या शिरावर राष्ट्रकल्याणाचा भार घेतलेला होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यामुळें ते इंग्रज सरकारावर जशी कडक टीका करीत तशीच देशी संस्थानांवरहि. पहिल्याच वर्षी केसरीनें बडोदें संस्थानच्या दिवाणावर शस्त्र उगारलें आणि तेथील जनतेचा कैवार घेतला. त्यानंतर कोल्हापूरमध्येंहि दिवाणाच्या दडपशाहीनें पेट घेतला, तेव्हां केसरीनें तिकडेहि धांव घेतली. तेथील दिवाण रा. ब. बर्वे यांनीं छत्रपति शिवाजीराव यांना नाना प्रकारांनीं छळण्यास प्रारंभ केला. छत्रपतींची त्यांच्या पत्नीपासून ताटातूट करण्यांत आली. आईची भेट त्यांना दुरावली. गोरे डॉक्टर व गोरे रखवालदार यांचा पहारा सुरू झाला. वेडेपणाचा आरोप लादून छड्यांचा व चाबकांचा मारहि छत्रपतींना देण्यांत आला आणि शेवटीं विषप्रयोगाची तयारीहि सुरू झाली, अशा वार्ता टिळक–आगरकरांच्या कानांवर येऊन थडकत होत्या. महाराष्ट्रांतहि त्या वार्तांचे स्फोट घरोघर होत होते. छत्रपतींचें मीठ खाल्लेलें, त्यांच्या गादीला सातसातदां लवून मुजरे करणारे आणि छत्रपतींच्या अभिमानानें इतरांना तुच्छ लेखणारे असे शेंकडों–हजारों–लाखों कृतज्ञ वीर महाराष्ट्रांत पडलेले होते, पण 'ब्र' काढण्याची छाती कोणाची झाली नाहीं. ती छाती झाली फक्त केसरीकारांचीच ! आगरकर–टिळकांनीं केसरी-मराठ्यांतून कोल्हापुरांतील बर्वेशाहीवर कडाडून हल्ले चालविले. छत्रपतींना विषप्रयोग करण्याविषयीं दिवाणानें लिहिलेलीं म्हणून तीन पत्रें टिळक–आगरकरांकडे कोल्हापुरांतील कांहीं माणसांनीं पाठविलीं. त्यांच्यावर विश्वास ठेवून तीं पत्रें केसरी–मराठ्यांत छापलीं गेलीं. तेव्हां कोल्हापूरचे दिवाण बर्वे यांनीं मुंबईच्या गव्हर्नरकडे तार व अर्ज करून फिर्याद करण्याची परवानगी मागितली. ती मिळतांच ता. २४ जानेवारी १८८२ रोजीं मुंबईच्या मॅजिस्ट्रेट कोर्टांत बर्वे यांनीं टिळक–आगरकर प्रभृति चौघांवर फिर्याद दाखल केली. ता. १९ मार्च रोजीं हा खटला हायकोर्टाकडे रवाना करण्यांत आला. यानंतर दोनच दिवसांनीं शास्त्रीबुवा दिवंगत झाले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टिळक–आगरकर प्रभृतींनीं फेरोजशहा मेहता यांना वकील दिलें होतें. पण ज्या तीन पत्रांच्या पायावर हा खटला उभारलेला होता त्या पत्रांच्या अस्सल प्रति आरोपींनीं शेवटपर्यंत कोर्टांत दाखल केल्या नाहींत. कोल्हापूरच्या मित्रमंडळींनीं टिळक–आगरकरांचा विश्वासघात केला! त्याच मित्रांनीं मोठ्या संभावितपणानें या दोघां तरुणांना माफी मागण्याचा सल्ला दिला. तेव्हां टिळक–आगरकरांच्या मनाची अवस्था काय झाली असेल? जगाविषयीं त्यांचें मत काय बनलें असेल? त्यांचे वकील फेरोजशहा मेहता आणि काशीनाथ त्र्यंबक तेलंग या कायदेपंडितांनींहि माफी मागणेंच योग्य आहे असा सल्ला दिला. तेव्हां मनांतला राग मनांतच ठेवून, माफी मागण्याशिवाय गत्यंतरच नाहीं. म्हणून टिळक–आगरकरांनीं पुढील स्पष्ट शब्दांत बिनशर्त माफी मागितली : "ज्या वेळीं आम्हीं वर्तमानपत्रांत विधानें केलीं त्या वेळीं तीं साधार आहेत असेंच प्रामाणिकपणानें आम्हांस वाटत होतें व म्हणूनच तीं आम्हीं केलीं, व ज्यांनीं आम्हांस माहिती पुरविली त्यांजवर आमचा तेव्हां अविश्वास नव्हता, विश्वासच होता. पण ती माहिती व तीं पत्रें आतां भिडे यांच्या खटल्यांत खोटीं ठरल्यामुळें आमचीं विधानेंहि निराधार ठरतात व आम्हीं अशा माहितीवर इतका विश्वास टाकला याबद्दल आम्हांला अत्यंत वाईट वाटतें."

पण या प्रांजलपणाचें चीज बर्व्यांनीं काय केलें? तर खटला काढून न घेतां पुढेंच चालविला. त्याचा निकाल १७ जुलै १८८२ रोजीं लागला. निकालपत्रांत न्यायमूर्तींनीं लिहिलें, "अब्रुनुकसानीचा गुन्हा तुम्हीं कबूल केला हें शहाणपणाचेंच झालें. तुमच्या स्वतःच्या मनांत फिर्यादीबद्दल द्वेष नव्हता हें मला मान्य आहे. परंतु संपादक या नात्यानें तुमचें वर्तन अविचाराचें व बेसावधपणाचें झालें." टिळक व आगरकर यांना प्रत्येकीं चार महिने साधी कैद अशी शिक्षा झाली. इंग्रज सरकारच्या कोर्टांतील ही बहुधा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पहिलीच राजकीय शिक्षा असावी. या खटल्याचे वेळीं टिळक–आगरकरांसाठीं आपण होऊन कोर्टांत पांच हजार रुपये जामिनकीसाठीं भरण्याला पुण्यांतील गुळाचे व्यापारी उरवणेशेटजी पुढें आले. यावरून जनतेची सहानुभूति टिळक–आगरकरांच्या पाठीशीं किती होती हें दिसून येतें. एवढे विद्वान्, त्यागी आणि कळकळीचे तरुण केवळ एका सार्वजनिक कामासाठीं अत्यंत खडतर अशा तुरुंगांत जात आहेत, हें कळतांच महाराष्ट्रांतील जाणत्या लोकांचीं अंतःकरणें व्यथित झालीं–किंबहुना विदीर्ण झालीं.

मुंबईच्या कोर्टानें शिक्षा ठोठावली आणि त्याच दिवशीं संध्याकाळीं मुंबईजवळील डोंगरीच्या तुरुंगांत टिळक-आगरकरांना घोड्याच्या गाडींतून नेण्यांत आलें. त्या तुरुंगांत वस्ती सारी चेरड बदमाषांची–राजबंदी असे हे दोघेच. त्यांची अवस्था तेथें काय झाली याचें शब्दचित्र खुद्द आगरकरांनींच एका पुस्तकांत सविस्तर रेखाटलें आहे. त्या पुस्तकाचें नांव "डोंगरीच्या तुरुंगांतील आमचे १०१ दिवस." टिळकांनीं कॉलेजांत असतांना शरीरसंपत्ति चांगली कमावली होती. पण आगरकरांची शारीरिक स्थिति अगदीं उलट होती. पहिल्यापासून गरिबींत वाढलेले, वार लावून शिकलेले, एकाच सदऱ्यावर दिवस काढलेले, १५० मैल पायीं खडत गेलेले, पैशासाठीं अभ्यासाव्यतिरिक्त परिश्रम करणारे, आणि झिजणाऱ्या शरीराला अवश्य तो आहार देऊं न शकलेले आगरकर यांनीं बी. ए. च्या वर्गांत जेव्हां प्रवेश केला तेव्हांच त्यांच्या शरीरांत दम्यानें प्रवेश केला. हा पाहुणा जो आला तो मरेपर्यंत त्यांच्या सोबतीस राहिला. त्यानें त्यांची अर्धीअधिक शक्ति खची करून टाकली आणि मुस्कटदाबी तर पूर्णपणें केली. लहानपणीं कांहीं गरजेमुळें तर कांहीं हौसेमुळें ज्यांनीं वक्तृत्व गाजविलें, त्या आगरकरांच्या तोंडाला या दम्यानें कुलूपच ठोकलें. दारिद्र्य व दमा या दोन तळ्यांच्या जात्यांत आगरकरांचें आरोग्य पार भरडून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निघालें. अंतःस्फूर्तीची ज्योत प्रखर म्हणूनच कार्याचे डोंगर त्यांनीं उचलले—आणि तेहि अंतःस्थ व बाह्य आपत्तींच्या शृंखला हातापायांत वागवून. त्या वेळचा तो तुरुंगवास कोणाच्याहि काळजाचें पाणी व हाडाचें पीठ करणारा होता. पण त्यालाहि आगरकरांनीं हसतमुखानें तोंड दिलें. एवढेंच नव्हे तर सुटकेनंतर "१०१ दिवस" हें पुस्तक लिहिलें. तुरुंगांत त्यांनीं शेक्सपीअरच्या "हॅम्लेट" नाटकाचें भाषांतर पुरें केलें. असें लेखनकार्य करण्यास चित्ताची साम्यावस्था अपार असावी लागते आणि ही साम्यावस्था ध्येयनिष्ठेशिवाय प्राप्त होत नाहीं. देशभक्ति म्हणजे सतीचें वाण, समाजसेवा म्हणजे सुळावरची पोळी, लोककल्याणाचा मार्ग वस्तऱ्याच्या धारेसारखा, इत्यादि सुभाषितें, त्या काळापर्यंत पुष्कळांनीं वाचलीं होतीं—ऐकलीं होतीं. पण त्यांचा तीक्ष्ण अनुभव प्रत्यक्ष घेण्याचा योग टिळक-आगरकरांनाच प्रथम लाभला.

आगरकरांनीं "१०१ दिवसां" चें जें वर्णन आपल्या पुस्तकांत केलें आहे त्यावरून त्यांच्या तुरुंगांतील राहणीची कल्पना स्वच्छपणें येते. तुरुंगाकडे गाडींतून जातांना "देशाच्या अभ्यासाठीं आम्हीं आरंभिलेले उद्योग, करवीरस्थ प्रभूचें चांगलें व्हावें म्हणून आम्हीं लिहिलेले लेख... लोकांची आमच्यावर बसलेली प्रीति आणि त्यांच्याशीं आमचें वर्तन, आमच्या देशाची स्थिति आणि जगांतील न्यायपद्धति वगैरे अनेक विषय" त्यांच्या डोक्यांतून झपाटयानें येऊन गेले. तुरुंगांत गेल्यावर घरचे कपडे उतरण्यांत आले. वॉर्डरनें त्यांची झडती घेतली व त्यांना तुरुंगाचे पोशाख दिले. आगरकरांची प्रकृति जात्या 'शैत्यखोर' असल्यामुळें त्यांना वारंवार पडसें येई. म्हणून त्यांना एक वीत दीडवीत फडकें नाक पुसण्यासाठीं मिळालें. नांवें रजिस्टर करून शिपायांनीं टिळक-आगरकरांना एका कोठडींत कोंबलें आणि दाराला जंगी कुलूप लावलें. त्या रात्रीं पोटांत थंडी, बाहेर थंडी, व प्रकृति थंड, त्यामुळें आगरकरांनीं उजाडेपर्यंत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सगळे तास मोजले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं कारकुनाच्या कचेरींत त्यांचें वजन-माप व वैद्यकीय तपासणी घेण्यांत आली. दुपारीं लोखंडी टकोऱ्यांतून त्यांना जें अन्न देण्यांत आलें, त्याचा अमंगळ दर्प त्यांना दुःसह वाटला. तोंडांत दोनतीन शितें जाण्याबरोबर त्यांना ओकारीच आली. संध्याकाळीं चार वाजतां जेवणाचा हा विधि पुन्हां झाला. कैद साधी असल्यामुळें काम कांहींच नव्हतें. पण ती अवस्थाच तापदायक होती. संध्याकाळीं पांच वाजल्यापासून दुसरे दिवशीं सकाळीं सहा वाजेपर्यंत तेरा फुटांच्या चौरस खोलींत टिळक-आगरकरांना कोंडून ठेवण्यांत येत असे. लघवी-शौचाची सोय त्याच खोलींत.

अशा पद्धतीनें कंठलेले पहिले पंचवीस दिवस त्या दोघांना पराकाष्टेचे जड गेले. नंतर त्यांनीं अर्ज केल्यावरून त्यांना लिहिण्या–वाचण्याची परवानगी मिळाली. पण पुढें जसजशी मेंदूची व शरीराची शक्ति क्षीण होत चालली तसतसें वाचण्यावरदेखील त्यांचें मन लागेनासें झालें. शेवटच्या आठ दिवसांत तर हवी तितकीं पुस्तकें आणि हवे तितके कागद जवळ असतांहि त्यांनीं एक ओळदेखील वाचली नाहीं किंवा एक टाकेदेखील ओढला नाहीं. पण मधल्या दोन महिन्यांत आगरकरानीं दोन पुस्तकें लिहिलीं. वाचलींहि बरींच. पण खरा आनंद परस्परांच्या संवादांत व स्वैरालापांतच होता. एकाच वयाचे, एकाच विचाराचे, आणि एकाच चरित्राचे अशा समविचारी व सहकारी तरुणांना विषयांचा काय तोटा? भूतकाळाच्या भुयारांत भ्रमण करण्यांत जितकें सुख तितकेंच भविष्यकाळच्या अंतराळांत आशेच्या वावड्या उडविण्यांत ! या दोघांनीं कित्येकदां रात्रीच्या रात्री बोलत घालविल्या. सबंध महिन्यांत आकाशांतील चंद्राचें दर्शन फक्त एक–दोनदांच आणि तेंहि मोटया खटपटीनें त्यांना गजांतून झालें. त्या १३×१३ च्या खोलींत हे दोघे तरुण काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंतचा भारतवर्ष आणून उभा करीत. दिवा नसलेल्या त्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खोलीच्या कोपऱ्याकोपऱ्यांत आपल्या भावनेचा चंद्रप्रकाश ते प्रसरवीत आणि नाना ग्रंथकारांना आपल्यासाठीं पाचारीत. वादाच्या भरांत त्यांचा आवाज कांहीं कांहीं वेळीं इतका चढत असे कीं, "हळू बोला, हळू बोला" असे इषारे शिपाइ देत. सरकारी शिपाई आणि इतर कैदी यांनादेखील टिळक–आगरकरांची दुर्दशा पाहून वाईट वाटे व ते फार हळहळत. उलट त्या कैद्यांच्या स्थितीसंबंधीं हे दोघे विद्वान् मूलगामी विचार करीत. "वास्तविक पाहिलें तर शेंकडा तीस कैदी मात्र खरोखर गुन्हेगार सांपडतील." असा सिद्धांत सांगून आगरकर म्हणतात— "कोणत्याहि देशांतील एकंदर तुरुंगांची आणि त्यांतील लोकांची संख्या कमी होत जाणें हें त्या देशाच्या वाढत्या सुधारणेचें चिन्ह होय. सबब सर्व सदय, देशाभिमानी, सुशिक्षित आणि श्रीमंत लोकांनीं अपराधी मनुष्यतेचा कंटाळा न करतां ती सद्गुणी करण्यासाठीं रात्रंदिवस झटलें पाहिजे." गुन्हेगारी हा एक रोग आहे. आणि रोगाच्या सांथी नष्ट करण्यासाठीं सरकार जसे प्रयत्न करतें तसे गुन्हे नाहींसे करण्यासाठीं झटलें पाहिजे— कोणताहि माणूस उपजत गुन्हेगार असत नाहीं. शिक्षण व आर्थिक सुस्थिति मिळवून दिल्यास गुन्हेगार माणसें निवळतील, इत्यादि शास्त्रशुद्ध विचारांचीं बीजें आगरकरांच्या या पुस्तकांत सांपडतात.

या तुरुंगवासानें टिळक–आगरकरांची छाती दबकून फुटून गेली, असे मुळींच नाहीं. उलट "अगोदर तुरुंगांत एक पाय ठेवून मग आम्हीं देशोन्नतीसाठीं आपली लेखणी हातीं घेतली" ही शास्त्रीबुवांची दिशा आमरण चालू ठेवण्याचा त्यांचा निर्धार दृढमूलच झाला. फिरून तुरुंगांत यावें लागलें तरी ज्या गोष्टी केल्याच पाहिजेत अशा गोष्टी कोणत्या? यांचा खल टिळक–आगरकर डोंगरीच्या तुरुंगांतच करीत होते. सरकारबरोबर लढण्यासाठीं पैसा भरपूर पाहिजे, पुराव्याचें कागद चोख पाहिजेत. जबान्या सहीसाक्षीनिशीं लेखी घेऊन ठेवल्या पाहिजेत इत्यादि पुढील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खबरदारीचे जे इषारे आगरकरांनीं या पुस्तकांत दिले आहेत त्यांवरून त्यांना कोणकोणत्या ठेचा लागल्या हें कळून येतें.

या तुरुंगवासांत आगरकरांच्या हातून एक चिरकालीन महत्त्वाची वाङ्मयकृति निर्माण झाली. तिचें नांव "विकारविलसित." शेक्सपीअरच्या "हॅम्लेट" नाटकाचें हें भाषांतर. पूर्वी कॉलेजांत पहिल्या वर्षाच्या परीक्षेचे वेळीं पैशाची नड भागविण्यासाठीं आगरकरांनीं एक नाटक लिहावयास घेतलें होतें. आतांहि बर्वे प्रकरणांत कोर्टाचा खर्च अंगावर आल्यामुळें पैशाची अडचण झाली तेव्हां ती दूर करण्यासाठीं हातचा हुकाचा उपाय म्हणून त्यांनीं हॅम्लेट नाटक भाषांतरास घेतलें. आर्योद्धारक मंडळीकडून त्याचे चारदोन प्रयोग करून जें उत्पन्न येईल तें "केसरी फंडाकडे" लावावें असा आगरकरांचा हेतु होता. लेखकाला अवश्य ती मानसिक शांतता न मिळाल्यामुळें "हें पुस्तक माझ्या हातून जितकें वठेल असें मला वाटत होतें तितकें वठलें नाहीं, हें माझें मीच कबूल करतों," अशी नम्र व प्रांजळ कबुली आगरकरांनीं या नाटकाच्या प्रस्तावनेंतच दिली आहे. ही प्रस्तावना अपूर्ण आहे, पण मोठी वाचनीय आहे. "महत्त्वाच्या ठिकाणीं शेक्सपीअरला काडीएवढेंसुद्धां दुखावलेलें नाहीं" अशी ग्वाही त्यांनीं दिलेली आहे. याच्या उलट आपली उणीव प्रांजळपणानें त्यांनीं मांडली आहे. "कवितादेवीचा वरदकर तर राहिलाच, पण करांगुलीसुद्धां मस्तकावर नसल्याचें" त्यांनीं प्रस्तावनेंत लिहिलें आहे.

भाषांतरासंबंधानें साधकबाधक चर्चा शास्त्रीबुवांनीं निबंधमालेंत यापूर्वी खूपच करून ठेविली होती. आगरकरांचेंहि मत भाषांतरापेक्षां रूपांतर करणें श्रेयस्कर असेंच होतें. "हॅम्लेट" ऐवजीं "चंद्रसेन", "ऑफिलिया"-ऐवजीं "मल्लिका" अशीं नांवें त्यांनीं आपल्या पात्रांना दिलीं आहेत. नुसतीं पात्रांचीं नांवेंच नव्हे तर एकंदर संवादहि त्यांनीं अशा झोकानें रचलेले आहेत कीं, ते अगदीं अस्सल मराठी वाटावेत. भाषांतराची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कृत्रिमता फारशी कोठें आढळत नाहीं. मूळ भावार्थ अचूकपणें व पूर्णत्वानें दुसऱ्या भाषेंत उतरणें ही जशी भाषांतरकाराची एक कसोटी, तशीच त्या दुसऱ्या भाषेचा पिंड किंवा प्रकृति यांना धक्का लागूं न देणें हीहि दुसरी कसोटी महत्त्वाचीच आहे. या दोन्ही कसोट्यांना आगरकरांचें "विकार-विलसित" पुष्कळ अंशांनीं उतरतें. अर्थात् याला अपवाद म्हणून त्यांच्या भाषांतरांत कांहीं कांहीं दोष दिसून येतात. ते दाखविण्याचें कार्य त्यांच्याच एका भक्तानें केलें आहे. तो भक्त म्हणजे सुधारणावादाचा पुरस्कार करणारे मराठींतील आद्य कादंबरीकार श्री. हरिभाऊ आपटे. त्यांनीं "मनोरंजन व निबंधचंद्रिका" या मासिकांत एक टीकात्मक लेख लिहिला. त्याचें आगरकरांनीं मोठें कौतुक केलें.

"शेक्सपीअरचें अनुपमेय बुद्धिवैचित्र्य, शेक्सपीअरची असामान्य कल्पनाशक्ति, शेक्सपीअरचें अद्वितीय वर्णनचातुर्य, शेक्सपीअरचें अवर्ण-नीय अनेकप्रकृतिज्ञान" इत्यादि गुणसमुच्चयावर आगरकर लुब्ध झाले होते. त्यांच्या सर्वोत्कृष्ट कलाकृतीचा आस्वाद मराठी वाचकांना देतांना त्यांनीं आपलें लेखन-कौशल्य पणास लावलें आहे. "कोठें कांहीं लागेना, मराठी रीतीस जुळत नाहीं, द्या सोडून! चांगला मराठी शब्द मिळत नाहीं, द्या सोडून! वाक्याचा अर्थ लागेना, द्या सोडून" असें भाडोत्री किंवा वेठीचें काम त्यांनीं केलें नाहीं. अवश्य तेथें त्यांनीं संक्षेप-विस्तार केला पण केवळ मराठी वाचकांच्या गळीं सहज उतरावें असें सफाईचें भाषांतर त्यांनीं बहुधा सर्वत्र केलें आहे. त्याचीं दोनचार ठळक उदाहरणें पुढें दिलीं आहेत.

चंद्रसेनः हे आकाशस्थ, पातालस्थ, आणि भूतलस्थ अनंत जीवांनो, काय अनर्थ हा! हृदया, असें कातर होऊं नको; थोडा धीर धरः स्नायूंनो, एका क्षणांत असे जीर्ण आणि दुर्बल होऊं नका; क्षणभर मला सांवरून धरा. तुला विसरूं नको? गरीब पिशाचा, हें डोकें जाग्यावर आहे तोंपर्यंत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

तुला विसरेन काय ? तुझी आठवण ठेवूं ! लहानपणापासून अभ्यासानें आणि परिश्रमानें या मेंदूंत सांठविलेली एकूणएक गोष्ट काढून टाकून तुला जागा करीन ! कोण क्रूर हडळी ही ! केवढा अधम निर्लज्ज दुष्ट चांडाळ हा ! वरून गोगलगाईसारखी गरीबी दाखवून पोटांत लोक रामोशी कसे असतात हें आज चांगलें प्रत्ययास आलें. ''

या भाषणाचें मूळ इंग्रजी काय आहे पाहा:—

To all you host of heaven ! O earth ! what else
And shall I couple hell ?- O by !-Hold, Hold, my heart
And you, my sinews, grow not instant old
But bear me stiffly up !-Remember thee ?
Ay, thou poor ghost, while memory holds a seat
In this distracted globe. Remember thee ?
Yes, from the table of my memory
I'll wipe away all trivial fond records
O most pernicious woman ! O villain, villain,
Smiling damned villain
That one may smile and smile and be a villain !

तसेंच, '' स्वर्गस्थ तारे तेजोमय आहेत किंवा नाहींत याची शंका घे; आकाशपंथानें भगवान् उष्णदीधिति भ्रमण करितो कीं नाहीं याची शंका घे; साक्षात् सत्यमूर्ति नेहमीं सत्य सांगेल कीं नाहीं याची शंका घे; पण तुझ्यावर माझें अढळ प्रेम आहे कीं नाहीं याची शंका कधींहि घेऊं नको. प्रिय मालिके, पद्यें जुळेनात म्हणून हा गद्यात्मक लेख लिहिला आहे. तुझ्याकडे मन लागून गेल्यामुळें ऱ्हस्वदीर्घ पाहणें सुचेनासें झालें आहे. असो. या कुडींत प्राण आहे तोंपर्यंत हा चंद्रसेन तुजवर एकनिष्ठेनें प्रेम ठेवील असें अभिवचन देऊन हें पत्र पुरें करितों. ''

हा इतका विस्तार मूळांतील फक्त चार लघु चरणांचाच आहे. तें कवन असें आहे:—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Doubt thou, the stars are fire,
Doubt, that the Sun doth move,
Doubt truth to be a liar
But never doubt, I love.

अशाच सोप्या शब्दांच्या सुटसुटीत पंक्तींचें चिमुकलें कवन आगरकरांनीं मराठींत रचलें असतें तर बहार झाली असती. आतां सुप्रसिद्ध ' स्वगत ' वाचा.

चंद्रसेन : जगायचें कीं मरायचें येवढाच प्रश्न उरला आहे. कसें ? दैवाच्या दारुण दुर्विलासामुळें होणाऱ्या अनंत यातना मनांतल्या मनांत सोसाव्या हें बरें, किंवा जिवावर उदार होऊन त्यांचा समूळ प्रतिकार करण्यास उद्युक्त व्हावें हें बरें !

भाषेचा सहजपणा साधण्यासाठीं मूळांतील अर्थाची यांत किती छाटाछाट केली आहे ! सगळाच्या सगळा भावार्थ भाषांतरांत आणणें फार कठीण ! एका बाटलींतील अत्तर दुसरींत घालतांना थोडाफार वास उडून जाणारच. एका बागेंतील फुलझाड दुसरीकडे लावतांना कांहीं मुळ्या तुटणारच. पण या ' स्वगतांत ' मुळांतील फक्त मुद्दा उतरला आहे, त्याचा संभारीं गळला आहे. मूळ ओळी अशा आहेत :—

To be or not to be, that is the question—
Whether t'is nobler in the mind to suffer
The slings and arrows of outrageous fortune
Or to take arms against a sea of troubles
And by opposing, end them ?

भाषांतरांत शेक्सपीअरचे सारे त्राण ओसरले; सारे सागर आटले; उरलें नुसतें कोरडे विचार.

' असल्या गद्ध्याच्या पाठीचें धिरडें करावें ' हें I would have such fellow whipped याचें भाषांतर सरस आहे. कर्णाचें दान,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भीमाचें बळ, असे संकेत किंवा 'परमेश्वराची करणी आणि नारळांत पाणी' अशा म्हणी यामुळें भाषांतराला सहजता व सरसता आली आहे.

हॅम्लेटच्या या भाषांतराला आगरकरांनीं जोडलेली प्रस्तावना अपुरी असली तरी २८ पानांची आहे. ती वाचली असतां आगरकरांची वक्तृत्व-पूर्ण लेखनशैली, मार्मिक टीकाबुद्धि, भाषाविषयाचें सखोल ज्ञान आणि पाश्चात्य ज्ञानाच्या प्रकाशांत आपल्या अवनत समाजाची सुधारणा करण्याची तळमळ हे गुण डोळ्यांपुढें मूर्तिमंत उभे राहतात. "म्हणतां म्हणतां चार दोन नाटकं छापून प्रसिद्ध झालीं" एवढीच त्या वेळीं नाट्यवाङ्मयाची चलती होती. तरी "शेंकडा निदान ७५ मराठी पुस्तकें केवळ मनोरंजना-साठीं लिहिलेलीं असतात. त्यांतही कादंबऱ्याला आणि नाटकाला विशेष दर !" असे कांहींसे खेदाचे उद्गार आगरकरांनीं तेव्हांच्या मराठी साहित्याविषयीं काढले आहेत. नाटकासारख्या विषयाकडे त्यांच्या मनाची स्वाभाविक प्रवृत्तीच नव्हती. परंतु पैशाच्या चणचणीमुळें ते नाट्य-लिखाणाकडे वळले. त्यांचें नशीब असें शिकंदर कीं, "महाराष्ट्रीय गॅरिक" असें शाहूनगरवासी गणपतराव जोशी या नटश्रेष्ठानें त्यांचा चंद्रसेन अजरामर करून सोडला. तिसऱ्या अंकांतील चौथ्या प्रवेशांत 'आई ऽऽऽ' अशी कारुण्यानें व प्रेमानें ओथंबलेली जी हांक गणपतराव मारीत असत ती मराठी रंगभूमीवर अद्याप निनादत आहे. "कांहीं गुण सोन्याचा तर कांहीं सोनाराचा" या न्यायानें "विकारविलसिता"च्या भरघोस यशाला गणपतरावांचें असामान्य कसब कारणीभूत झालें हें जितकें खरें, तितकेंच आगरकरांचें यथार्थ व सरस भाषांतरहि झालें यांत शंका नाहीं.

शेक्सपीअरची वाङ्मयीन योग्यता किती थोर आहे याचें समतोल विवेचन या प्रस्तावनेंत आहे. अंतःकरणग्राहित्व व स्वभाववैचित्र्य हे त्यांचे लोकोत्तर गुण त्यांनीं मुक्तकंठानें वर्णिले आहेत. आणि त्याबद्दल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याला "अजिंक्यपत्र" दिलें आहे. पण त्याबरोबरच शेक्सपीअर म्हणजे कांहीं 'ईश्वरांश' नव्हता असें म्हणून त्याच्या दोषाचाहि उल्लेख केला आहे. खुद्द 'हॅम्लेट' नाटकासंबंधींही एकदोन प्रश्नांची त्यांनीं केलेली चिकित्सा वाचली म्हणजे ते शाळा–कॉलेजांत कसे शिकवीत असतील याचें चित्र डोळ्यांपुढें उभें राहतें. हॅम्लेटचें वय १८–२० वर्षांचें असावें, त्यानें वेड फक्त पांघरलेलें होतें, इत्यादि आपले विचार त्यांनीं मोठ्या कौशल्यानें व संयुक्तिकपणें पटविले आहेत. 'हॅम्लेट' नाटकाचा हेतु काय? याचीहि छाननी त्यांनीं सूक्ष्मपणें केली आहे.

विशेष हें कीं, नाट्यसृष्टींत रममाण होत असतांहि सत्यसृष्टीचा विसर त्यांना पडला नाहीं. इंग्रजी पद्धतीप्रमाणें बोलावयाचें तर, त्यांच्यांतलि 'नाटककारापेक्षां' 'समाजसुधारक'च अधिक प्रबळ व सदैव जागृत दिसतो. "कालांतरानें स्थित्यंतर होतें व स्थित्यंतराबरोबर आचारविचार झालेच पाहिजेत." हा त्यांच्या सर्व सुधारकीय विचारांचा जीवनमंत्र तर प्रस्तावनेंत गोंवलेला आहे. हिंदुस्थानप्रमाणेंच युरोपमध्यें मध्ययुगांत धार्मिक खुळें कशीं बोकाळलीं होतीं याचीं अनेक उदाहरणें देऊन नव्या विचारांचा जो सारसंग्रह त्यांनीं एका पानावर दिला आहे, त्यांत त्यांची सुधारणेचीं सारीं सूत्रें येऊन गेलीं असें म्हटलें तरीं चालेल. उदाहरणार्थ (१) ईश्वरापाशीं वशिला लावण्याची आवश्यकता नाहीं. (२) ईश्वराच्या गुणांचा स्पष्ट बोध होणें अशक्य आहे. तथापि त्याच्या अगाध कर्तृत्वाचीं चिन्हें हरघडीं दिसतात. तेवढ्यावरच समाधान मानून त्याचें चिंतन करावें. त्याला शरण जावें. त्याचें कृतज्ञतापूर्वक भजन करावें. (३) शरीर व मन यांपैकीं कोणाचीच उपेक्षा करणें हितावह नाहीं. (४) परमेश्वरानें अनेक गुणात्मक बाह्य सृष्टि मनुष्याच्या उपभोगासाठीं केली आहे. विषयवासना तृप्त करणें हें पाप नाहीं. (५) क्रोध, अहंकार, इ० मनोविकार विचाराधीन असले म्हणजे कल्याणच होतें. (६) आपलें व दुसऱ्याचें ऐहिक आणि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पारमार्थिक चिंतन करणें हाच मनुष्याचा सनातन धर्म. आत्मोन्नतीहून श्रेष्ठ असें मनुष्यास दुसरें कर्तव्यकर्म नाहीं.

ईश्वर, त्याचें भजन, पारमार्थिक कल्याण आणि आत्मोन्नति इत्यादि जुन्या परंपरेंतील शब्द या संकलित सुधारणा–सूत्रांत आढळले, तरी आगरकरांचा ध्रुवतारा "ऐहिक सुखवर्धन" हाच एक होता. या आपल्या विचाराचा त्यांना इतका छंद असे कीं, नाटकाच्या प्रस्तावनेंतसुद्धां त्याचे पडसाद उमटल्याशिवाय राहिले नाहींत.

अशा प्रकारें कारागृहाच्या त्या काळोखांत काव्य-शास्त्र-विनोदाचा प्रकाश पाडून टिळक–आगरकरांनीं १०१ दिवस कंठिले. प्रि. वर्डस्वर्थ, रा. सा. मंडलिक यांसारख्या विद्वानांनीं सुटकेसाठीं प्रयत्न केले, पण ते फोल ठरले. तुरुंगाच्या शास्त्राप्रमाणें त्या दोघांचें 'सद्वर्तन' ठरल्यामुळें त्यांना १२० दिवसांतील १९ दिवसांची शिक्षा माफ झाली. ता. २६ ऑक्टोबर १८८२ रोजीं हे दोघे पहिले राजबंदी बंदिवासांतून बाहेर आले. टिळकांचें वजन २४ पौंडांनीं व आगरकरांचें १६ पौंडांनीं घटलें. पण ही घट शारीरिक वजनांत झाली, लोकांवरील त्यांचें वजन मात्र अपरंपार वाढलें. मुंबईतील अठरा पगड जातीचीं दोन हजारांवर माणसें डोंगरीच्या तुरुंगा-बाहेर या झुंझार देशभक्तांचें स्वागत करण्यास गोळा झालीं होतीं. त्यांची मिरवणूकहि मुंबईत काढण्यांत आली. अनेक ठिकाणीं त्यांना सत्काराच्या पानसुपाऱ्या झाल्या. आणि पुण्यास तर काय ? मोठी लढाई मारून दूर देशांहून विजयी होऊन आलेल्या वीरांचाच मान व आदर पुण्यनगरीनें त्यांना अर्पण केला. पुणें शहरांतून पेशव्यांच्या काळीं परक्या शत्रूंवर हल्ला करण्या-साठीं सशस्त्र फौजफांटे घेऊन कैक सेनापती निरनिराळ्या प्रांतांत जात होते आणि तेथून श्री व विजयश्री लुटून आणून परत पुण्यपुरींत दाखल होत होते. अशाच ऐतिहासिक प्रसंगाचें स्मरण होण्यासारखें प्रेमाचें, भक्तीचे व उत्साहाचे मानसन्मान व सत्कार–पानसुपाऱ्या टिळक–आगर-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करांना अनेक ठिकाणीं झाल्या. डेक्कन कॉलेजांतील मंडळींना तर आनंदाचें व अभिमानाचें भरतेच आले. ते धावले थेट खडकी स्टेशनवर. तेथें त्यांनीं आपल्या कॉलेजांतील या पूर्वीच्या विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रेमानें सत्कार केला.

पुणें शहरांत त्यांची मिरवणूक मोठ्या समारंभानें काढण्यांत आली. पहिली पानसुपारी चिपळूणकरांच्या बंगल्यांत झाली. "एक पाय तुरुंगांत ठेवून मगच आम्हीं हातांत लेखणी घेतों" अशी गर्जना करणाऱ्या शास्त्रीबुवांच्या या शिष्योत्तमांनीं ती गर्जना आज सार्थ करून दाखविली होती. मोरोबादादांच्या वाड्यांत सार्वजनिक सभेतर्फे जाहीर पानसुपारी झाली. सर्व जातींचे लहानमोठे स्त्री–पुरुष टिळक–आगरकरांबद्दल धन्योद्गार काढीत होते. त्यांच्या देशभक्तीचें सोनें तुरुंगाच्या भट्टींत तावूनसुलाखून निघालें होतें व बावन्नकशी ठरलें होतें. त्यामुळें केसरीच्या लोकप्रियतेची लाट गगनाला जाऊन भिडली. केसरीच्या "बचाव फंडा"ची कल्पना लोकांनीं स्वयंस्फूर्तीनें काढली. त्यासाठीं पुण्यांत एक नाट्यप्रयोग करण्यांत आला. त्या नाटकांत त्या वेळीं कॉलेजांत असलेले गोपाळराव गोखले यांनीं स्त्री-भूमिका केली. टिळक आगरकरांपेक्षां गोखले सात वर्षांनीं लहान.

कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजांतील विद्यार्थ्यांनींहि "केसरी फंडा"-साठीं एक नाटक बसविलें होतें, त्यासाठीं त्यांनीं कॉलेजच्या प्रिन्सिपलची परवानगीहि मिळविली होती. पण कोल्हापूरच्या कारभाऱ्यावर टीका करणाऱ्या टिळक–आगरकरांच्या केसरीला कोल्हापुरांतूनच मदत देणें अडचणीचें होईल हें जाणून प्रिन्सिपलनीं ही परवानगी पुढें काढून घेतली. पण कोल्हापुरी कौतुकाचा नजराणा टिळक–आगरकरांना मिळावयाचा तो मिळालाच. नोव्हेंबर महिन्यांत विद्यापीठाच्या परीक्षेसाठीं कोल्हापूरचे विद्यार्थी मुंबईस गेले होते. त्यांत गोपाळराव गोखलेहि होते. त्या विद्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

र्थ्यांनीं टिळक–आगरकरांच्या पानसुपारीचा समारंभ मोठ्या उत्साहानें साजरा केला. विशेष म्हणजे गोपाळराव गोखले यांनीं या दोघांच्या गौरवाचें भाषण केलें. हें त्यांचें पहिलेंच सार्वजनिक भाषण. टिळक–आगरकर–गोखले—महाराष्ट्राचें हृदय–हात–डोकें—अपूर्व त्रिवेणी-संगम! हा जर पुढें टिकला असता तर महाराष्ट्राचा इतिहास कांहीं निराळाच झाला असता. पण महाराष्ट्रांतील पंचनद्या ज्याप्रमाणें महाबळेश्वराच्या एका कोंनाड्यांतून एकत्रपणें जन्म घेतात आणि पुढें मात्र कृष्णा एकीकडे, कोयना दुसरीकडे, वेण्या तिसरीकडे अशी त्यांची पांगापांग होते, क्वचित् प्रसंगीं विरोधहि होतो, तसाच प्रकार या तीन महापुरुषांच्या जीवनांत घडून आलेला दिसतो.

वाढत्या उत्साहानें व चढत्या कर्तृत्वानें ही देशभक्तांची जोडी आपली शाळा व आपलीं वर्तमानपत्रें पुन्हां एकदिलानें चालवूं लागलीं. १८८३ च्या डिसेंबर महिन्यांत कोल्हापूरचे दुर्दैवी छत्रपती अहमदनगरला मृत्यु पावले. एका गोऱ्या संरक्षकाशीं मारामारी होऊन त्यांत त्यांचा अंत झाला. ही बातमी कानीं पडतांच आगरकरांचें मन कावरेंबावरें व उदास झालें. ज्याचा कैवार घेतल्यामुळें आपल्याला तुरुंगाचे हाल सोसावे लागले तो महाराष्ट्राचें मानस्थान असलेला छत्रपति अशा अनुकंपनीय अवस्थेंत निधन पावावा याचा चटका आगरकरांच्या सरल व कोमल अंतःकरणाला तीव्रतेनें झाला. आपल्या चित्ताचा हा चडफडाट पर्यायानें व्यक्त करतांना आगरकर ता. २२ जानेवारी १८८४ च्या केसरींत लिहितात, “आतां जो दत्तक घ्यावयाचा तो बराच मोठा झालेला मुलगा घेतला म्हणजे तो वेडा आहे कीं नाहीं, पुरुष आहे किंवा नाहीं, आई पाहिल्याबरोबर चवताळतो किंवा नाहीं, वगैरे गोष्टींची चिकित्सा करण्यास नीट होईल. थोडासा निबर असा मुलगा पाहून घेतल्यास कांहींसा खाष्ट व अडाणी मिळेल खरा, पण मग त्याला घोड्याचे चाबूक खाण्याची किंवा वाढलेल्या प्लीहेवर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दाब बसल्यानें डोळे पांढरे होऊन प्राणोत्क्रमण होऊं लागले असतां, तीर्थोदकाच्या ऐवजीं ग्रीनच्या हातची व्हिस्की पिण्याची पाळी येणार नाहीं."

लोकसेवेच्या या पहिल्या अग्निदिव्यांतून टिळक-आगरकर मोठ्या यशानें व वाढत्या तेजानेंच बाहेर पडले आणि त्यामुळें त्यांना महाराष्ट्रांत मोठ्या मानाचें स्थान प्राप्त झालें.

• • •

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मतभेदाचे अंकुर : : ४

विष्णुशास्त्र्यांचें अकालीं निधन आणि कोल्हापूर प्रकरणीं तुरुंगवास या दोन अस्मानीसुलतानींतून टिळक–आगरकर शीरसलामत बाहेर पडलें आणि एकजुटीनें, एकदिलानें, एकाच कार्याचा पुरस्कार पुनः करूं लागले. महाराष्ट्रांत हें उदाहरण अलौकिक होतें–दृष्ट लागण्यासारखें होतें. आणि दुर्दैवानें या जोडीला दृष्ट लागलीहि. टिळक–आगरकरांचीं एकजूट ढासळूं लागल्याचीं चिन्हें १८८४ सालापासूनच दिसूं लागलीं. या दुहीचीं दोन कटु फळें म्हणजे आगरकरांनीं केसरी सोडणें व टिळकांनीं शाळा सोडणें.

महाराष्ट्राला दुहीचा आणि फितुरीचा शापच आहे कीं काय न कळे ! इतर प्रांतांत व अन्य देशांत म्हणजे कांहीं ऐक्याचें व सहकार्याचें पीक तरारून उठतें असें निरपवादपणें सांगतां येणार नाहीं. दोन भांडीं एक-मेकांवर आदळलीं कीं आवाज होणारच, त्याप्रमाणें दोन डोकीं एकत्र आलीं कीं, तीं घासणारच. "व्यक्ति तितक्या प्रकृति आणि प्रकृति तितकीं मतें." एकासारखा दुसरा सांपडणें कठीण. दोन माणसें एके ठिकाणीं आलीं म्हणजे त्यांत मतभेद होणें स्वाभाविकच आहे. त्यांतहि स्वतंत्र विचाराचीं, ठाम निश्चयाचीं, दृढ निष्ठेचीं आणि तेजस्वी वृत्तीचीं दोन माणसें एकत्र आली तर त्यांच्यामध्यें मतांचीं किंवा मार्गाचीं भिन्नता उत्पन्न होणें अगदीं सहज आहे. एक चाबूकस्वार व बाकीचे सारे शेळ्यामेंढ्या,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कुत्रीं–माकडें अशा स्थितींत राहणारा एकोपा काय किंमतीचा ? स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असलेल्या दोन व्यक्तींत कांहीं ना कांहीं भेद निर्माण होणें मनुष्य–स्वभावधर्म आहे. पण त्या मतभेदाचें पर्यवसान द्वेषांत, मत्सरांत, कलहांत होऊन अंगीकृत अशा समान ध्येयाच्या व कार्याच्याच ठिकऱ्या उडाव्यात हें मात्र शहाणपणाचें लक्षण नव्हे. अशा ठिकऱ्या उडविणारी फुटीर वृत्ति महाराष्ट्राइतकीं इतर ठिकाणीं फोंफावते कीं काय याचा विचार व्हावा, महाराष्ट्र हा मुख्यत: खडकाळ व नापीक मुलूख. त्यामुळें महाराष्ट्रीय लोक जात्या दरिद्री. दारिद्र्यामुळें बुद्धीची समशेर सदा परजलेली. म्हणून बौद्धिक समशेरींचीं आपटाआपट व खणाखणी महाराष्ट्रांत अधिक. त्या बौद्धिक समशेरींचे घाव चुकविण्यास ज्या प्रेम-भावनेची ढाल उपयोगी पडते त्या भावनेचा महाराष्ट्रांत दुष्काळ. अशी महाराष्ट्रांतील बेकीची मीमांसा कांहीं जाणते लोक करतात. पण गणितासारख्या सूक्ष्म विषयांत कुशाग्र बुद्धि चालविणाऱ्या मद्रासी लोकांची बुद्धि काय कमी तीक्ष्ण किंवा तिखट मानावी काय ? तसाच तो बंगाल. रामतीर्थ, विवेकानंद, अरविंद, रवींद्रनाथ, जगदीशचंद्र, सुभाषचंद्र यांसारखीं अमोलिक मोलाची एकेक नररत्नें ज्या वंगभूमीच्या कुशींत जन्मास आलीं तीं काय बौद्धिक दृष्ट्या वंध्या समजावयाची ? पण महाराष्ट्राच्या बुद्धीची गतीच वांकडी ! मराठ्यांच्या इतिहासापासून आतांपर्यंत आपापसांतील द्वेष, मत्सर, कलह यांना ऊत आलेला दिसतो. आणि शौर्य तर असें आंधळें कीं, कालचा आपला भाऊ आपल्या मनाविरुद्ध वागूं लागला कीं त्यांचें मुंडकें उडविण्याची तयारी ! दुसऱ्याच्या मतांबद्दल सहिष्णुता राखणें, शक्य तेथें त्याच्याशीं सहकार्य करणें, विशिष्ट ध्येयासाठीं आपल्या आवडी व आग्रह बाजूस सारणें आणि एकेकट्यापेक्षां एकजुटीनें कामें करण्यावर भर देणें हे लोकशाही तत्त्वज्ञानाचे धडे महाराष्ट्राच्या अंगवळणीं जेव्हां पडतील तेव्हांच त्याची ही फुटीर व फितुरीची खुनशी वृत्ति लयास जाईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकशाहीची ही सहिष्णुता व उदारता टिळक-आगरकरांच्या वेळीं जन्मासहि आली नव्हती. त्यामुळें खांद्याला खांदा लावून लढलेले हे दोन वीर परस्परांशीं झुंझण्यासच समोरासमोर येऊन उभे राहिले. या संग्रामाचें आदिकारण स्वभावभेद हे तर उघडच. पण नैमित्तिक कारणें अनेक घडलीं. परंतु तीं सर्व इतकीं क्षुल्लक आहेत कीं, सहकार्याच्या सिंचनानें ते निखारे सहज विझले गेले असते. परंतु आमच्या लोकांच्या हातांत सुईदोऱ्यापेक्षां कात्रीच अधिक वेळां असते. कोठें फाटलेलें दिसलें कीं, तेथें अधिक फाडण्याकडेच कल–शिवण्याकडे नाहीं ! वास्तविक पाहतां अडीअडचणीच्या व हालअपेष्टांच्या प्राथमिक अवस्थेंतून टिळक-आगरकरांची शाळा व पत्रे यशस्वीपणें बाहेर पडलीं होतीं. आणि म्हणूनच कीं काय, त्यांच्यांत भांडण सुरू झालें. लढाईच्या काळांत त्यागानें व जुटीनें लढणारे सैनिक लुटालुटीच्या काळांत एकमेकांच्या उरावर बसतात. पण अडाणी व लोभी सैनिकांपेक्षां ध्येयनिष्ठ पुढाऱ्याकडून उदात्त वर्तनाची अपेक्षा असते.

१८८४सालच्या फेब्रुवारी महिन्यांत मुंबईचे गव्हर्नर सर जेम्स फर्ग्युसन यांनीं न्यू इंग्लिश स्कूलला भेट दिली आणि संतोष प्रदर्शित केला. जनतेनें तर आपल्या प्रेमाचा पाऊसच शाळेवर पाडला होता. त्यामुळें पालकांच्या महत्त्वाकांक्षेला भरती आली. ‘ इंग्रजी शिक्षण स्वस्त करून तें देशांत सर्वत्र पसरावयाचें या कार्यासाठीं मिशनरी संस्थांच्या धर्तीवर केवळ निर्वाहापुरतें वेतन घेऊन पुण्याला शिक्षणसंस्था स्थापावयाची ’ असें ध्येय चिपळूणकर, टिळक व आगरकर यांनीं आपल्या मनाशीं धरलें होतें. त्याप्रमाणें त्यांनीं न्यू इंग्लिश स्कूल काढलें व वाढविलें. त्याची पुढची पायरी म्हणून कॉलेज चालविण्याचा विचार पुढें आला. म्हणून डेक्कन एज्युकेशन सोसायटी ता. २४ ऑक्टोबर १८८४ रोजीं दिवाळीच्या मुहूर्तावर स्थापन करण्यांत आली. त्यासाठीं गद्रे यांच्या वाड्यांत पुण्यांतील प्रमुख नागरिकांची सभा सर विल्यम वेडरबर्न यांच्या अध्यक्षतेखालीं भरली. सोसायटीचे पहिले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ट्रस्टी रा. सा. मंडलिक व प्रि. वर्डस्वर्थ हे दोघे होते. आणि तहाहयात सभासद टिळक, आगरकर, नामजोशी, वामनराव आपटे, वासुदेवराव केळकर, माधवराव गोळे व धारप हे सात जण होते. पुढें नामजोश्यांनीं "कॉलेजला सर्वांनीं साहाय्य करावें" अशा आशयाचें गव्हर्नराचें पत्र मिळविलें. मात्र त्यासाठीं त्यांना भलतीच किंमत द्यावी लागली. ती म्हणजे निघणाऱ्या कॉलेजला फर्ग्युसन साहेबांचें नांव देणें. आपल्या सहकाऱ्याचा सल्ला न घेतां नामजोश्यांनीं गव्हर्नरांना "नामांकित" करण्याचें अभिवचन देऊनहि टाकलें. त्यांत त्यांचा हेतु कॉलेजला आवश्यक निधि गोळा करण्याचा होता. तो बऱ्याच प्रमाणांत सफळहि झाला. कॉलेज काढण्याला मुंबई विद्यापीठानें डिसेंबर महिन्यांत परवानगी दिली. आणि १८८५ सालीं जानेवारी महिन्यांत फर्ग्युसन कॉलेजचा प्रिव्हियसचा वर्ग गद्रे यांच्या वाड्यांत सुरू झाला. कॉलेजचे प्रिन्सिपल म्हणून वामनराव आपटे यांची नेमणूक झाली.

पांच वर्षांच्या अल्पावधींत शाळेची कळी फुलली आणि कॉलेजचें फूल दिसूं लागलें. याच वर्षी गोपाळराव गोखले सोसायटीला येऊन मिळाले. दोन वर्षें शाळेंत शिकविल्यावर १८८७ सालापासून ते कॉलेजांत शिकवूं लागले. गोपाळराव आगरकरांप्रमाणेंच गोपाळराव गोखलेहि गरिबीच्या दुर्गम घाटांतून वर चढूनच शिक्षणाच्या घाटमाथ्यावर येऊन उभे राहिले होते. त्यांची मुद्रा मोहक, वाणी मधुर, बुद्धि तीव्र आणि इंग्रजीवरील प्रभुत्व तर केवळ असामान्य. इंग्रजींतील उताऱ्याच्या उतारे पाठ करून त्यांनीं वक्तृत्वकला वश करून घेतली होती. वयाच्या २१ व्या वर्षी ते बी. ए. झाले. आणि कॉलेजांत प्राध्यापकाचा झगा घालून उभे राहिले ते अवघ्या चोविसाव्या वर्षी. टिळक-आगरकर व गोखले या तीन देशभक्तांचें शिष्यत्व लाभलेली पिढी किती भाग्यवान् गणावी ! महाराष्ट्राच्या भाग्यानें एकाच वेळीं हे तीन देदीप्यमान तारे उदयास आले आणि सोसायटीच्या सुदैवानें हा तारकापुंज तिला लाभला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टिळकांचें शिकवणें बुद्धिमान् विद्यार्थ्यांला आवडे. गणितांतील पायऱ्या ओलांडून ते भराभर शिकवीत चालले म्हणजे सामान्य विद्यार्थ्यांची फरफट होई. त्यांचा स्वभावहि करडा असे. पण आगरकरांचें शिकवणें सर्व-सामान्य विद्यार्थ्यांनाहि झेपण्यासारखें असे. त्यांच्या नास्तिक मताशीं उभा दावा बाळगणारे ह. भ. प. पांगारकरांसारखे विद्यार्थीहि त्यांच्या अध्यापनावर खूष असत. इतिहासासारखा रुक्ष विषयसुद्धां आगरकर गोडीनें व गमतीनें शिकवीत. विद्यार्थ्यांनीं कांहींहि शंका विचारल्या तरी त्यांचें समाधान ते शांतपणानें करीत. स्वतः दम्यानें जर्जर झाले असतांहि त्यांच्या प्रसन्न मुद्रेंतून विनोदाचे तुषार उडत असत. इंग्रजी साहित्य शिकवितांना तर त्यांच्या वाणीला उधान येत असे. मेकॉलेच्चीं फक्त अकरा पानें शिकविण्यास आगरकरांना सबंध एक वर्ष लागलें. " रॅसेलस "च्या एका वाक्यावर एक आठवडा त्यांनीं खर्चीं घातला. त्यांचा प्रांजळपणा इतका पारदर्शक असे कीं इंग्रजींतील कांहीं शंका स्वतःला न उलगडल्यास ते वासुदेव-राव केळकर यांना विचारीत, आणि तसें आपल्या वर्गांत स्वच्छ बोलून दाखवीत. तासाच्या टोल्याचें भान आगरकरांना सहसा राहात नसे.

त्या वेळचे विद्यार्थी वयानें बरेच मोठे असत. कांहीं जण तर दोन दोन, तीन तीन मुलांचें पितृत्व पदरीं बांधूनच प्रवेशपरीक्षेस बसत. या वाढत्या वयांत धूम्रपानादि व्यसनें असत. त्या वेळीं इंग्रजी शिकणारांना मान व धन कल्पनेबाहेर मिळे. पदवीधरांची मिरवणूकसुद्धां निघे. सरकारी नोकरींत त्यांच्यावर पैशाचा सडा पडे. त्यांनीं साहेबाचें विलासी जीवन पाहिलेलें–वाचलेलें असे. त्यामुळें मद्यपानादि विलासांचें भूषण मानण्यांतच अव्वल इंग्रजींतील पहिल्या कांहीं पिढ्या गेल्या. या अधोगामी प्रवृत्तीला शास्त्रीबुवांनीं भीमटोला हाणला हें खरें. साहेबी पोषाक, इंग्रजी वक्तृत्व, मांसाहार व मद्यपान इत्यादि चट सार्‍या पाश्चात्यांच्या उसन्या ऐश्वर्याची प्रतिष्ठाच मुळीं शास्त्रीबुवांनीं काढून घेतली. तरीसुद्धां शाळा–कॉलेजांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांहीं कांहीं व्यसनें कोठें कोठें दबा धरून होतींच. कॉलेजमध्येंच काय पण न्यू इंग्लिश स्कूलमध्येंहि दोन चार प्रौढ विद्यार्थ्यांनीं "शांकरी"चें आराधन करण्यास सुरवात केली होती. शाळेंतील एका कोनाड्यांत गांजाचें सारें साहित्य होतें. आगरकरांनीं तें उघडकीस आणलें. पण विद्यार्थ्यांवर न रागावतां त्यांनीं त्यांना गांजाचे दुष्परिणाम समजावून सांगितले. परिणाम असा झाला कीं, विद्यार्थ्यांनीं "पुन्हा असें करणार नाहीं" अशी शपथ घेतली व ती पाळली.

विद्यार्थ्यांना नवीन मतें, तत्त्वें व विचार सांगतांना आगरकरांना विलक्षण स्फुरण चढे, व त्यांच्या चेहऱ्यावर सात्त्विक आनंदाची लकेर झळके. विद्यार्थ्यांच्या मठ्ठपणामुळें त्यांना अतिशय राग आला तर टेबलावर बुक्की आपटून ते एवढेंच म्हणत, "तुला या गोष्टी आज समजत नाहींत, पण पुढें कळून येतील." राग आल्यानंतर "दोन मिनिटांच्या आंतच आपल्या विशाल मिशांतून ते फार गोड हसत. त्याबरोबर सर्व मुलांचें हास्य मिसळलें जाऊन साऱ्या वर्गांत जो निर्मळ आनंद टिके त्याची कल्पना आगरकरांच्या विद्यार्थ्यांवांचून इतरांस होणें कठीण." असा स्वानंदसुखाचा अनुभव पांगारकरांनीं वर्णिला आहे. "इतका शिष्यजन-प्रिय गुरु विरळाच सांपडेल" अशी प्रशस्तीहि पांगारकरांनीं आगरकरांची केली आहे.

विद्यार्थ्यांची अशी अलोट भक्ति, जनतेचें अपरंपार प्रेम, सरकारी अधिकाऱ्यांची मुक्तकंठ प्रशंसा आणि सहकाऱ्यांमधील शुद्ध बंधुभाव— अशा चौफेर यशाचा वर्षाव टिळक–आगरकरांच्या शाळा-कॉलेजांवर होत होता. लाखों रुपयांनींहि ज्याचें मोल करतां येणार नाहीं अशी ही त्यांची संपदा दिवसादिवसाला वृद्धिंगत होत होती. पण बाहेरून फुला-फळांनीं डंवरलेल्या वृक्षाला आंतून बुंध्याशींच कीड लागावी आणि ती पुढें वाढत वाढत जावी तशी आपत्ति १८८४ सालापासून सुरू झाली. त्या वर्षीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ऑक्टोबर महिन्यांत डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्थापन झाली. सोईसाठीं केसरी-मराठा हीं वर्तमानपत्रें खाजगी मालकीचीं ठरविण्यांत आलीं. या वर्तमानपत्रांतून सर्वसामान्यपणें सोसायटीच्या बहुतेक सभासदांना संमत अशींच मतें मांडलीं जात. प्रारंभीं मतभेदाचे प्रश्नहि फारसे उपस्थित झाले नाहींत. पण मनुष्य जागा झाला म्हणजे त्याचे सर्वच अवयव ज्याप्रमाणें हालचाल करूं लागतात, त्याप्रमाणें जागृत समाजाचीं मतें विविध अंगांनीं प्रगट होऊं लागतात.

बालविवाह या विषयावर १८८४ सालीं मोठें रण माजलें. त्याला निमित्त काय? तर मुंबईतील मलबारी शेट यांनीं सरकारला बालविवाहप्रतिबंधाचा कायदा करण्याविषयीं लकडा लावला. कायदा होईपर्यंत, बालविवाह केलेल्या मुलाला विद्यापीठाच्या परीक्षेस बसूं देऊं नये आणि सरकारी नोकरीवर लावून घेऊं नये अशीहि मागणी त्यांनीं केली. बालविवाहाला पाठिंबा देणारें सोसायटीच्या तरुण सत्तकांत कोणीच नव्हतें. पण तो बंद करण्यासाठीं परक्या सरकारनें कायदा करावा काय? याबद्दल मतभेद सुरू झाला. बालविवाहाच्या निमित्तानें आमच्या धार्मिक चालीरितींत विधर्मी राज्याच्या कायद्यानें एकदां चंचुप्रवेश केला, म्हणजे मग तो कायदा आमच्या घरांत कोठपर्यंत शिरेल याचा नेम नाहीं. अशी भीति या कायदाविरोधकांना वाटत होती. उलटपक्षीं अशा समाजसुधारणा त्वरित घडून आल्या पाहिजेत, तरच आमच्यांतील अल्पायुष्य, बालवैधव्य, स्त्रीदास्य वगैरे दोषांचा नायनाट होईल, असे विचार कांहीं सभासदांच्या डोक्यांत उसळ्या मारीत होते.

" टाकीपासून दगड झिजविणें देखील सोपें. पण उपदेशानें लोकांचे दुराग्रह काढणें फार दुस्तर, " असें मत केसरीनें पहिल्या वर्षीच प्रगट केलें होतें. " वर्तमानपत्रांनीं कितीहि रड गाइली म्हणून हट्टी व मूर्ख लोकांची कशी समजूत पडणार ? " असा निराशेचा व दीनवाणा प्रश्न

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टाकून आगरकरांनीं बेंटिंक साहेबांनीं कायद्यानें सती बंद केल्याचा दाखला केसरींत दिला होता. मुंबईत माधवबागेंत सरकारकडे कायदा करणाऱ्या-विरुद्ध अर्ज पाठविण्यासाठीं एक मोठी सभा भरली. त्या सभेंत श्री. तेलंग यांनीं मूळ ठरावाला अशी उपसूचना मांडली कीं, " बालविवाह व असंमत वैधव्य यासंबंधानें कायदा करण्याचा सरकारचा जो हेतु त्याविरुद्ध हिंदुस्थान सरकारकडे अर्ज पाठवावा, पण त्या अर्जांत असें लिहावें कीं, बालविवाह व असंमत वैधव्य या दोहोंपासून होणारे वाईट परिणाम आम्हांस पूर्णपणें ठाऊक आहेत, पण ते आमचे आम्हींच सुधारले पाहिजेत. सरकारनें त्यांत हात घातल्यास उलट नुकसान होईल." ही उपसूचना सभेंत बहुमतानें नामंजूर झाली. केसरींत नंतर जो अग्रलेख आला तोहि तेलंगांच्या उपसूचनेविरुद्ध होता. ता. १८ नोव्हेंबर १८८४ च्या केसरींत बालविवाहाच्या कायद्याला अनुकूल व प्रतिकूल असे दोन्ही लेख छापून आले. पुढें १६ डिसेंबरच्या अंकांत आगरकरांनीं कायद्याचा पाठ-पुरावा करणारा आपला लेख प्रसिद्ध केला, पण तो स्वतःच्या सहीनें. " बालविवाहाच्या निषेध-साधनाविषयीं त्यांचे व त्यांच्या मित्रांचे विचार जुगत नसल्यानें " केसरीच्या संपादकावर स्वतःच्याच पत्रांत स्वतःच्या नांवावर लेख लिहिण्याचा प्रसंग ओढवला.

या सामाजिक बाबतींतील मतभेदाशिवाय इतर लहान लहान कारणां-वरूनहि सोसायटींत तंटेबखेडे माजले. आपल्या कॉलेजला फर्ग्युसन या साहेबाचें नांव द्यावें, सरकारची ग्रँट घ्यावी इत्यादि योजनांवरूनहि मतभेद निर्माण झाले. सोसायटीच्या मुख्य तत्त्वासंबंधींच जेव्हां दुमत झालें तेव्हां तर या भांडणांना अत्यंत उग्र स्वरूप आलें. मिशनरी संस्थां-च्या धर्तीवर सर्व महाराष्ट्रभर शाळांचें जाळें पसरावयाचें आणि शिक्षणाची राष्ट्रीय पद्धत सुरू करावयाची, निर्वाहाला जरूर तेवढेंच वेतन घ्यावयाचें आणि आपली सर्व बुद्धि व सर्व शक्ति केवळ याच शिक्षणप्रसाराच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व राष्ट्रनिर्मितीच्या कार्यांत खर्च करावयाची अशा त्यागमय व सेवापूर्ण भूमिकेवरून न्यू इंग्लिश स्कूल स्थापन करण्यांत आलें होतें. त्याला पुढें वृत्तपत्रांची व कॉलेजची जोड दिली, तीहि याच मूळ हेतूच्या विकासासाठीं. सोसायटींतील सभासदांनीं समर्थ रामदासांच्या शिष्याप्रमाणें विरक्त वर्तन व अव्याभिचारी निष्ठा ठेविली पाहिजे, त्यांनीं शाळेबाहेरचे उद्योग अंगावर घेऊं नयेत आणि स्वतःसाठीं निराळें द्रव्यार्जन करूं नये असा टिळकांचा आग्रह. आणि तो अगदीं खडकासारखा खंबीर व पोलादासारखा टणक. पण एखादा ऋषी सर्वसंगपरित्याग करून, रानांत जाऊन, ईश्वराच्या साक्षात्कारासाठीं अन्न वर्ज्य करून तपश्चर्या करीत बसला तर त्या तपश्चर्येचा भंग करण्यासाठीं इंद्राकडून अप्सरा पाठविल्या जात असत, या पौराणिक कथेचा अनुभव सोसायटींतील ध्येयवादी सभासदांना आला.

प्रारंभीं निर्वाहापुरतें वेतन सभासदांना मिळे. विशेष अडचणींच्या वेळीं सभासदांना देणगीहि देण्यांत येई. हें वेतन साधारणतः ३०–४० रुपयेच होतें. टिळकांनीं तर पहिल्या वर्षी तें अल्पसें वेतनहि घेतलें नाहीं. पुढें "आमचें वेतन आमच्या गरजांप्रमाणें न ठरवितां शाळेच्या सांपत्तिक स्थितीवरून ठरवावें" अशी सूचना आगरकरांनीं आणली. गरजेप्रमाणें देणगी देण्याऐवजीं सर्व तहहयात सभासदांना पांच रुपये पगारवाढ द्यावी अशी योजना सोसायटीपुढें आली. मात्र त्या दिवसापर्यंत ज्यांनीं कमी पैसे घेतले होते त्यांची भरपाई करण्यांत यावी असेंहि सुचविलें गेलें. जुन्या सभासदांनीं सुरवातीच्या काळांत केवळ ध्येयबुद्धीनें जो स्वार्थत्याग केला त्याचा हा विक्रय टिळकांना साफ नापसंत होता.

आणखी एक कलहाची बाब म्हणजे प्रि. आपटे यांनीं संस्कृत–कोश लिहून दोन-तीनशें रुपये मिळविले. पुढें गोखल्यांनींहि अंकगणित लिहिलें. हें सर्व धोरण सभासदांच्या बहुमतानें, लोकशाहीच्या तत्त्वाप्रमाणें आंखलें जात असलें, तरी संस्थेच्या आधारभूत तत्त्वांनाच सुरुंग लावणारें आहे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असा टिळकांचा ठाम निश्चय झाला. यामुळें सभासदांचीं मनें शुद्ध राहिलीं नाहींत. जेथें तेथें बारीकसारीक कृत्यांत मतभेद दिसूं लागले आणि त्यां मामुली मतभेदांतून कलहांचें कोलाहल माजूं लागलें. सामाजिक विषयांच्या बाबतींत आगरकरांचा कोंडमारा होत होताच. त्यांतच संस्थेंतल्या या कटकटीमुळें ते त्रासले आणि त्यांनीं आपलीं मतें स्वतंत्रपणें मांडण्यासाठीं नवीन वर्तमानपत्र काढण्याचें ठरविलें. सोसायटीच्या कारभाराचे बाबतींत सभासदांचें बहुमत टिळकांविरुद्ध होतें. कारण टिळकांची भूमिका त्यागाची होती. पण सामाजिक वादांत हे बहुमत आगरकरांविरुद्ध होतें. कारण बहुतेक सभासद पुराणमताभिमानी होते. आगरकरांची लहानपणापासूनची बंडखोर वृत्ति सुस्थितींत वाढलेल्या इतर सभासदांच्या अंगीं कोठून येणार! त्यांचे क्रांतिकारक विचार सर्वांनाच मानवण्यासारखे नव्हते. तेव्हां त्यांनीं केसरींत कांहीं लिहिलें कीं, त्याबद्दल सभासदांमध्यें कुजबूज चाले.

या मानसिक यातना नाहींशा करण्यासाठीं आगरकरांनीं ता. २५ ऑक्टोबर १८८७ रोजीं केसरी सोडला. १८८१ सालापासून सात वर्षें आपण वाढविलेल्या, त्या काळांत त्याच्या जोपासनेसाठीं स्वतःचें रक्त शिंपलेल्या आणि त्याच्या सेवेमुळेंच प्रत्यक्ष तुरुंगवास भोगून लोकप्रियतेस चढविलेल्या केसरीच्या पृष्ठभागावरून खालीं उतरतांना आगरकरांना किती मनःक्लेश झाले असतील! कोणत्याहि संस्थेच्या प्रारंभिक काळांत चालकांना जो घाम गाळावा लागतो त्याची किंमत कोणत्याच नाण्यांनीं करतां येणें शक्य नाहीं. पण संस्थेंत नवीन आलेल्या सभासदांनीं तांत्रिक बहुमताच्या बळावर संस्थापकालाच अर्धचंद्र दिल्याचीं उदाहरणें महाराष्ट्रांत तरी थोडींथोडकीं नाहींत. आगरकरांनीं आपल्या मतस्वातंत्र्यासाठीं नवीन पत्र काढलें तरी ते सोसायटींत होते आणि शाळा-कॉलेजांत शिकवीत होते. केसरी सोडल्यानंतरहि आगरकरांनीं " फीमेल हायस्कुलांतील शिक्षणक्रम " या नांवाचे लेख केसरींत " लि. आ. म. " या सदराखालीं लिहिले. त्यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खुद्द केसरीच्याच धोरणावर टीका होती. पण अशा सासुरवासांत आगरकरांची उफाडयाची लेखणी किती दिवस काढणार ?

१८८८ सालीं दसऱ्याच्या सुमुहूर्तावर आगरकरांनीं आपले नवे विचार मांडण्यासाठीं "सुधारक" नांवाचें साप्ताहिक वर्तमानपत्र काढिलें. बुद्धिवादी आगरकरांनीं दसऱ्याचा धार्मिक मुहूर्त कां निवडावा ? अशी शंका कोणास येणें साहजिकच आहे. फलज्योतिष्याची रेवडी उडविणाऱ्या नाटकाचा पहिला प्रयोग ज्योतिष्यानें काढून दिलेल्या मुहूर्तावर, घटका–पळें बरोबर साधून, सुरू व्हावा, तसाच हा हास्यास्पद प्रकार कोणास वाटेल. पण दसरा, संक्रांत वगैरे सण जितके धार्मिक तितकेच सामाजिक झाले आहेत. जेव्हां लोकांना सुट्टी असेल, त्यांच्या मनोवृत्ति उल्हसित असतील आणि समाजांत एकंदर वातावरण आनंदाचें असेल अशा वेळेला आपलें वर्तमानपत्र सुरू करण्यांत आगरकरांनीं आपल्या बुद्धिवादाशीं द्रोह केला असें म्हणतां येत नाहीं. सुमारें सात वर्षें केसरीच्या आखाडयांत लेखनाची तालीम करून पीळदार व मजबूत बनलेल्या आगरकरांच्या लेखणीनें सुधारकांचा अंक काढला तो मोठा आकर्षक रीतीनें. केसरींत आगरकर वर्षांतून सामाजिक विषयावर १५–२० लेख लिहीत असत. पण आतां काय ! स्वतःचें पत्र त्यांत पूर्ण स्वातंत्र्य. त्यांचा मनोविहंग पिंजऱ्यांतून मोकळा झालेला वाटेल त्या विषयांत हवें तितकें उंच तो भराऱ्या मारूं लागला.

"इष्ट दिसेल तें बोलणार व शक्य असेल तें करणार."

हें 'सुधारकाचें' ब्रीदवाक्य. "क्षुद्रलोकांच्या अवकृपेला, रागाला किंवा उपहास्यतेला यत्किंचित् न भितां आपल्या मनास योग्य वाटेल तें लिहावें, बोलावें व सांगावें...त्यांतच जगाचें हित आणि जन्माची सार्थकता आहे." ही आगरकरांची भूमिका. "कोणीतरी अस्तित्वांत असलेल्या लोकमतांतील दोषस्थळें दाखविण्याचें व समाजांतील बहुतेक लोकांस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अप्रिय परंतु पथ्यकारक असे विचार त्याच्यापुढें आणण्याचें, अनभिमत काम करण्यास तयार झालेंच पाहिजे. असें करण्यास लागणारें धैर्य ज्या समाजांतील कांही व्यक्तींच्यासुद्धां अंगीं नसेल त्या समाजानें वर डोकें काढण्याची आशा कधींहि करूं नये." अशा धैर्यशाली कार्याचें कंकण आगरकरांनीं स्वेच्छेनें जाणूनबुजून आपल्या हातीं बांधलें. त्यांच्या मुक्त मनाचा रम्य आविष्कार 'सुधारकांत' पहिल्या अंकापासूनच दिसून येऊं लागला. जगांतील प्रमुख देशांचें भौतिक व सामाजिक असे दोन चित्रपट केले तर हिंदुस्थानचें स्थान कोठें राहील याचें मोठें मार्मिक वर्णन आगरकरांनीं पहिल्या अंकांत केलें आहे. विस्तृतता, बहुविधता, मनोरमता, अद्भुतता, उपयुक्तता व विपुलता या गुणांत आपला देश उत्तम आहे. पण "इंग्रजी होईपर्यंत आमचें सारें व्यक्तिजीवित्व व राष्ट्रजीवित्व ठशांत घालून ओतलेल्या पोलादासारखें किंवा निबड शृंखलाबद्ध बंदिवानासारखें, अथवा उदकाच्या नित्य आघातानें दगडाप्रमाणें कठीण झालेल्या लाकडांसारखें किंवा हाडकासारखें शेंकडों वर्षे होऊन राहिलें" ही देशाची शिलावस्था फोडून काढण्यासाठीं आगरकरांनीं आपल्या लेखणीचे घावांमागून घाव घातले.

"मूळ प्रकृति म्हणजे भारतीय आर्यत्व न सोडतां' पाश्चिमात्य नवीन शिक्षणाचा व त्याबरोबर ज्या नवीन कल्पना येत आहेत त्यांचा आम्ही योग्य रीतीनें अंगीकार करीत गेलों, तरच आमचा निभाव लागणार आहे." ही आगरकरांची सुधारणावादाची भूमिका अत्यंत समतोल व समुचित आहे. पण "मूळ प्रकृति न सोडतां" हें पथ्य पुढें माजलेल्या वाद-संग्रामांत त्यांच्याकडून फारसें पाळलें गेलें नाहीं. आणि याचें कारणहि "सुधारक काढण्याचा हेतु" या त्यांच्या पहिल्या लेखांतच सांपडण्या-सारखें आहे. "समाजाचें कुशल राहून त्यास अधिकाधिक उन्नतावस्था येण्यास जेवढीं बंधनें अपरिहार्य आहेत तेवढीं कायम ठेवून बाकी सर्व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गोष्टींत व्यक्तिमात्रास (पुरुषास व स्त्रीस) जितक्या स्वातंत्र्याचा उपभोग घेतां येईल तितका घ्यावयाचा हें अर्वाचीन पाश्चिमात्य सुधारणेचें मुख्य तत्त्व आहे. हें ज्यांच्या अंतःकरणांत बिंबलें आहे त्यांना आमच्या समाजव्यवस्थेंत अनेक दोषस्थळें दिसणार आहेत, हें उघड आहे. हीं दोष-स्थळें वारंवार लोकांच्या नजरेस आणावीं, तीं दूर करण्याचे उपाय सुच-वावे आणि युरोपीय सुधारणेंत अनुकरण करण्यासारखें काय आहे तें पुनः पुनः दाखवावें यास्तव हें सुधारकपत्र काढलें आहे." या प्रतिज्ञेंतील दोषस्थळें दाखविण्याचा भाग हा अप्रियता मिळवून देणारा आहे. आपल्या प्रकृतीला हितकारक असें औषध पाजणारा हातहि रोगी माणसांकडून झिडकारला जातो आणि नदींत गटंगळ्या खाणारा गृहस्थ आपल्याला वांचविणाऱ्या माणसालाच बुडवूं पाहतो. तसाच कांहींसा अनुभव आगरकरांच्या वांट्यास आला. हिंदुसमाजाच्या दोषदर्शनावर त्यांनीं एकांतिक भर दिला आणि त्या दोषांचा आविष्कार बंडखोराच्या बेसुमार आवेशानें केला. गुणदोषांची मीमांसा आणि ती व्यक्त करणारी भाषा या दोन्ही बाबतींत तोल संभाळणें म्हणजे सर्कशींतील बारीक तारेवर नाचत जाण्याइतकेंच बिकट होय!

या पहिल्याच लेखांत आगरकरांनीं लोकांच्या दोषांचें किंवा दुराग्रहाचें 'संवरण किंवा मंडन' करणाऱ्या लोकाग्रणीवर दांतओठ खाऊन हल्ला केला. 'धर्मभोळ्या टवाळयांच्या पर्वतप्राय झुंडीच्या झुंडी तुटून पडल्या' तरी त्याची पर्वा न करतां, "सत्य बोलणें व सत्यास धरून चालणें." हें धोरण धीरोदात्तपणाचें तर खरेंच. पण पूर्वीं केसरींत त्यांनींच म्हटल्याप्रमाणें "लोकांस सोडून देऊन अरण्यांत तर रडत बसावयाचें नाहीं ना!" श्री समर्थांनीं म्हटल्याप्रमाणें "मुलांचे चालीनें चालावें। मुलांच्या बोलीनें बोलावें ॥" हाच समाज सुधारण्याचा संथ पण शाश्वतचा मार्ग होय. खुद्द आगरकरांनींच या बाबतींत निरपवाद सिद्धांत लिहून ठेवला आहे. तो असा कीं, "ज्या कोणास चांगल्या मतांचा प्रसार करणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असेल, त्यांनीं आपला सर्व राग आपल्यापाशींच गिळून टाकून लोकांचा तिरस्कार न करतां त्यांच्यापुढें त्या मतांचें नित्य प्रतिपादन केलें पाहिजे."

आतांपर्यंत मानवजातीची जी सुधारणा झाली ती मूर्तिभंजकापेक्षां मिशनऱ्याच्या कार्यानेंच अधिक झाली आहे. मिशनऱ्यांतहि दोन प्रकार कसे असतात याची एक बोधप्रद कथा आहे. आफ्रिकेसारख्या मागासलेल्या देशांत एक वृद्ध मिशनरी आपल्या मुलाला घेऊन खिस्ती धर्माचा प्रसार करण्यासाठीं गेला. तेथील अडाणी लोकांच्या कांहीं टोळ्यांत बापानें प्रचारास सुरवात केली व कांहीं टोळ्यांत मुलानें व्याख्यानें देण्यास आरंभ केला. रोज रात्रीं तो मुलगा बापास भेटून असें रडगाणें सांगे कीं, "मीं कितीहि जीव तोडून प्रचार केला तरी पालथ्या घड्यावर पाणी! एकहि माणूस आपल्या धर्मांत यावयास तयार होत नाहीं." म्हाताऱ्याच्या प्रचाराला मात्र भराभर फळें येत होतीं.–नवीन नवीन माणसें खिस्ती धर्माच्या कळपांत आनंदानें उड्या घेत होतीं. "या भेदाचें कारण काय?" असें मुलानें विचारलें. तेव्हां बाप म्हणाला, "तूं त्या लोकांचे केवळ दोष सांगून त्याबद्दल त्यांना शिव्या देतोस, आणि 'तुम्ही तुमच्या रानटी धर्मांतच राहिलांत तर नरकांत कायमचें खितपत पडाल' असा शाप देतोस. पण मी त्यांना गोड बोलून, त्यांचे दोष जाणून पण पोटांत घालून, अशी मधुर आशा दाखवितो कीं, 'तुम्ही खिस्ती धर्मांत याल तर स्वर्गसुखाचें ताट तुमच्यापुढें वाढून ठेवलेलें आहे.' आशय तोच. पण मात्रा भिन्न.

आगरकरांचें वय 'सुधारक' काढला तेव्हां ३२ वर्षांचें होतें. ऐन तारुण्यांत त्यांच्या लिहिण्याचा झोक त्या मिशनऱ्याच्या मुलासारखा असावा यांत नवल काय? खुद्द विष्णुशास्त्र्यांच्या लेखनांतहि वयाच्या अपक्वतेमुळें असें एकांतिकपणाचे दोष काय थोडे आले आहेत? स्वामी दयानंद किंवा लोकहितवादी यांच्यावर त्यांनीं जी घे–घे–मार केली, ती पुढें दहा-पंधरा वर्षें ते जगते तर त्यांना स्वतःलाच रुचली असती काय? आगर-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करांनीं हिंदुसमाजाचीं दोषस्थळें दाखवितांना पायांतील कांटा सप्रादिर्शी ओढून काढावा तसें आवेशाचें कार्य केलें. पण तेथें हवे होते डोळ्यांतील खडा काढणाऱ्याचें सफाईचें कौशल्य! " आमच्या देशांतील व्यक्तींनीं केव्हांहि मोठमोठाले पराक्रम केलेले नाहींत, इतिहासाचें माहात्म्य आम्हांला समजलेलें नाहीं, गेल्या दोन हजार वर्षांत केवळ जीव रक्षणा-पलीकडे आम्ही कांहीं एक केलें नाहीं. " एवढीच भूतकालाविषयीं चुकीची निर्भर्त्सना करून आगरकर थांबले नाहींत, तर " ज्यांना कधींहि चांगला दिवस येण्याची बिलकुल आशा नाहीं " असा निराशेचा सूर भविष्यकाळाविषयीं काढला. " धैर्य नाहीं, उत्साह नाहीं, बळ नाहीं, ज्ञान नाहीं, तर्क नाहीं, उद्योग नाहीं, कला नाहीं, खरा देशाभिमान नाहीं, खरी धर्मश्रद्धा नाहीं, खरें बोलण्याची किंवा खरें आचरण करण्याची संवय नाहीं, सारांश चांगलें असें कांहीं नाहीं." या त्यांच्या नकारघंटेंत सत्य नाहीं, आणि थोडें फार असलें तरी असे चिखलाचे गोळे समाजाच्या पाठीवर व तोंडावर एकामागून एक मारीत गेल्यानें तो समाज सुधारणेचे मार्गा-वर पावलें टाकीत जाईल कसा? " हें भीषण, बीभत्स, अमंगल हिंदुधर्मा " इत्यादि प्रकारचें लेखन करण्यांत क्रांतिकारकाचें शार्य आपण दाखविल्याचें समाधान लेखकास मिळत असलें तरी तें क्षणिक असतें आणि त्याचा हेतु जो समाजसुधारणा करणें त्यावर बोळा फिरविणारें ठरतें. " आपण अध्यात्माचा अतिरेक केला आहे तेव्हां आतां आपला उद्धार होण्यास भौतिकवादाचा आश्रय करणें अवश्य आहे. " अशी मात्रा देणारे विवेका-नंद पुढील पथ्य सांगण्यास विसरले नाहींत. " गेल्या शंभर वर्षांत आपण अतिरिक्त आत्म–निर्भर्त्सना केली. असला तेजोभंग करून कार्यभाग होत नसतो. " असाच समयज्ञ पण समतोल, ओजस्वी पण कार्यक्षम संदेश आगरकरांनींहि आपल्या उत्तर आयुष्यांत दिला असता.

• • •

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुधारकाची शिकवण : : ५

आतां एखादें लहान पोरहि आगगाडींतून मजेनें प्रवास करतें. आगगाडा निघाली त्या वेळची भोळी भीति व आंधळी कल्पना त्या पोरांना कशी कळणार? बोगद्यांतून आगगाडींतून बसून जाण्यास इंग्लंडमध्यें प्रथम कोणी तयारच नव्हतें. उतारूंना भीति अशी वाटे कीं, बोगद्यांत धूर कोंडल्यामुळें आपण गुदमरून मरून जाऊं. हिंदुस्थानांत आगगाडीला देवता मानून इंजिनपुढें नारळ फोडणारे व कोंबडे कापणारे अडाणी लोक थोडे नव्हते! अडाणीच काय शहाणेसुरते लोकहि तारायंत्राच्या तारा पाहतांच कौतुकानें व विस्मयानें रोमांचित होऊन जात. पण आतां! कोणताहि रेम्याडोक्या डोळे मिटून 'कड कट्' करूं शकतो. या यांत्रिक प्रगतीप्रमाणेंच सामाजिक विषयांतील प्रगतीहि कल्पनातीत झालेली आहे. १८८८ ते १८९५ या 'सुधारकाच्या' सतवार्षिक काळांत कोणती समाजस्थिति, विचारस्थिति होती याची बरोबर कल्पना आज येणें कठिण आहे. तेव्हां बालविवाह व बालवैधव्य जारी होतें. प्रौढविवाह व प्रेमविवाह यांचीं वर्णनें केवळ इंग्रजी कादंबऱ्यांत तरुण महाराष्ट्रीय मिटक्या मारीत वाचीत होते. हुंड्याची पद्धीत व सासवांचा जुलूम हीं मोठीं सामाजिक संकटें होऊन बसलीं होतीं. मुलींनीं शाळेंत जाणेंच काय पण जोडा घालणें, छत्री घेणें वगैरे कृत्येंहि 'अब्रह्मण्यम्' मानलीं जात होतीं. कोणी पुनर्विवाह केला किंवा अस्पृश्याला शिवला अथवा खिस्त्या–मुस्लिमाच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ह्यातचा चहा घेतला तर समाजांत केवढा हलकल्लोळ उडे! हे व असले नाना तऱ्हेचे सुधारणेच्या मार्गांतील खडक फोडून काढणें हेंच आगरकरांचें जीवितकार्य होतें—आणि ते त्यांनीं निधड्या धडाडीनें पार पाडलें. 'सुधारकां'मध्यें राजकीय व आर्थिक विषय येत असत. साहित्यविषयक लेखांनाहि अधूनमधून स्थान मिळे. पण मुख्य भर असे सामाजिक विषयावरच. समाजसुधारणेसाठीं आगरकरांचा जीव अष्टौप्रहर तिळतिळ तुटे. आणि म्हणून ते लहानमोठा प्रसंग येतांच त्या विषयावर आंतडें पिळवटून लिहीत.

पाश्चात्य शिक्षणामुळें ज्यांचे डोळे उघडले त्यापैकीं बहुतेकांचे डोळे बाह्य झगझगाटानेंच दिपून गेले. भौतिक सुधारणांचें नवलाईचें रूपलावण्य व नृत्यकौशल्य पाहून आमचें आंग्लशिक्षित विद्वान् तिच्यावर इतके भाळले कीं, आपल्या घरांतील आईकडे त्यांनीं पाठ फिरविली, वेळप्रसंगीं तिला लाथाहि दिल्या. अशी पर-पूजक व आत्म-निंदक विचारांची, तेजोभंग करणारी लाट लोकहितवादी, ज्योतिबा फुले इत्यादि मंडळींनी उठवून दिली. तिकडे उत्तरेंत स्वामी दयानंद किंवा राजा राममोहन रॉय यांनींहि आपल्या समाजाची नाडीपरीक्षा करून त्याचें रोग-निवारण करण्यासाठीं पाश्चात्य पद्धतीचें औषधपाणी दिलें. पण हे क्रांतिकारक गाढ व्यासंग केलेले आणि दूरदृष्टि असलेले महाभाग होते. मात्र महाराष्ट्रांत तशा तोलाचे व विचारसामर्थ्याचे पुढारी निर्माण झाले नव्हते. "मचव्यांतून आले म्हणून मच्छ" असे अकटोविकट ज्ञान ज्योतिबाचें होतें. त्यांचा गुण म्हणजे आपल्या दलित बांधवांची उन्नति व्हावी याविषयीं त्यांना लागलेली तळमळ. पण त्या तळमळीला ज्ञानाचें अधिष्ठान मुळींच नव्हतें. मुख्यतः द्वेषावरच ती तळमळ पोसलेली होती. लोकहितवादी म्हणजे रावबहादूर गोपाळराव देशमुख हे कांहींसे शिकलेले होते. "नुसतें इंग्रजी शिकण्याबद्दल सचैल स्नान केल्यावांचून आपणास आई घरांत येऊं देत नसे," असा आपला अनुभव लोकहितवादींनीं सांगितला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्या काळांत आपल्या देशाची सर्वांगांनीं झालेली विपन्नावस्था पाहून साहजिकच त्यांना हळहळ वाटे. पण त्या विपन्नावस्थेचें मूळ कारण काय आहे याचा शोध लावण्याचें सामर्थ्य त्यांच्या बुद्धीत नव्हतें. साऱ्या अवनतीचें व दोषाचें खापर त्यांनीं हिंदुधर्मावर—त्यांतल्यात्यांत ब्राह्मण-वर्गावर फोडलें. हा त्यांच्या विचारशक्तीचा एकांगीपणाच नव्हे काय? कुत्र्याच्या पाठींत काठी बसली तर कुत्रें त्या काठीलाच चावूं लागतें. पण सिंहाच्या पाठींत काठी बसली तर ती काठी मारणाऱ्या माणसाच्या डोक्यावरच सिंह झडप घालतो आणि त्याची कवटी काडकन् फोडून टाकतो. लोकहितवादी काय किंवा फुले काय, यांना फक्त काठी दिसत होती. काठी मारणारा माणूस दिसत नव्हता. तो माणूस चिपळूणकर—टिळकांनीं ओळखला—आणि त्याच्यावर घावामागून घाव घातले. आतां तो मारेकरी माणूस ठार झाला आहे, त्यामुळें सहस्र दोषांचें वारूळच खणलें गेलें आहे. पण याचा अर्थ त्या माणसाच्या हातांतील जी काठी येथें पडली आहे ती मोडून, तोडून, फेकून द्यावयास नको आहे असें नाहीं. उलट पारतंत्र्याचा मुख्य प्रश्न आज सुटल्यामुळें त्याचें महत्त्व आतां कोणाला वाटत नाहीं. आतां सर्वांचें सर्व लक्ष समाजसुधारणेकडे केंद्रित झालेलें आहे. त्यामुळें लोकहितवादी, आगरकर, फुले वगैरे सुधारकांच्या विचारांना आज चलतीचा काळ आला आहे.

आमच्या देशांतील प्रत्येक व्यक्ती इंग्लंड-अमेरिकेंतील माणसाइतकी तरी नीतिमान् व चारित्र्यसंपन्न कशी होईल आणि आमचा समाज पाश्चात्य समाजाइतका तरी न्यायावर व समतेवर कसा उभारला जाईल याचीच चिंता आज राष्ट्रधुरंधरापुढें उभी आहे. मात्र राजकीय समस्या सुटल्याशिवाय हे सामाजिक प्रश्न सोडविणें जवळजवळ अशक्यच आहे, असाच अनुभव या दोन्ही प्रश्नांना एकदम हात घालणारे महात्मा गांधी यांना आला. 'समाज सुधारला कीं स्वतंत्र होईल. त्याचे अंतर्गत दोष दूर केले कीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाहेरचें पारतंत्र्य नाहींसें होईल, या कल्पना काळाच्या कसोटीस उतरल्या नाहींत. पारतंत्र्यामध्यें व्यक्तिसुधारणा व समाजसुधारणा कांहीं मर्यादेनंतर स्थगित होतात. आणि जोंपर्यंत एखादी साम्राज्यशाही आपल्या व्यापारी लुटीसाठीं दुसऱ्या देशांना अंकित करूं पाहते तोंपर्यंत त्या अंकित देशाची सामाजिक सुधारणा कितीहि झाली तरी त्याला स्वातंत्र्याचा लाभ होणें अशक्यच आहे. आयर्लंड आणि स्कॉटलंड या देशांतील लोक इंग्लंडांत-ल्यापेक्षां कमी सुधारलेले, कमी शिकलेले आहेत काय! पण त्या दोन्ही देशांवरील आपलें अधिराज्य पूर्णपणें काढून घेण्यास इंग्लंड आजहि तयार नाहीं. अखंड राहावें म्हणून आयर्लंडची व स्वतंत्र व्हावें म्हणून स्कॉटलंड-ची राजकीय चळवळ आजमित्तीलाहि चालू आहे.

'आधीं राजकीय कीं सामाजिक?' या वादाचा निर्णय जगाच्या इति-हासानें एकच एक दिला आहे. आणि तो म्हणजे राजकीय स्वातंत्र्याची शुद्ध हवा मिळाल्याखेरीज मनुष्य मात्र जगूंच शकत नाहीं. पण १९ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत परक्या ब्रिटिश सत्तेचे लोखंडी लंगर हिंदुस्थानाला—त्यांतल्यात्यांत इंग्रजी शिकलेल्या पांढरपेशांना—टोंचू लागले नव्हते. त्यामुळें त्यांनीं इंग्रजांच्या भलेपणावर विश्वास ठेवून, ट्रस्टीपणाच्या सोंगाला भुलून आणि आपण इंग्रजांच्या सज्जनपणाच्या परीक्षेंत उत्तीर्ण झालों कीं आपणाला स्वातंत्र्याची प्राप्ति होईल अशा भोळ्या आशेवर विसंबून आगरकरप्रभृतींनीं आपल्या समाजाला सज्जन बनाविण्याचा—म्हणजेच सुधारणेचा—निकरानें प्रयत्न चालविला. त्यांनीं सुधारणावादाला शास्त्रीय बैठक मिळवून दिली. आमच्या अधःपाताचें कारण केवळ ब्राह्मणवर्ग नाहीं—तोहि इतर वर्गांप्रमाणें एकाच जात्यांत दळला जात आहे हें ओळखून त्यांनीं सर्व समाजाची सर्व बाजूंनीं उन्नति करण्याचा चंग बांधला. जॉन स्टुअर्ट मिल्ल याचा उदारमतवाद आणि हर्बर्ट स्पेन्सर याचा जडवाद यांतील समतातत्त्वांचा प्रचार आगर-करांनीं उच्च भूमिकेवरून केला. Subjection of Women हा मिल्लचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ग्रंथ आणि देवदेवतांच्या उत्पत्तिसंबंधीं स्पेन्सरची मीमांसा हें सर्व आगरकरांनीं आपल्या वाचकांच्या कानीं मोठ्या डौलदार आणि आवेशपूर्ण भाषेनें घातलें. सामाजिक दोषांची चिकित्सा मूलगामी पद्धतीनें व शास्त्रीय रीतीनें करणारे आगरकर हेच महाराष्ट्राचे आद्य सुधारक म्हटले पाहिजेत.

त्यांनीं शास्त्रपूत असे जे अनेक सिद्धांत मांडले त्यांतील कांहीं निवडक सिद्धांत पुढें दिले आहेतः—

(१) सर्वांस सारखें, निदान होईल तितकें सारखें, सुख मिळण्याची व्यवस्था होत जाणें म्हणजेच सुधारणा होत जाणें.

(२) एकानें दुसऱ्याचें हित कशांत आहे हें शोधून काढण्यांत जितक्या चुका होण्याचा संभव आहे; त्यापेक्षां लक्षपटीनें कमी चुका ज्याचें त्यानें आपलें हित कशांत आहे, हें शोधून काढण्यांत होणार आहेत. म्हणून राष्ट्राच्या राज्यरीतींत या गोष्टीकडे होईल तितकें लक्ष देणें फार जरूर आहे.

(३) अनियंत्रित एकसत्ता मोडून तिच्या जागीं बहुसत्ताक राज्यपद्धति स्थापणें, जिंकणाऱ्या राष्ट्रांचा अंमल झुगारून देणें, स्थानिक स्वराज्याचा अधिकाधिक विस्तार करणें, गुलामांचा व्यापार बंद करणें, स्त्री-पुरुष, स्वामि-सेवक, गुरु-शिष्य, राजा-प्रजा यांच्यामधील संबंध होतील तितके अन्योन्यांच्या इच्छेवर आणून ठेवणें या सगळ्यांच्या मुळाशीं वर निर्दिष्ट केलेलें तत्त्व आहे.

(४) जोंपर्यंत कोणत्याहि राष्ट्रांतील लोकसमूहांत स्थूलमानानें स्वामी आणि किंकर असे दोनच भाग होऊं लागलेले असतात तोंपर्यंत त्यांत सुधारणेची परमावधि होण्याचा संभव नाहीं.

(५) स्वातंत्र्याचा नित्य अनुभव घेणारा मनुष्य स्वहितपरायण असत नाहीं; इतकेंच नव्हे तर बराच परोपकारी निदान परहितचिंतक तरी असतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(६) सामाजिक नियंत्रण बलात्कार-तत्त्वावर न होतां संमति-तत्त्वावर होऊं लागेल तेव्हांच सामाजिक सुखाची परमावधि होण्याचा संभव आहे.

पूर्वींच्या ऋषीमुनीइतकाच अधिकार व ज्ञान आम्हांला नवीन समाज निर्माण करण्याचें बाबतींत आहे. आणि म्हणून "नवीन ऋत्विग्वर्गाचा अवतार नुकताच झाला आहे," अशी क्रांतिकारकांची आत्मविश्वासाची व आशावादाची भूमिका आगरकरांनीं घेतलेली आहे. "राजकीय स्वातंत्र्य असल्याशिवाय कोणत्याहि देशांत ऐहिक सुखाची परमावधि व्हावयाची नाहीं," हा औपपत्तिक सिद्धांत सर्वमान्य म्हणून आगरकरांनीं दिलेला असला, तरी त्यांच्या मनावर ठसठशीतपणें ठसलेला विचार हाच होता कीं, "पेशवाईचा जो मोड झाला तो आमची सामाजिक, धार्मिक स्थिति जशी पाहिजे होती तशी नव्हती म्हणून झाला. आणि येथून पुढेंहि आम्हांस सुदशा प्राप्त होण्यास व ती कायम राहण्यास आम्ही आपली गृह-स्थिति व धर्माचार सुधारण्याचा प्रयत्न प्रथम केला पाहिजे व तो करण्यास अत्यंत अनुकूल काळ सांप्रत आला आहे." लोकशिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य व समाजांतील उच्चनीचतेचा निरास या प्रमुख सामाजिक सुधारणांवरच आगरकरांची बहुतेक सारी शक्ति खर्चीं पडली आहे.

ही सुधारणा करतांना सुधारकानें मुख्य पथ्य कोणतें संभाळावयास हवें हेंहि आगरकरांनीं ठासून सांगितलें आहे. "**मूळ प्रकृति म्हणजे भारतीय आर्यत्व**" सोडतां कामा नये असा इषारा त्यांनीं दिला आहे. ज्या समाजाची सुधारणा करावयाची त्याच्यांतच राहून आपण धक्केचपेटे सोशीत आपल्या टीकेची टाकी सतत चालवून दगडाला देवपण आणून दिलें पाहिजे अशी त्यांची ठाम समजूत होती. ती स्पष्ट करतांना ते म्हणतात, "स्वभूमींत, स्वलोकांत, स्वधर्मांत आणि स्वाचारांत राहून, अविचारी व अज्ञान देशबांधवांच्या निंदेस किंवा छळास न भितां, त्यांच्याशीं कधीं भांडून, कधीं युक्तिवाद करून, कधीं लाडीगोडी लावून, अथवा सामर्थ्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असल्यास कधीं त्यांना दटावून त्यांची सुधारणा करणें यांतच खरी देश-प्रीति, खरी बंधुता, खरा देशाभिमान, खरें शहाणपण व खरा पुरुषार्थ आहे. याच्या उलट जे वर्तन करतात तें सुधारणा करीत नसून केवळ शृंखलांतर करतात!" अशी समाजाशीं लगट किंवा जवळीक ठेवणारे आगरकर त्याची सुधारणा करण्यासाठीं मात्र कठोर प्रहार करण्यास कचरत नाहींत. "समाजांत राहूनच समाजाची सुधारणा करणें" हें त्यांचें ध्येय. तें साध्य करण्यासाठीं अवश्य तो अधिकार ज्ञानाच्या, नीतीच्या, निःस्वार्थीपणाच्या व दूरदृष्टीच्या अशा बहुतेक सर्व अंगांनीं त्यांना प्राप्त झालेला होता. सामाजिक चालीरीतींत नीरक्षीरविवेक कर-ण्याची हंसवृत्ति आणि मिशनऱ्यांची मधुर वाणी या दोन गुणांची जोड त्यांना लाभती तर ते जगांतील अद्वितीय समाजसुधारक ठरले असते. पण गरिबीनें गांजलेलें त्यांचें मन समाजावर साहजिकच चिडलें आणि त्या चिडीला व संतापाला तारुण्यांतील तडफेची धार पाजली गेली. समाजा-कडून नवीन मतांबद्दल किंवा कृत्याबद्दल ज्यांना सहस्रशः वृश्चिकदंश झाले आणि तरीहि ज्यांच्या चित्ताची शांति अणुमात्र ढळली नाहीं—किंबहुना ज्यांच्या मुखांतून प्रसन्नतेचे व आनंदाचे अमृत—निर्झर पाझरतच राहिले असे ज्ञानेश्वरमहाराजांसारखे महात्मे विरळा. "प्रभो, माझ्या छलकांना क्षमा कर. कारण आपण काय करतों हें त्यांना कळत नाहीं." अशी क्षमापूर्ण वृत्ति येशूनें दाखविली. पण त्याच्या पुढची पायरी म्हणजे त्या नेणत्या समाजानें धोंडमार केली असतांनाहि, मनांत क्रोधाला थारा न देतां, हसत हसत, त्या मारणाऱ्याच्या हातांतील धोंडा व त्याच्या मनांतील मार-ण्याची प्रवृत्ति हीच काढून टाकणारे अमृतजिव्हा वाणीचे ज्ञानेश्वर जगाच्या इतिहासांत एखादेच!

आगरकरांच्या लेखनांत चीड व चडफडाट, त्रागा व वैताग, क्षोभ व संताप, हे सर्व मनोविकार उंचबळून आलेले आहेत. पण त्यांचें मूळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परार्थांत आहे, राष्ट्रोद्धारांत आहे, सर्वभूतानुकंपेंत आहे. समाजोद्धारासाठीं नवीन सुधारकांना प्राचीन ऋषीइतकाच अधिकार आहे असें सकारण सांगतांना ते म्हणतात, " कोणतेही आचार घालण्यास पूर्वीच्या ऋषींस जितका अधिकार होता तितकाच आम्हांसही आहे. पूर्वकालीन आचार्यांवर ईश्वराची जितकी कृपा होती तितकीच आम्हांवरही आहे. त्याच्याशीं त्यांचा जितका संबंध होता तितकाच आमचाही आहे; बऱ्यावाईटाची निवडानिवड करण्याची जितकी बुद्धि त्यांना होती तितकी किंवा तीहून अधिक आम्हांसही आहे; अनुजांसाठीं त्यांचें अंतःकरण जितकें कळवळत होतें, तितकें किंवा त्याहून अधिक आमचेंही कळवळत आहे; सृष्टिविषयक व तत्कर्तृविषयक ज्ञान जितकें त्यांस होतें, तितकें किंबहुना त्याहून बरेंच अधिक ज्ञान आम्हांस आहे; सबब त्यांनीं घालून दिलेल्या नियमांपैकीं जेवढे हितकारक असतील तेवढ्याचेंच आम्ही पालन करणार, व जे अपायकारक असतील ते टाकून देऊन त्यांचे जागीं आम्हांस निर्दोष वाटतील असे नवीन घालणार."

आम्हांला—म्हणजे नवशिक्षितांना—समाजव्यवस्था करण्याचा हक्क प्राचीन ऋषीइतकाच आहे, त्यांनाच देवानें अतींद्रिय ज्ञानाचा मक्ता दिलेला होता आणि त्यांचे सिद्धांत त्रिकालाबाधित आहेत असें मानणें झूट आहे हा दुर्दम्य आत्मविश्वास आगरकरांच्या लेखनांमध्यें ओळीओळींतून अग्नीच्या ठिणग्यांप्रमाणें उडत आहे. " ज्या दुर्मतांनीं, दुराग्रहांनीं व दुराचारांनीं महारोगाप्रमाणें या देशाच्या बुद्धीचा, नीतीचा व शरीरसामर्थ्याचा हजारों वर्षें फडशा चालविला आहे, त्यांचें यथाशक्ति निर्मूलन करण्याचा प्रयत्न करणें अत्यंत उचित होय. " आणि तसें करतांना कोणती खबरदारी घेणें अवश्य आहे हेंहि त्यांनीं सांगितलें आहे. ते म्हणतात, " जें म्हणून जुनें आहे त्यावर कंटाळा येण्यासारखी टीका करीत बसणें हें आम्ही आपलें कर्तव्य समजत नाहीं. जुन्या आचारांवर जी टीका करावयाची ती त्यांचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुकरण करणारास राग उत्पन्न करण्यासाठीं नव्हे, तर त्यांत जी असंबद्धता असेल ती त्यांच्या नजरेस आणून ती त्यांनीं दूर करण्याचा प्रयत्न करावा, व निर्दोष अशा नवीन आचारांचा स्वीकार करावा यासाठीं होय."

"समाजांत राहूनच समाज सुधारणें" हें तत्त्व आगरकरांच्या रोम-रोमांत भिनलेलें होतें. आपल्या नव्या विचाराला चिडून समाजानें आपल्यावर "शिव्या, शाप व जुलूम" यांचा अग्निवर्षाव केला किंबहुना आपल्यावर बहिष्कार पुकारला तरी समाजसुधारकानें समाजापासून अलग होतां कामा नये असे इषारे त्यांनीं वारंवार दिले आहेत. समाजांतील विरोधकांना आपली ही सत्याग्रही वृत्ति पटवून देतांना आगरकर आवेशानें लिहितात, "तुम्ही हट्ट धरून त्यांस जातींतून काढूं लागल्यास तें वाटेल तें करतील पण तुमचा पिच्छा सोडणार नाहींत. तुम्ही त्यांचा कितीहि द्वेष करा, त्यांस कितीहि झिटकारा, पण फिरून ते येऊन तुम्हांस चिकटलेले आहेत असें तुमच्या दृष्टीस पडेल. त्यांची मगरमिठी ज्यास उकलतां येईल असें कोंणतेंहि ग्रामण्य तुमच्याच्यानें बसवितां येणार नाहीं." समाजाशीं अशी आपुलकी व जवळीक ठेवण्याबद्दल कटाक्ष बाळगणारे आगरकर त्यांतील दोष दाखविण्याचे वेळीं कडाडून लिहीत. एखाद्या प्रेमळ पण आक्रस्ताळ आईनें आपल्या मुलावर सतत नजर ठेवून त्याचें जरा कांहीं चुकलें कीं, त्याला फाडफाड बोलावें किंवा जोरजोरानें बडवावें तशी आगरकरांच्या लेखनाची जात आहे.

"बुडतां हें जन । न देखवें डोळां ॥ येतो कळवळा । म्हणूनिया ॥" अशी तुकाराममहाराजांसारखी तीव्र तळमळीची भाषा त्यांच्या वाङ्मयांतील पानापानांतून ठिपकत आहे. तुकाराम महाराजांना समाजाविषयीं काय कमी प्रेम होतें? आणि स्वतःविषयीं नम्र भावना काय थोडी होती? पण समाजाची सुधारणा करण्यासाठीं, त्यांतील दोष दाखवितांना आणि ढोंगें उघडकीस आणतांना, त्यांनीं जितके फटकारे समाजाला दिले आहेत,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आडपडदाहि न ठेवतां जितक्या अस्सल शिव्या मोजल्या आहेत आणि शेवटीं जितकी कठोर शापवाणी उच्चारली आहे, तितका रुद्रावतार मराठींत तरी दुसऱ्या कोणाच्याहि वाणींत वा लेखणींत पाहावयास सांपडत नाहीं. साऱ्या जगाला धारेवर धरणारा जर्मन पंडित नित्शे याचा तुसडे-पणा व करडेपणा हा कांहीं विलक्षणच आहे. त्याचा हात धरणारा लेखक साऱ्या जगांत सांपडणें कठिण. पण तुकोबा जितके प्रेमळ तितकेच कठोर, जितके नम्र तितकेच आत्मविश्व, जितके आशाशून्य तितकेच जगाच्या कल्याणाची हाव धरणारे, मृदुतीक्ष्ण व मधुकठोर असे बंडखोर व क्रांति-कारक पण समाजाचे सेवक व पूजक होते. जवळजवळ त्याच भूमिकेवर आगरकर आरूढ झाले होते. त्यांच्या लेखणींतून कधीं विजेचा कडकडाट होई तर कधीं मेघाप्रमाणें प्रेमवर्षाव होई. "भेकड व प्रतिष्ठाखोर हिंदु लोकांना, विषयलंपट, निःशक्त वाचाळ बाबूंनो.........धिक्कार असो तुम्हांला, तुमच्या धर्माला आणि तुमच्या हक्काला!!!" असे शब्दांचे चाबूक मारणारे आगरकरच हिंदुस्थानच्या गुणांची तारीफ किती मोकळ्या मनानें करतात पहा!—"नीति, औदार्य, अनुकंपा, आप्तमित्रांचा परामर्श वगैरे मानसिक गुणांचा; किंवा काव्य, चित्र, गायन, वादन इत्यादि ललित कलांचा; अथवा दुर्गरचना, गृहरचना, मूर्तिघटना, पाषाणखनन इत्यादि शिल्पकलांचा येथें अभ्युदय होऊन त्यांची इतकी अभिवृद्धि झाली होती कीं, त्यासंबंधानें आजमित्तीससुद्धां आम्हांस कोणापुढेंहि खालीं पाहण्याची आवश्यकता नाहीं."

अशी गुणगौरवाचीं स्थळें आगरकरांच्या साहित्य–सृष्टींत एकंदरीनें कमीच. त्यांची लेखणी म्हणजे जमिनीच्या पोटांत खसदिशीं घुसून तिचीं ढेकळें भराभर उलथीपालथीं करणारा अवजड व तीक्ष्ण अशा लोखंडी फाळाचा यंत्र–नांगरच! शेताची नांगरट करण्याचे वेळीं शेतकरी त्याला पाणी घालीत बसत नाहीं. आगरकरांनीं आपल्याकडे सामाजिक मनोभूमिकेची नांगरट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करण्याचें कठोर कार्य घेतलें होतें. पण तेवढेंच करून ते थांबत नव्हते. हा त्यांचा मोठेपणाचा विशाल गुण होय. लोकहितवाद्यांनीं " आम्ही टोणपे; आम्हांला पांचशें वर्षें तरी इंग्रज प्रभूच्या कृपाछत्राखालीं राहिलें पाहिजे तरच आम्ही शहाणे होऊं" असे न्यूनगंडाचे उद्‌गार राजकीय आघाडीवर काढले. पण आगरकरांचें तसें नव्हतें. चुका करणाऱ्या स्वकीय समाजाला ते जितक्या निष्ठुरतेनें वाक्ताडन करीत असत, तितक्याच बेडरपणें ते राजकीय बाबतींत परक्या सरकारवर आपली तिखट लेखणी चालवीत असत.

"केसरी" हा जसा मुख्यतः राजकीय स्वरूपाचा आणि सामाजिक वगैरे विषयांना गौणस्थान देणारा, तसा " सुधारक " हा मुख्यतः सामाजिक स्वरूपाचा पण राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, कलात्मक वगैरे विषयांनाहि न डावलणारा. सात वर्षें " केसरी "ची धुरा ज्यानें समर्थप्रमाणें वाहिली तो साहित्यवीर सुधारकांतहि राजकारणावर लिहिल्याखेरीज राहीलच कसा ? "गाल बसलेले, डोळे खोल गेलेले, साऱ्या अंगास वळ्या पडलेल्या...अशा लोकांचें गांवोगांवीं व शहरोंशहरीं दिसणारे थवे" पाहून आगरकरांचें कोमल हृदय किती द्रवत असेल ! " मुसलमान लोकांनीं येथें अनेक शतकें राज्य केलें. पण त्यांच्या त्या दीर्घकालीन अंमलानें आम्ही जितके डबघाईस आलों नाहीं, तितकें या शतसांवत्सरिक ब्रिटिश अंमलानें आलों आहों." या भीषण वस्तुस्थितीची जाणीव ते लोकांना करून देत होते. त्या वेळीं हिंदुस्थानची लोकसंख्या पंचवीस कोटी असून त्याचें वार्षिक उत्पन्न ऐंशी कोट होतें. त्यांपैकीं २० कोट रुपये शेतसारा होता. पण केवळ लष्करासाठीं २० कोट रुपये आणि " होम चार्जेस् " या नांवाखालीं इंग्लंडनें चालविलेल्या लुटीपायीं २३ कोट रुपये—याप्रमाणें हिंदुस्थानचें अर्धें उत्पन्न इंग्लंडास जात असे. त्याची आंकडेमोड करून आगरकरांनीं वाचकांपुढें आपल्या नुकसानीचा डोंगर उभा केला होता. " एका शतकांत दोन निखर्व रुपये या देशांतून परदेशांत गेले" असा हिशेब त्यांनीं मांडला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंग्रज हे येथें स्वार्थासाठीं, व्यापारासाठीं राज्य करीत आहेत हें अचूक निदान त्यांनीं केव्हांच केलें होतें—इंग्रजांचें हिंदुस्थानावरील राज्य म्हणजे कांहीं मंगलकारक "ईश्वरी योजना" (Divine Dispensation) आहे या भ्रमजालांत त्यांचें मन कधींच गुरफटलेलें नव्हतें. आणि म्हणून तर ते चिपळूणकर व टिळक यांच्या हातांत हात घालून काम करूं शकले. "आमचा सगळा व्यापार आमच्या हातीं फिरून पडूं देण्यापेक्षां आमचें राज्य ते आम्हांस अधिक आनंदानें परत देतील" असें भविष्य करून त्यांनीं इंग्रज बनियाच्या काळजासच हात घातला.

केवळ राजकीय पारतंत्र्याची व त्याच्या मूळ कारणाची जाणीव देऊनच आगरकर थांबले नाहींत, तर त्यांनीं या पारतंत्र्याचे भावी घोर परिणामहि त्या काळीं निर्भयपणें मांडले आहेत. "हिंदुस्थान म्हणजे गुलामांचें राष्ट्र बनलें आहे, आणि त्यांतील कोट्यवधि लोकांची अन्नान्नदशा झाली आहे," असा टाहो त्यांनीं फोडला. आणि तो केव्हां? तर ज्या वेळीं राष्ट्रसभा स्थापन केल्याबद्दल ह्यूमसाहेबांना वेडे ठरविण्यांत येत होतें तेव्हां. हिंदुस्थानच्या या अखंड शोषणामुळें येथील लोक अगदीं निःस्त्राण होऊन गेले आणि त्यामुळें दुष्काळाच्या खाईत हजारोंनीं, लाखोंनीं पटापट पडून जळून खाक होऊन गेले. "भुकेच्या झपाट्यांत मनुष्यांनीं घोडीं पाहिलीं नाहींत, कुत्रीं पाहिलीं नाहींत, पोरेंदेखील नाहींत." हीं दुर्दशा त्यांना हिंदुस्थानांत स्पष्ट स्पष्ट दिसत होती. "पृथ्वीवरील नऊदशांश लोकांना पोटासाठीं साऱ्या जन्मभर सक्तमजुरी करावी लागून अखेरीस देहान्त शिक्षा भोगावी लागते." हें तर खरेंच, पण त्यांतहि गुलाम बनलेल्या व सतत लुटल्या जाणाऱ्या हिंदी लोकांची दुर्दशा भयंकरच! तिचें पर्यवसान काय होईल हें इतिहासाचे ज्ञाते आगरकर यांनीं पुढील चरचरीत शब्दांनीं सांगितलें आहे. "इंग्रजी राज्यापासून या देशावर घडणाऱ्या या भयंकर परिणामाची पुरी कल्पना ज्यांच्या मनांत पक्की बिंबली असेल त्यांना.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणखी पांच पंचवीस वर्षें असाच क्रम चालू राहील तर हिंदुस्थानांतील लोक एकमेकांस खाऊं लागतील, किंवा भुकेच्या दुःसह यातनांमुळें बेफाम होऊन जाऊन ते आपल्या राज्यकर्त्यांचें जूं झुगारून देण्यास प्रवृत्त होतील, असें डोळयांपुढें ढळढळीत दिसून आल्यावांचून राहील काय ! ''

१९४२ सालीं "चले जाव"ची जी आरोळी देशभर उठली तिचें स्वप्न आगरकरांना सुमारें साठ वर्षांपूर्वींच पडलें होतें. एखाद्या तत्त्वज्ञां-प्रमाणें त्यांनीं त्या वेळीं असें लिहून ठेवलें आहे कीं, "राज्यशास्त्राप्रमाणें व ऐतिहासिक अनुभवाप्रमाणें हिंदुस्थानच्या लोकांची अक्कल आणि ताकद दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत जाऊन व दिवसेंदिवस इंग्रजांचीं आणि त्यांची अधिकाधिक फाटाफाट होत जाऊन शेवटीं घरची मंडळी आगंतुकांना धुड-कावून लावणार." या राजकीय भविष्यांत आनंददायक चूक अशी झाली आहे कीं, "ही इष्ट गोष्ट आजउद्यां घडून येणार नाहीं. हिला शतकेंच्या शतकें लोटलीं पाहिजेत." अशी कालावधीची भाषा आगरकरांनीं काढली होती. पण त्याचें कारण तेव्हांची निराशाग्रस्त परिस्थिति. त्यानंतर वीस वर्षांनींसुद्धां मोर्लेसाहेबांसारख्या दूरदर्शी तत्त्ववेत्त्यालाहि आपल्या दुर्बिणीं-तून स्वराज्याचा चांदोबा मुळींच दिसत नव्हता. पण स्वराज्याचा चंद्रो-दय निश्चित होणार आहे ही आशा अमावास्येच्या निबिड अंधकारांत बसलेल्या लोकांना दाखविणें हेंहि महत्त्वाचेंच कार्य तेव्हां होतें. त्याबरोबरच लोकांच्या दीन व शून्य झालेल्या मनांत आशेचें, उत्साहाचें व स्फूर्तीचें वारें संचरून देणें ही त्या कार्याची पुढील पायरी होय.

"आम्हीं तुमच्याशीं एकसारखें भांडल्याशिवाय व आमच्या आरो-ळ्यांनीं तुमच्या कानांचीं रंध्रें भरून सोडल्याशिवाय राहाणार नाहीं" अशी गर्जना आगरकरांनीं केलेली आहे. "हिंदुस्थानचा राज्यकारभार आमच्या विचारानें, इतकेंच नव्हे पण बहुतेकअंशीं आमचा आमच्या-कडून चालविला पाहिजे," असें स्वराज्याचें चित्रहि त्यांनीं उभें केलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होतें. स्वतंत्र प्रजासत्ताक राज्याचें स्वप्नहि आगरकरांच्या इतिहासपूत व भविष्यदर्शी नजरेनें पाहिलें होतें. ते मोठ्या हर्षभरानें लिहितात कीं, "फार काय सांगावें, उद्यां आम्हांस सीझर, अलेक्झांडर, नेपोलियन किंवा ड्यूक ऑफ वेलिंग्टन यांसारखा पुढारी मिळेल तर इंग्रज लोकांना हिंदुस्थानचा कारभार पाहण्याची जी दगदग पडत आहे ती दूर करूं; इतकेंच नाहीं तर नेल्सनसारखा तांडेल मिळाल्यास अजिंक्य आरमारानिशीं इंग्लंडवर चाल करून जाऊन कोहिनूरसकट जी जी मौल्यवान् वस्तु म्हणून इंग्रज लोकांनीं इकडून तिकडे नेली असेल ती परत आणूं! तसेंच ग्लॅडस्टनसारखा पुढारी मिळाल्यास हौस ऑफ लॉर्डसूचीं पर्वा न करतां पांचपंचवीस वर्षांत इंडिया सेल्फ गव्हर्नमेंट बिल हौस ऑफ कॉमन्समध्यें लीलेनें पास करून घेऊं." अर्थात् कायद्याची मर्यादा संभाळून त्या काळीं इतकेंच बोलतां येणें शक्य होतें.

"ज्याचें नशीब त्याच्या करामतीवर" हा सिद्धांत त्यांच्या बुद्धीवर तर बिंबलेलाच होता. "आमच्या राज्यकर्त्यांस दोष दाखविण्यापेक्षां किंवा त्यांच्यापुढें झोळी पसरून त्यांत एखादा तुकडा टाकण्याबद्दल त्यांची प्रार्थना करण्यापेक्षां, लोकांस आपल्या स्थितीचें खरें ज्ञान होऊन, ती सुधारण्याविषयीं उत्साह उत्पन्न व्हावा हा आमचा प्रधान हेतु." असा स्वावलंबनाचा मंत्रहि त्यांनीं उद्घोषिला आहे. फार काय, लो. टिळकांच्या मुखांत शोभावींत अशीं वाक्येंहि पारतंत्र्याच्या चिडीमुळें आगरकरांच्या तोंडून निघालेलीं आहेत. "पारतंत्र्यापासून आम्हांस जो त्रास होत आहे त्यापुढें सामाजिक शोचनीय दुराचारांपासून होणारा त्रास कांहींच नाहीं म्हटलें तरी चालेल," अशीहि कबुली आगरकरांनीं त्या चिडीच्या भरांत दिली आहे. वास्तविक पाहतां हें प्रमेय मान्य केलें कीं त्यांतून एकच निष्कर्ष बाहेर पडतो आणि तो म्हणजे सर्वाधार राजकीय अशा सुधारणा आधीं करणेंच योग्य. पण तो मार्ग टिळकांनीं अनुसरला. आगरकरांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

समाजाच्या अंतःशुद्धीवरच बहुतेक भर दिला. "ज्या राजकीय सुधारणे-पासून आपले सर्व पुरुषार्थ आपणांस प्राप्त होतील अशी कित्येकांची समजूत आहे ती राजकीय सुधारणाहि (सामाजिक सुधारणा झाल्याशिवाय) होणें शक्य नाहीं." हा विचारच त्याच्या जीवनाचा स्थायी भाव झालेला होता. हा जीवनस्वर आळवितां आळवितां त्याच्याशीं सुसंवादी असे इतर सूर त्यांनीं पोषक म्हणून लावले आहेत. त्यांची बुद्धि निःस्वार्थी व निर्मळ असल्यामुळें राजकीय स्वातंत्र्याचा महिमा तीं सहजच ओळखूं शकली.

"ज्याची त्याच्या शिरावर जबाबदारी असल्यानें त्याच्या बुद्धीस जें चांचल्य येतें, उद्योगनिमग्नत्वामुळें त्याच्या वृत्तींत जी प्रफुल्लता असते, कष्टान्तीं जय आल्यास जो अनिर्वचनीय आनंद होतो, तो दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिणाऱ्यास कधींहि व्हावयाचा नाहीं." ही स्वातंत्र्याची महति वाचकांच्या काळजावर कट्यारीनें कोरावी त्याप्रमाणें तीक्ष्णतेनें लिहिण्यांत आगरकरांचा हातखंडा आहे. "आयर्लंडाकडे पाहून तरी जागे व्हा" या लेखाची सुरुवातच किती चटका लावणारी आहे. वाचकांच्या अंतःकरणाचा सप्-दिशीं कबजा घ्यावा असा प्रारंभ करतांना आगरकर लिहितात. "बांधव हो, गिझनीच्या महंमदानें सोमनाथ येथील मूर्ति फोडून जो खजिना लुटला त्यानें, तैमूरलंगानें स्वारी करून तलवार आणि विस्तव यांनीं जो प्रलय करून दिला त्यानें, अवरंगजेबानें दक्षिणेपर्यंत स्वाऱ्या करून जो कहर करून सोडिला त्यानें, १७३८ त अफगाणच्या चोरानें जो धुमाकूळ मांडिला होता त्यानें किंवा १७५९ त अब्दालीनें जी कत्तल उडविली तिनें, तुमची निद्रा दूर झाली नसेल तर प्रस्तुत काळीं आयर्लंडांत जो प्रकार चालला आहे तो ऐकून तरी जागे व्हा, आणि देश सुखी कशानें होतो, याचें तत्त्व उमजा."

आगरकरांच्या डोळ्यांना राष्ट्रावर आंतून व बाहेरून अशा दुहेरी संक-टांचा मारा होत असल्याचें दिसत होतें. ऐन समरप्रसंगाचे वेळींच कर्णाच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रथाचें चक्र खालीं पृथ्वी गिळीत चालली आणि वरून अर्जुनाचे बाण अंगावर येऊं लागले. या दुहेरी दुर्दशेंत सांपडलेल्या कर्णाच्या धैर्यानें व आवेशानें आगरकर आपल्या राष्ट्राचें चक्र गिळणाऱ्या सामाजिक दुःस्थितीवर त्वेषानें दांतओठ खाऊन चडफडत होते, किंबहुना आपल्या अंगीं असेल नसेल तें सारें बळ एकवटून "रथचक्र उद्धरण्याचा" प्रयत्न शिकस्तीनें करीत होते, आणि त्याचबरोबर आपल्या राष्ट्रावर शरसंधान करणाऱ्या पारतंत्र्याला "थांब!" म्हणून हात उगारून सांगत होते. सरकारवर तुटून पडण्याचे कामीं टिळकांची छाती व झडप सिंहासारखी होती. तोच आविर्भाव आगरकरांच्याहि लेखनांत प्रसंगोपात्त प्रगट झालेला दिसतो. असे प्रसंग त्यांनीं कमी घेतले एवढाच फरक; पण राजकीय स्वातंत्र्याचा महिमा वर्णन करतांना ते असा मूलभूत विचार सांगतात कीं "राजकीय स्वातंत्र्य जाणें ही अत्यंत खेदजनक गोष्ट खरी, हें जाणें म्हणजे शरीरांतील सर्व इंद्रियें व त्यांचे व्यापार, यांचें पोषक जें चैतन्य-सारतत्त्व तें नाहींसें होणें होय" हा नुसता तात्त्विक सिद्धांत मांडूनच न थांबतां त्यांनीं राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याची निकडहि लावली आहे. ती इतकी निकरानें कीं, जणूं आगरकरांच्या अंगांत टिळकच संचारले आहेत असें वाटावें. आगरकर बजावतात,

"मूळ द्रव्य असल्याशिवाय कारागिरी कोठून येणार? विशिष्ट प्रकार-च्या राजकीय व्यवस्था समाजाच्या आस्तित्वाला अत्यावश्यक आहेत; म्हणजे त्या नसल्या तर समाजाची वाताहत होते. सामाजिक सुधारणांची तशी गोष्ट नाहीं. त्या समाजास शोभा देतात किंवा विशेष प्रकारचा आनंद उत्पन्न करतात. तेव्हां त्या मागून झाल्या तरी चालतील."

"सामाजिक सुधारणेपेक्षांहि राजकीय सुधारणा विशेष आवश्यक आहेत, आणि म्हणून राजकीय सुधारणा सामाजिक सुधारणांच्या अगोदर झाल्या पाहिजेत. सुधारणांचा वास्तविक पाहतां असा क्रम असून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आमचें सरकार त्याचा व्युत्क्रम करूं पाहतें. हें आश्चर्य नव्हे काय ! ''

खुद्द आगरकरांनींच आपल्या १५ वर्षांच्या सार्वजनिक आयुष्यांत हा "व्युत्क्रम" केला याचेंच आश्चर्य टिळकप्रभृति करीत असत, दुसरें काय ?

आगरकरांनीं आपल्या जीवनांत सामाजिक सुधारणेला अग्रस्थान दिलें, तरी राजकीय सुधारणेचा परामर्श ते जसे मधून मधून घेत असत, तसेंच आर्थिक, शैक्षणिक इत्यादि सुधारणांकडेहि वेळप्रसंगीं लक्ष पुरवीत असत. ते अर्थशास्त्रांत निष्णात होते. पारतंत्र्य नष्ट होईपर्यंत लोकांनीं हात जोडून बसावें हें त्यांना पटत नव्हतें. शिक्षण आणि उद्योगधंदे यांचा प्रसार, पारतंत्र्यांत शक्य आहे तेवढा तरी, लोकांनीं करावा असा त्यांचा आग्रह. हिंदुस्थानचें राज्य ताब्यांत असल्यामुळें आशिया खंडाचें व्यापाराचें नाक इंग्लंडच्या हातांत सांपडलें आहे. इंग्लंडांतील सावकार व कारखानदार या दोघांनाहि हिंदुस्थानांत बिनधोकपणें चरण्यास मोकळें रान कसें सांपडत आहे हें दाखवितांना आगरकर म्हणतात, " हिंदुस्थान देश इंग्लंडच्या ताब्यांत असल्यामुळें इंग्लंडांत जे पैसेवाले लोक आहेत, त्यांना हिंदुस्थानसरकारसारखें ऐपतदार कुळ कर्ज देण्यास सांपडतें; त्यामुळें मुद्दल बुडण्याची भीति न राहतां बिनबाकी व्याज प्रतिवर्षी वेळच्या वेळीं पदरांत पडतें, हा व्यापारदृष्ट्या कांहीं हलका नफा नाहीं... इंग्लंडांतील व्यापार करणाऱ्या मंडळ्यांना येथें फायदेशीर कारखाने घालण्यास संधि सांपडते, व पुष्कळ बाबतींत अमुक एक नफा पाडून देण्याची जबाबदारी सरकारानें आपल्याच अंगावर घेतली असल्यामुळें मंडळ्यांचें काम बिनबुड आणि निर्धास्त चालतें. ही इंग्रजांची सोय झाली. पण त्यामुळें सुवर्णभूमि असलेला हिंदुस्थान मात्र भिकेला लागला. नुसतें धान्यपिकवूं आणि रानतोडूं राष्ट्र उन्नतीस चढत नाहीं." असें सांगून आगरकरांनीं आपल्या मनांतील हळहळ पुढील शब्दांनीं व्यक्त केली आहे, " आम्ही खंडीच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खंडी मूलद्रव्यें उत्पन्न करावीं, दुसऱ्या राष्ट्रांनीं जहाजें भरभरून न्यावीं आणि त्यावर कुशलतेची करामत करून पुन्हां आम्हांकडे विकण्यास आणावीं व हवे तसे पैसे मिळवावे." ही लूटमार बंद केव्हां आणि कशी होणार? "जोंपर्यंत इंग्रज लोक आमच्यावर राज्य करताहेत तोंपर्यंत बाहेरचा माल आंत येण्याची, बंदी होण्याची वार्ता कशाला पाहिजे!" अशी निर्भ्रांत खात्री आगरकरांची झालेली होती.

त्यांच्या डोळयांना हें दिसत होतें कीं, "दारिद्र्यानें पिळून काढलेल्या व भुकेनें गांजून गेलेल्या लोकांचें एखादें प्रचंड बंड होऊन, त्यांच्या व्यापारास एकाएकी मोठा धक्का बसेल व कोट्यवधि रुपयांचें नुकसान होईल, तेव्हां कोठें त्यांचे डोळे उघडणार!!" पण हा डोळे उघडण्याचा काळ येईपर्यंत लोकांनीं स्वस्थ न बसतां उद्योगधंद्यांची वाढ होईल तितकी केली पाहिजे, असा प्रचार आगरकर करीत. "थोडा नियामक व पुष्कळ उत्पादक उद्योग करणाऱ्यांची मोठी संख्या ज्या देशांत असते तो विशेष सुखी असतो" हें तत्त्व सांगून आगरकरांनीं लोकांना स्वदेशीचा मंत्र दिला. खुल्या व्यापाराच्या नांवाखालीं मँचेस्टरवाल्यांनाच संरक्षण कसें मिळतें हें त्यांनीं दाखवून दिलें होतें आणि हिंदी कापडावरील एक्साईज ड्यूटी उठवा, येथील नवीन उद्योगधंद्यांना संरक्षण द्या, इत्यादि मागण्या त्यांनीं केल्या होत्या.

सरकारच्या या कर्तव्याबरोबरच लोकांच्या स्वदेशीव्रताच्या कर्तव्याची जाणीवहि आगरकर देत होते. "येथील लोकांनीं स्वदेशी कापड वापरण्याचा निश्चय केला सर लाखों रुपये तन्निमित्त परदेशांत जात आहेत ते बंद होणार नाहींत काय! आपल्या नित्याच्या उपयोगांतील शेंकडा नव्वद जिनसा इंग्लंडांतून येथें येतात." कुलपें, टाक, दौती, कागद, पुस्तकें शाई, सुया, साबण, इत्यादि कैक वस्तु परदेशांतून आपण घेतों व त्यामुळें आपलें पराकाष्ठेचें नुकसान होतें. म्हणून आगरकरांनीं लहान

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लहान कारखाने उभारण्याची प्रेरणाहि पैसेवाल्यांना दिली आहे. "दहा-पांच जणांनीं मिळून दहापंधरा हजार रुपयांच्या निरनिराळ्या रकमा उभ्या केल्या व साबण, काडयांच्या पेट्या, मेणबत्त्या, जाड कागद, अर्क, तेल, साखर, वगैरे जिनसा करण्याचे जागोजाग कारखाने घातले, तर व्याजानें रुपये लावण्यापेक्षां त्यांस कमी फायदा पडणार आहे असें नाहीं."

"यंत्ररूपी राक्षसाशीं आमचे तेलीबुवा कसली प्रतिस्पर्धा करणार?" असें म्हणून आगरकरांनीं यंत्रशक्तीचें महत्त्व वर्णिलें आहे. पण त्याबरोबरच येथें हजारों वर्षें चालत आलेले कलाकौशल्याचे हस्तव्यवसाय टिकवून धरले पाहिजेत हें सांगण्यासहि ते विसरले नाहीत. "पारावताच्या रंगाप्रमाणें क्षणोक्षणीं रंगांतर भासविणारीं रेशमांचीं आणि लोकरीचीं वस्त्रें, स्पर्शानुकूल व दर्शनानंदकारी असें गजनीचे, मखमालीचे आणि खिनखापाचे पट" इत्यादि भारतीय कलाकौशल्य इंग्रजी अमदानींत धुळीस मिळालें, त्याचा पुनरुद्धार करावयास हवा अशी आगरकरांची तळमळ होती. जनतेनें स्वदेशीकडे, पैसेवाल्यांनीं कारखाने काढण्याकडे आणि कारागिरांनीं कलाकौशल्याकडे लक्ष पुरवावें; या आगरकरांच्या उपदेशांत सत्य आहे, यांत संशयच नाहीं. पण तें मर्यादित आहे हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे.

येथील कलाकौशल्यावर कुऱ्हाड घालण्यासाठीं इंग्रज अधिकाऱ्यांनीं विणकऱ्यांना आपले आंगठे तोडून घ्यावयास लावलें याचे पुरावे सर रमेशचंद्र दत्त यांच्या जाड्या ग्रंथांत पाहावयास मिळतात. लहान कारखाने मोठ्या कारखान्यांपुढें टिकाव धरूं शकत नाहींत. आणि त्यांनीं थोडीफार प्रगति केली तर परराज्याची तलवार त्यांच्या मानेवर सतत टांगलेली होतीच. बागेंतील गवत अमुक एका उंचीपर्यंतच वाढूं द्यावयाचें, त्याहून अधिक उंच होण्याचा प्रयत्न त्या गवतांनीं केला तर तें कापून टाकावयाचें हें जाणणाऱ्या माळ्याचें काम ब्रिटिश सरकार आपल्या स्वतःच्या फायद्यासाठीं करीत होतें. ब्रिटिश कारखानदारीला धक्का मिळेल अशी उद्योगधंद्याची वाढ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदुस्थानांत करूं देण्यास ते प्राणांतींहि तयार नव्हते. व्यापार हा त्यांचा आद्य हेतु—जीवनाधारच ! तो सुरक्षित रहावा म्हणून त्यांनीं राज्यसत्तेचें कुंपण घातलें होतें. हिंदुस्थानांतील व्यापार सोडणें म्हणजे आपलें प्राण सोडणेंच होय असें ब्रिटिश सरकारला वाटत होतें. त्यामुळें हिंदुस्थानांतील व्यापारांची वाढ विशिष्ट मर्यादेपलीकडे ते होऊंच देत नसत. आर्थिक व राजकीय या दोन्ही रोगांवर उपयोगी पडलेली एकच मात्रा म्हणजे स्वदेशी. तिला प्रतिबंध करण्याची युक्ति ब्रिटिशांना सांपडली नाहीं, म्हणूनच स्वदेशीवृत्ति एकसारखी फोफावत गेली. त्यामुळें ६० कोटींचें कापड, २२ कोटींची साखर वगैरे परदेशी माल येण्याचें पुढें बंद झालें. ही आर्थिक हानि टाळावी म्हणून ब्रिटिश लोकांनीं हिंदी कारखान्यांत भागीदारी ठेवली आणि ती त्यांचें राज्य खलास झाल्यानंतरहि अद्याप चालू राहिली आहे. ती पुढें किती काळ चालू राहणार ? इंग्लंड—अमेरिकेप्रमाणें मोठमोठे कारखाने येथें कधीं उभे राहणार ? आणि त्यासाठीं लागणारीं यंत्रें या देशांतच केव्हां तयार होणार ? का ही पाश्चात्यांनीं मळलेली वाट अजिबात सोडून केवळ लहान लहान यंत्राची व विजेच्या शक्तीची जोड घेऊन ग्रामोद्योगाचा प्रसार होणार ? व त्यांतून शोषणशून्य आणि हिंसाशून्य समाजाचा नवा आदर्श जगापुढें स्वतंत्र भारत ठेवणार ? या साऱ्या प्रश्नांचीं उत्तरें अजून तरी काळाच्या गर्भातच दडून बसलेलीं आहेत.

राजकीय व आर्थिक विषयांत जास्तीत जास्त पुढारलेले विचार आगरकरांच्या बुद्धीनें जसे आकलन केले होते, तसे इतर सामाजिक विषयहि पचविलेले होते. त्यांच्या महत्त्वाकांक्षेचा पल्ला इतका मोठा कीं, त्या वेळीं त्यांनीं जीं जीं स्वप्नें पाहिलीं व रंगविलीं तीं साठ वर्षांनंतर व स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आजमित्तीलासुद्धां पूर्णांशानें प्रत्यक्षांत उतरलेलीं नाहींत. पण त्यांच्या दूरदर्शी नजरेनें जें ध्येय हेरलें त्याच दिशेनें सामाजिक बाबतींत समाज चाललेला आहे हें स्वच्छ दिसतें आणि यामुळें त्यांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्रांतदर्शी बुद्धीचें कौतुक वाटतें. " मरणोन्मुख झालेल्या देशास शिक्षणावांचून दुसरा तरणोपाय आहे असें आम्हांस वाटत नाहीं. " ही तर त्यांची प्रथमपासूनची ठाम खात्री. आणि त्यासाठीं तर त्यांनीं आपलें जीवित निःस्वार्थीपणें व निरलसपणें वाहिलें. पण त्या शिक्षणाच्या तपशीलाबाबतहि त्यांनीं सूक्ष्म विचार केलेला होता. " स्त्रियांनीं व पुरुषांनीं पाहिजे तो धंदा स्वतंत्रपणें करावा; पाहिजे ती विद्या हवी तितकी संपादावी; पाहिजे त्या परीक्षा द्याव्या आणि पदव्या मिळवाव्या; आणि पाहिजे तेव्हां लग्नें करून हवा तसा संसार करावा; अशी मोकळीक कालांतरानें सर्वांस मिळणार आहे. " आगरकरांच्या कल्पनेनें पाहिलेलें हें दृश्य आज निदान शहरामध्यें तरी शेंकडों ठिकाणीं दिसूं लागलें आहे. मात्र त्याचें श्रेय वाढत्या दारिद्र्याला किती आणि समतेच्या तत्त्वाला किती हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. पण आगरकरांचें अंगीकृत कार्य म्हणजे आपल्या समाजहितैषी दृष्टीला जें अंतिम ध्येय दिसेल, तें निर्भयपणें व निःसंकोचपणें जनतेपुढें मांडणें व पुनः पुनः पुरस्कार करून तें जनतेच्या गळीं उतरविणें.

पुण्यासारख्या पुढारलेल्या शहरांत मुलांबरोबर मुलींनाहि प्राथमिक शिक्षण सक्तीचें करणें वीस वर्षांपूर्वींहि किती कठीण गेलें याचा एक संस्मरणीय पुरावा आहे. १९२७ सालीं पुणें नगरपालिकेपुढें मुलामुलींच्या शिक्षणाचा प्रश्न आला असतांना श्री. तात्यासाहेब केळकरांसारख्या सुधारणाप्रिय पुढाऱ्यानें विरोधी मत दिलें. आणि त्याच वेळीं त्याच नगरपालिकेच्या इमारतीवरून केळकरांच्याच कन्येनें मुलामुलींना एकदमच प्राथमिक शिक्षण सक्तीनें मिळावें यासाठीं मिरवणूक काढलेली होती. ही आमची अलीकडची प्रगति! मग आगरकरांच्या वेळी, १९ व्या शतकाच्या अखेरीस, कोण घनदाट अंधार पसरलेला असेल! तरीसुद्धां आगरकरांची लेखणी विजेसारखी तळपत होतीच.

" बायकांना का बुद्धि नाहीं ? का मन नाहीं ? का रुचि नाहीं ? का

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बरें वाईट समजण्याची अक्कल नाहीं ?" असे सवाल त्यांनीं शेक्सपीअर-च्या आवेशानें विचारले आहेत.

"स्त्री–पुरुषांना एकच शिक्षण द्यावें व तेंहि एकत्र द्यावें" असा ठणठणीत मथळा देऊन त्यांनीं एक सावेश व सयुक्तिक लेख लिहिला आहे. ऐन प्लेगच्या दंगलींत "सरकारचें डोकें ठिकाणावर आहे काय ?" असे उग्र शीर्षक देण्यांत टिळकांची जी निर्भयता तीच आगरकरांची या सामाजिक विषयांत. गोरे व काळे असा भेद न करतां न्यायालयांत ज्यूरी निवडावी किंवा सनदी नोकरांची परीक्षा इंग्लंड व हिंदुस्थान या दोन्ही देशांत व्हावी या मागण्यांतील समता त्या वेळीं जितकी धक्का देणारी वाटत असे तितकीच मुलामुलींना एकच व एकत्र शिक्षण देण्याची घोषणाहि वाटत असे. आजहि आगरकरांचें मत वादाच्या व संशयाच्या कक्षेंतून सुटलें आहे असें नाहीं. "पण इष्ट असेल तें बोलणार" हा धडाका त्यांनीं निधड्या धडाडीनें चालविला होता. "साऱ्या पुरुषांचे मेंदू साऱ्या स्त्रियांच्या मेंदूपेक्षां अधिक जड आहेत असें प्रतिपादण्याचें धारिष्ट्य अत्यंत अधिकारलोलुप पुरुषास-देखील करतां येणार नाहीं." असें सांगून आगरकरांनीं अमेरिकेंतील असा अनुभव दिला आहे कीं, "शास्त्रकलांच्या अभ्यासामुळें स्त्रियांचें नैसर्गिक चारुत्व कमी होऊन अपत्यसंगोपनाचें काम त्यांच्यानें बरोबरीनें वठेनासें होईल ही भीति निराधार आहे." स्त्री–पुरुषांचा मिश्र समाज, स्वयंवर, प्रौढविवाह, घटस्फोट इत्यादि दूरच्या समाजसुधारणांचाहि प्रचार आगर-करांनीं केला आहे.

"ज्ञान संपादणें हें पुरुषांचें कर्तव्य, शिशुसंगोपन हें स्त्रियांचें कर्तव्य; पुरुष स्वामी, स्त्री दासी; स्वातंत्र्य पुरुषाकडे, पारतंत्र्य स्त्रियांकडे; विवा-हाशिवाय स्त्रीस गति नाहीं, व गृहाशिवाय तिला विश्व नाहीं; वैधव्य हें तिचें महाव्रत व ज्ञानसंपादन हा तिचा मोठा दुर्गुण" या विषमतेवर त्यांनीं जोराचे कोरडे ओढले आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अस्पृश्यता-निवारणाविषयीं त्यांनीं साधक बाधक विचार करून असें मत मांडलें आहे कीं, "समाजाच्या विलक्षण रहाटीमुळें उच्चनीचत्व अस्तित्वांत येऊन तदनुसार जो व्यवसायविभाग सहजगत्या झाला आहे, त्यास ईश्वरकृत व सनातन मानून उच्च वर्गांत जन्मास आलेल्या लोकांनीं नीच वर्गांत जन्मास आलेल्या लोकांस अपवित्र व अस्पर्श्य मानणें याहून मनुष्यपणाच्या विचारीपणास लांच्छनास्पद अशी दुसरी गोष्ट नाहीं."

स्वधर्मांतील दोषावर असें शस्त्र चालविणारे आगरकर परधर्माला आंधळेपणानें भाळले नव्हते. ज्योतिबा फुले व गोपाळराव आगरकर यांच्यांतील हा फरक फार महत्त्वाचा आहे. "**समाजांत राहूनच समाज सुधारणें आणि तो स्वाभिमानानें व स्वप्रयत्नानें सुधारणें**" हें आगरकरांचें महनीय वैशिष्ट्य होय. पंडिता रमाबाईंच्या शारदासदनाविषयीं लिहितांना त्यांनीं धर्मांतराचा स्पष्ट निषेध केला आहे. ते लिहितात, "धर्मासंबंधानें आमचीं मतें कशींहि असलीं तरी हिंदु स्त्रियांनीं किंवा पुरुषांनीं कोणत्याहि ऐहिक अथवा पारमार्थिक लाभासाठीं ख्रिस्ती व्हावें ही गोष्ट आम्हांला बिलकुल संमत नाहीं."

● ● ●

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कलहाचे कांटे : : ६

गोपाळराव आगरकर व गोपाळराव गोखले या दोघां तरुण विद्वानांनीं मराठी-इंग्रजींत लिहून चालविलेल्या नवमतवादी " सुधारक " पत्राचें स्वागत महाराष्ट्रांतील वाचकवर्गानें कसें केलें? कोणतेंहि नवीन कृत्य सुरू केलें म्हणजे त्याला भले म्हणणारे कांहीं लोक जसे भेटतात, तसेच त्याला नाकें मुरडणारे, त्यावर बोटें मोडणारें किंबहुना दांतओठ खाणारे लोकहि आढळतात. या दोहोंपैकीं कोणत्या वर्गाची संख्या जास्त आहे यावरून लोकप्रियता ठरते. पण लोकप्रियता हीच कांहीं कोणत्याहि कार्याची कसोटी किंवा ध्येय असूं शकत नाहीं. जें लोकाविरुद्ध आहे तें 'शुद्ध' असेल तर आणि जें 'सत्य' आहे तें 'अप्रिय' असेल तर त्यांचा उच्चार करणारा माणूस लोकप्रिय कदाचित् ठरणार नाहीं, पण तो लोकहितकर्ता असूं शकेल. लोकसेवा केल्याचें मानासिक समाधान हेंच बक्षीस. तें 'सुधारक' कर्त्यांजवळ अखंड व अपार होतें. लोकांचा पाठिंबा मात्र हळू हळूं वाढत होता.

'सुधारका'च्या पहिल्या वर्षाचा तपशीलवार जमाखर्च उपलब्ध आहे. त्यावरून असें दिसतें कीं, या नव्या पत्राला पहिल्या वर्षी ६५० वर्गणी-दार मिळाले. वर्गणी रुपये दोन म्हणजे वर्गणीचें उत्पन्न १३०० रुपये झालें. जाहिरातीचें उत्पन्न ३०० रुपये होतें. एकूण जमा १६०० रुपये.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आतां खर्च पहा. छपाई ७२० रुपये, कागद ५०६ रुपये, पावती बुकें वगैरे १०० रुपये, जाहिराती १५० रुपये, सामान ४० रुपये मिळून १५१६ याचा अर्थ एक वर्ष पत्र चालवून नफा किती उरला ? तर ८४ रुपये ! तो दोघा विद्वान संपादकांनीं वांटून घ्यावयाचें ठरविलें तर प्रत्येकीं ४२ रुपये पडतात. म्हणजे प्रत्येक संपादकाचा मासिक पगार ३॥ रुपये झाला ! केवढी कमाई ! पण त्याबद्दल आगरकर-गोखले यांना ना खेद ना खंत ! " मराठा ", " केसरी " व " सुधारक " या निरनिराळ्या पत्रांत आठ वर्षें इंग्रजी व मराठी लेखन करून आगरकरांना एका पैचीहि प्राप्ति झाली नव्हती. " आतापर्यंत मी हें काम निष्काम बुद्धीनें करीत आलों आहें आणि पुढेंहि तें तसेंच करीत राहणार, " हा आगरकरांचा निर्धार. त्यांची इच्छा एवढीच कीं पत्रांमुळें पदरांत कांहीं न पडलें तर न पडो, पण निदान पदराला खार तरी न लागो. दुसऱ्या वर्षी वर्गणीदार कमी होण्याची भीति होती. ती घालविण्यासाठीं वार्षिक वर्गणी त्यांनीं दोन रुपयां-वरून बारा आण्यांवर आणून ठेवली. त्यामुळें एका वर्षांत २००० पर्यंत वर्गणीदार होतील अशी त्यांना आशा होती. शाळामास्तर, स्टेशनमास्तर, वगैरेंकडे " सुधारका "चे नमुना अंक व विनंतिपत्रकें त्यांनीं पाठविलीं. पुण्यांत २००० आणि मुंबईंत ३००० जाहिराती वांटल्या. इतरहि उपाय योजिले. रेल्वेंतील कामगारांच्या तक्रारी " सुधारकां "त मधून मधून येत असत. या सर्वांचा परिणाम म्हणजे दुसऱ्या वर्षीच्या, म्हणजे १८८९ च्या, नोव्हेंबर महिन्यांत " सुधारकाची लोकप्रियता समाजाच्या मध्यम वर्गां-तून झपाट्यानें वाढत आहे."

मात्र आपल्या मतांचा प्रसार देशाच्या कोनाकोपऱ्यापर्यंत व्हावा आणि त्याचा इष्ट परिणाम घडावा म्हणून पत्राचा प्रसार खूप खूप व्हावा असें आगरकरांना वाटे. " आपण पत्राकरितां मजकूर लिहितों तो अंतःप्रेरणेनें लिहीत असतों, तेव्हां तो वाचणाऱ्यांची संख्या हाताच्या बोटांनीं मोजतां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येणाऱ्या शेंकड्याहून अधिक नसावी हें अत्यंत उद्वेगजनक होतें. ” अशी हळहळ त्यांनीं एका पत्रांत व्यक्त केली आहे. विरोधकांचा तर काय? समुद्रच पसरलेला होता. आणि ते पुणेरी विरोधक! १८९०-९१ च्या सुमारास आगरकर पुण्यांत शनिवार पेठेंत ओंकारेश्वराच्या रस्त्यावर मेहेंदळे इंजिनियर यांच्या बागेंतील बंगल्यांत रहात. तेथून ते रोज संध्याकाळीं फिरावयास जात व पुष्कळ वेळां एकटे जात. त्यांचें कुटुंब जुन्या पद्धतीचें व देवधर्म करणारें असल्यामुळें त्या तुळशीबागेंत प्रत्यही जात. मेहेंदळ्याच्या घरावरूनच ओंकारेश्वराच्या घाटावर प्रेतें नेण्याचा रस्ता आहे. त्या रस्त्यानें विरोधकांनीं आगरकरांचें खोटें प्रेत मिरविलें! आपल्या बंगल्याच्या माडीवरील खिडकींतून हा जिवंतपणीं आपल्या प्रेतयात्रेचा झालेला सोहळा आगरकरांनीं पाहिला. तो पाहून त्यांना हंसूं आलें, राग आला नाहीं.

खुनाची धमकी तर कोणाहि तेजस्वी संपादकाच्या पांचवीलाच पुजलेली असते. “ तुम्ही असलें भलभलतें लिहिणें न थांबवाल तर आम्ही तुमचा जीव घेऊं ” अशी धमकी देणारे गुंड आगरकरांना पुष्कळ भेटले. त्या धमक्यामुळें कोमल प्रकृतीचे गोखले थोडेसे घाबरले. पण आगरकरांचें मन म्हणजे पोलादी कांब! तें अणुमात्राहि चळलें नाहीं. नेहमींप्रमाणें ते एकटेच फिरावयास जात राहिले. आणि रात्र पडल्यावर घरीं येण्याचा क्रम बिनदिक्कतपणें त्यांनीं चालू ठेवला. “ सुधारका ”ला तरुणांची चहा व सनातन्यांचा विरोध किती तीव्र असे यावर प्रकाश पाडणारी एक आठवण आगरकरांच्या पत्नीनेंच दिलेली आहे. यशोदाबाई म्हणतात:—

“ एकदां काय झालें, तिन्हीसांजच्या वेळीं मी, टिळकांची पत्नी आणि शेजारच्या तीनचार बायका बसलों होतों आपल्या एकत्र गोष्टी बोलत. त्यांच्या लेखामुळें खवळून गेलेल्या लोकमनाची मला नेहमीं फार भीति वाटे. घरांतून बाहेर गेले कीं ते परत येईपर्यंत जीव कसा अगदीं टांगल्यासारखा होई. त्या दिवशीं ते घरीं परत आले होते. इतक्यांत वीस-एकवीस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर्षांचा तरुण मुलगा एक भला मोठा लखोटा घेऊन आला व त्यानें 'आगरकर आहेत का?' म्हणून चौकशी केली. मी ते बाहेर गेले असल्याचें सांगितलें. त्यानें तो लखोटा 'त्यांना आल्यावर द्या' असें सांगून माझ्या हातीं दिला व तो निघून गेला. ते येऊन हातपाय वगैरे धुऊन माडीवर गेल्यावर मीं तो लखोटा त्यांच्याजवळ दिला. तेव्हां 'काय बुवा हें प्रकरण! यांत विंचूबिंचू तर नाहीं ना? हो आतां तेवढंच बाकी राहिलं आहे!' असें म्हणून त्यांनीं तो लखोटा फोडला. तो त्यांतून कांहीं नोटा निघाल्या. पत्र वाचून पाहतात तों 'सुधारकाचा' प्रसार व्हावा व तो फुकट वांटतां यावा म्हणून त्याला अल्पस्वल्प मदत दिल्याचा मजकूर होता. अशा तऱ्हेनें सुधारकांतील लेखांचा तरुण पिढीवर चांगलाच परिणाम होत होता त्याचा दाखला मिळाला."

पण आगरकरांचा हा भक्कम व अभेद्य मनोदुर्ग हादरून जावा असा महान् झंझावात १८८९ सालापासून सुरू झाला. तापदायक झंझावाताची सुरुवात सुखदायक झुळकेपासून व्हावी तसा प्रकार घडला. टिळक–आगरकर या तेजस्वी तरुणांचा उत्तुंग ध्येयवाद, अलौकिक स्वार्थत्याग आणि संकटांशीं निर्भयतेनें झुंजण्याची वृत्ति इत्यादि गुणांची मोहिनी सर्वसामान्य जनतेवर जशी पडली, तशीच राजेमहाराजांवरहि पडली. त्यांच्या या गुणांचें कौतुक करण्याचें धाडस मात्र इंदूरचे महाराज श्रीमंत शिवाजीराव होळकर यांनीं दाखविलें. त्यांनीं या दोघां क्रियाशील देशभक्तांना आपल्याकडे बोलावून घेतलें आणि ७०० रुपयांची देणगी दिली. ही देणगी देण्यांत त्यांचा काय हेतु होता याबद्दल मोठा वाद आहे. पण त्या देणगीचा परिणाम मात्र टिळक–आगरकरांच्या सहकार्यावर अखेरचा घाव घालण्यांत झाला हें निर्विवाद! स्वाभाविक तर्क असा वाहतो कीं, बुद्धिमान् व कर्तबगार असे अकरा पदवधिर शाळा–कॉलेज व वर्तमानपत्रें चालवून देशभक्ति करतात आणि स्वतःचा चारितार्थ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चालविण्यासाठीं महिन्याकांठीं ३०।४० रुपयेच घेतात. तेव्हां त्यांची आर्थिक नड अल्प प्रमाणांत तरी दूर करण्यासाठीं असे ७०० रुपये त्या सर्वांना साहाय्य म्हणून दिलेले असावेत. पण देणगी दिल्यानंतर १६ तासांच्या आंत होळकरांकडून पत्र आलें कीं, "त्या देणगीपैकीं ४०० रुपये आगरकरांना द्यावेत. आणि त्या पैशांत त्यांनीं लिहिलेल्या "वाक्य-मीमांसा" या पुस्तकाच्या प्रती घ्याव्यात. उरलेले ३०० रुपये दहा सभासदांत वांटून द्यावेत." प्रत्येकीं फक्त ३० रुपयांचें साहाय्य करण्याचा हेतु इंदूरच्या नरेशांनीं मनांत धरला असेल हें कोणाच्याहि तर्कशक्तीस पटणारें नाहीं. टिळकांच्या तीक्ष्ण बुद्धीला तर तें मुळींच पटलें नाहीं. त्यांतहि त्यांना कळलें कीं, होळकरांचे एक कारभारी रा. भिडे हे आगरकरांचे मित्र आहेत. तेव्हां त्यांच्या मनाचा ग्रह असा झाला कीं, देणगीची ही वांटणी करणारें पत्र आगरकरांनीं आणविलें. टिळक–आगरकरांचें वाग्युद्ध सुरू होण्याला हें अखेरचें निमित्त झालें.

"केसरी" व "सुधारक" या दोन वृत्तपत्रांच्या रणांगणावर टिळक व आगरकर यांचे समरप्रसंग त्वेषानें चालू होते आणि ते परस्परांस घायाळहि करीत होते. तरीसुद्धां त्या दोघांनीं अंगीकृत केलेलें शिक्षणाचें कार्य मात्र सहकार्यानेंच चालविलेलें होतें. पण मनाची ही कप्पेबंदी फार काळ चालू शकली नाहीं. पाण्याची एक कड तापली म्हणजे दुसरीहि कड गरम होण्यास फारसा वेळ लागत नाहीं. गरम पाण्याचा प्रचंड प्रवाह थंड पाण्याच्या समुद्रांत अखंड वाहता ठेवण्याची करामत व ताकद केवळ निसर्गाच्याच अंगीं आहे. मानवामध्यें ती सांपडणें दुर्घट! बर्क व फॉक्स हे इंग्लंडांतील पट्टीचे वक्ते–जीवश्चकंठश्च स्नेही. पण फ्रेंच राज्यक्रांतीच्या निमित्तानें त्या दोघामध्यें इतका तीव्र मतभेद झाला कीं ते एकमेकांचीं तोंडें पाहीनासे झाले. टिळकांनीं ता. ७ फेब्रुवारी १८८९ पासून डेक्कन एज्युकेशन सोसायटीची रजा घेतली आणि ता. १४ ऑक्टोबर १८९०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रोजीं संस्थेचा राजीनामाच दिला. त्या राजीनाम्याच्या खुलाशासाठीं त्यांनीं १५ डिसेंबर १८९० रोजीं एक पत्र लिहिलें. तें छापील ४० पानें भरेल एवढें मोठें आहे. त्यांत त्यांनीं आगरकरांवर जे आरोप केले, त्यांचा परामर्श येथें घेणें अवश्य आहे.

अकरा वर्षें जिला आपण वाढविली त्या संस्थेचा निरोप मतभेदामुळें घेतांना टिळकांचें अंतःकरण दुःखाच्या भारानें जड झालें होतें. त्यांना आपल्या भावनांबरोबर फार तुंबळ युद्ध करावें लागलें. आपल्या जीविताचें ध्येयच आज आपण टाकून देत आहोंत—आपल्या संस्थेच्या कल्याणार्थ आपण आत्मयज्ञच करीत आहोंत–आपल्या आयुष्यांतील सर्व आकांक्षांना ज्या संस्था मुख्यतः आधारभूत होत्या, त्यांच्यापासून आपली ताटातूट होत आहे–या जाणिवेनें टिळकांच्या हृदयास असह्य वेदना झाल्या. पण हा प्रसंग टाळणें त्यांना शक्य झालें नाहीं. कारण ज्या तत्त्वासाठीं आपण या संस्था स्थापल्या व ज्यांच्यासाठीं आपलें शरीर कणाकणानें झिजविलें, त्या तत्त्वांनाच कांहीं सभासद तिलांजलि देत आहेत असा टिळकांची पक्का समज झाला. त्यागपूर्वक जनसेवा हा तर या सर्व संस्थांचा प्राणवायु. पण तो त्याग संपुष्टांत आणून कांहीं कांहीं सभासद अन्य मार्गानें बाहेरचे उद्योग करून पैसे मिळवूं लागले, याचेंच टिळकांना फार वैषम्य वाटलें. स्वभावभेद, मतभेद, स्पर्धा, मत्सर हीं सारीं फाटाफुटीचीं कारणें कोणत्याहि संस्थेंत बीजरूपानें वास करीत असतातच. देवाणघेवाण तत्त्वानें हे सारे दोष पचनीं पाडण्याची तयारी बहुतेक संस्था–चालकांमध्यें असते. पण संस्थेच्या पायासच सुरुंग लागत आहे असें दिसल्यावर संस्थेच्या जन्मासाठीं व वाढीसाठीं ज्यांनीं आपलें रक्त आटविलें त्यांच्या अंगाचा चडफडाट झाल्याशिवाय कसा राहील?

संस्थेच्या प्रारंभीं उत्साह, एकनिष्ठा, स्वार्थत्याग आणि साधेपण याखेरीज चिपळूणकर–टिळक–आगरकरांजवळ यशःसंपादनाची दुसरीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोणतीं साधनें होतीं ? सर्वजण समतेच्या भूमिकेवरून जिवापाड कष्ट करीत होते. पण प्रिं. आपटे यांच्यासाठीं समतेच्या तत्त्वाला प्रथम मुरड घालण्यांत आली. ७५ रुपये हें पगाराचें मान ठरविलेलें होतें. तरी विष्णुशास्त्री व टिळक यांनीं पहिल्या वर्षीं कांहींच पगार घेतला नाहीं. पण प्रिं. आपटे यांना जास्त पगारावर घेण्यांत आलें. तसेंच पुढें गोखल्यांना कर्ज देण्याचे वेळीं नियमाचा भंग करण्यांत आला. ज्याला जें काम उत्तम करतां येईल तें त्याकडे सोंपविलें जात असे. आणि प्रत्येकाला निर्वाहासाठीं जितकें आवश्यक लागेल व जेवढें देण्याची बोर्डाला ताकद होती त्या मानानें त्याला पगार देण्यांत येई. तहाहयात सभासदांना मासिक पगार व शिवाय नडीच्यावेळीं देणगी देण्यांत येत असे. टिळकांच्याच प्रयत्नानें प्रत्येक सभासदाचा ३००० रुपयांचा विमा उतरविण्याचीहि व्यवस्था झाली होती. अपेक्षा अशी होती कीं, जीवनाच्या किमान गरजा भागल्यानंतर सभासद आपला सर्व वेळ व शक्ति संस्थेच्या विविध कार्यांतच खर्च करतील—दुसऱ्या द्रव्योत्पादक धंद्यांत नाहीं. खुद्द टिळकांनीं मनांत आणलें असतें तर सकाळीं शाळा करून दुपारीं कोर्टांत त्यांना वकिली चालवितां आली असती. पण संस्थेची माया त्यांना सर्वांत अधिक. म्हणूनच प्रिं. आपटे यांनीं संस्कृत कोश लिहून २०० रुपये मिळविले किंवा गोखल्यांनीं अंकगणित लिहिलें, हे सर्व संस्थेच्या तत्त्वांस हरताळ फासण्यासारखें आहे असें वाटून टिळकांच्या अंगाचा तिळपापड उडाला. इतकी पोटतिडीक नवीन सभासदांना संस्थेबद्दल कशी असणार ? या वृत्तिभेदामुळें सोसायटीच्या सभासदांत तंटे होऊं लागले, शिवीगाळ होऊं लागली, कधींहि भरून न येणाऱ्या जखमा अंतःकरणाला होऊं लागल्या.

ता. २० ऑक्टोबर १८८५ या दिवशीं पुढील वैमनस्याचें विषबीज रोवलें गेलें. १८८० सालापासून प्रत्येक सभासदाचा हिशेब त्या दिवशीं करण्यांत आला. आणि १८८५ पर्यंत ज्यांनीं अधिक उचल केली त्यांना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जादा पैसा परत करण्याचा हुकूम झाला. त्या पैशांतून ज्यांना कमी पैसा मिळाला होता त्यांना तो द्यावयाचें ठरलें. या तत्त्वाचे संशोधक व पुरस्कर्ते आगरकर होते. टिळकांना हें नवें तत्त्व साफ नापसंत होतें. त्यांना तो आपल्या स्वार्थत्यागाचा सौदा वाटूं लागला. "ही योजना म्हणजे आम्हांला आमची अब्रू विका म्हणून सांगण्यासारखें आहे." असें म्हणून त्यांनीं जोराचा विरोध केला. अर्भकाच्या संगोपनासाठीं आईनें केलेल्या कष्टांची व खाल्लेल्या खस्तांची किंमत पृथ्वीमोलानें तरी होईल काय? विपत्तिकालींहि स्त्रीनें संभाळलेल्या पातिव्रत्याचें मोल त्रिभुवनाच्या मोबदल्यानें देतां येईल काय? तसेच ध्येयवाद्यांचे स्वार्थत्याग! महिन्याला ४० रुपये पगार, वर्षाला ४०० रुपये बोनस आणि आयुष्याचे अंतीं ३००० रुपये विमा, एवढी सांपत्तिक तरतूद स्वार्थत्यागी तरुणांना पुरेशी आहे असा टिळकांचा ठाम विचार. आगरकरांचें मन तर गरिबींतून तावून निघालेलें. पक्क्या विटांना पाण्याचें भय काय? आगरकरांच्या मनाला स्वार्थत्यागाचें ओझें काय? पण चांगलीं चांगलीं माणसें सरकारी नोकरींत न जातां आपल्या संस्थेकडे ओढावींत व त्यांना ओढण्यासाठीं जरूर ती सांपत्तिक सुस्थिति संस्थेला आतां लाभलेली आहे. या दोन विचारांनीं त्यांनीं ता. ५ फेब्रुवारी १८८७ रोजीं बोर्डापुढें असा ठराव मांडला कीं, सर्व सभासदांचा पगार ५ रुपयांनीं वाढवावा.

टिळक सभेला येतांच त्यांना सांगण्यांत आलें कीं, या सूचनेला सर्व सभासद अनुकूल आहेत. टिळक चकित झाले. त्यांनीं सांगितलें कीं, सोसायटीचा कायम निधि ३५००० रु. होईपर्यंत पगारवाढीच्या भानगडींत पडूं नये. हें टिळकांचें मत कांहीं सभासदांना पटूं लागलें. आगरकर रागावले. वादविवाद विकोपास गेले. प्रश्नाचा निकाल लावल्याशिवायच सारे उठून गेले. "आगरकरांच्या अंतःकरणांत निराशेमुळें निष्ठुरता उत्पन्न झाली. निष्ठुरतेचें रूपांतर मत्सरांत झालें आणि मत्सराचा द्वेष

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाला." असें टिळकांनीं आपल्या राजीनाम्यांत म्हटलें आहे. त्यांनीं ता. २३ फेब्रुवारी १८८७ रोजीं मॅनेजिंग बोर्डाच्या चिटणीसांना पत्र लिहून कळविलें कीं, "सध्यां परस्परांचीं मनें परस्परांबद्दल साफ नाहीत आणि (संस्थेचीं) मूलतत्त्वें उलथून पाडण्याचे प्रयत्न चालले आहेत, अशा स्थितींत माझें चित्त कामाकडे लागणें शक्य नाहीं; तेव्हां बोर्डानें या प्रश्नांचा तावडतोब निकाल लावावा." पण ही त्यांची सूचना पालथ्या घड्यावर पाणी ओतल्यासारखी ठरली. त्यांनीं तडजोडीचे जे जे प्रयत्न केले ते सारे निष्फळ ठरले.

१८८९ च्या मेमध्यें बाहेरचें काम, पगाराचें मान व अंतर्गत संबंध याविषयीं बोर्डानें एक तडजोड ठरविली. परंतु अपवाद म्हणून बाहेरचीं कामें घेण्याची सवलत सभासदांना पुढें देण्यांत आली. 'सार्वजनिक सभेच्या' त्रैमासिकाचे काम गोखले यांनीं आपल्या गळ्यांत घेतलें. हें काम टिळकांकडे पूर्वीं आलें असतांना त्यांनीं तें नाकारलें होतें. गोखल्यांनीं आपल्या इंग्रजी विषयांत अधिकाधिक तरबेज व्हावें व कॉलेजचें वैभव वाढवावें असें टिळकांचें मत. तें ते बोलून दाखवीत आणि तेंहि अगदीं तिखट भाषेंत. त्याचा प्रतिध्वनि म्हणून इतर सभासद टिळकांना उणेंदुणें बोलूं लागले. अखेर ता. १४ ऑक्टोबर १८९० रोजीं टिळकांवर निंदाव्यंजक ठराव मंजूर करण्यांत आला. तेव्हां टिळकांना संस्थेंत राहणें अशक्यप्राय झालें. "मूळ तत्त्वांप्रमाणें आपण वागूं" असे इतर सभासद लिहून देतील अशी थोडीशी जरी टिळकांना आशा असती तरी त्यांनीं राजीनामा दिला नसता.

नैतिक निकषावर टिळकांचें वर्तन धीरोदात्त ठरतें, असेंच कोणताहि निःपक्ष इतिहासकार म्हणेल. पण भौतिक दृष्टीनें विचार करतां आणि लोकशाहीची कसोटी लावली असतां आगरकरांचें धोरण बरोबर ठरतें. संस्थेची सांपत्तिक स्थिति चांगली असतांना तिच्या सभासदांनीं पोटाला

पुस्तकालय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चिमटा घेऊन काम करण्याचें काय कारण? त्यामुळें तें कामहि चांगलें होणार नाहीं. ध्येयवादानें चालणारीं माणसें केव्हांहि विरळाच. आणि त्यांतली वरीचशीं त्यागाच्या तरवारीवरून फक्त कांहीं काळ चालूं शकणारीं! इतरांनीं, चैन न करतां, पण बऱ्या स्थितींत राहून, आपलें काम चोखपणें व प्रामाणिकपणें पार पाडावें म्हणजे पुष्कळ झालें, ही आगरकरांची व्यावहारिक नीति मनुष्य-स्वभावाला धरूनच होती. खुद्द आगरकरांना पैशाचा लोभ होता असें त्यांचा कट्टा वैरीहि म्हणणार नाहीं. त्यांनीं जें धोरण स्वीकारलें तें आपली संस्था व्यापक, चिरस्थायी व कार्यक्षम व्हावी याच हेतूनें. संस्थेवरील प्रेमामुळेंच टिळक–आगरकर एकमेकांशीं भांडले. मुलावर प्रेम करणारी एखादी आई त्याला अजीर्ण होण्याइतकें खायला घालते, त्याच वेळीं त्याच्या बापाला मुलाला लंघन घालण्याची आवश्यकता वाटते–कारण दोघांचेंहि मुलावरील प्रेम खरें व निस्सीम! तसाच कांहींसा प्रकार टिळक–आगरकरांच्या या विरोधांत दिसून येतो.

आज साठ वर्षांनंतर इतिहास कोणाच्या बाजूनें कौल देत आहे? जेसुइट लोकांप्रमाणें आजमित्तीला काम करणारे कार्यकर्ते न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेज यामध्यें किती आहेत? संस्थेचा शाखापल्लवविस्तार तर बहुत झाला आहे. किंबहुना महाराष्ट्रांत तो अद्वितीयच म्हटला पाहिजे. पण त्या सर्व शाखांतून आणि पल्लवांतून आद्य संस्थापकांनीं संस्थेंत ओतलेला जीवनरस आज वहात आहे काय? त्यागी देशभक्तांची व समाजसेवकांची टांकसाळ असें आरंभींचें स्वरूप या संस्थांना आतां किती प्रमाणांत आहे याची चिकित्सा केली पाहिजे. तिच्यापासून जो निर्णय निष्पन्न होईल त्यावरूनच या राजीनामा-प्रकरणांत टिळक व आगरकर यांपैकीं कोण बरोबर होते हें ठरणार आहे.

केसरींतून आगरकर आणि सोसायटींतून टिळक बाहेर पडल्यामुळें या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोघां समाजसेवकांनीं जवळ येण्याचें, सहकार्य करण्याचें आणि देवाणघेवाण करून सलोखा वाढण्यांचे प्रसंग कमी झाले. दोघांच्या दोन स्वतंत्र छावण्या उभारल्या गेल्या. त्यांतून एकमेकांवर निःसंकोचपणें गोळागोळी सुरू झाली. घरांत दोन भाऊ भांडले म्हणजे भिंतीला भिंत लागून ते रहात असले तरी अगदीं क्षुल्लक कारणावरून कडाक्याचीं भांडणें होऊं लागतात. १८९१ च्या ऑक्टोबरमध्यें, म्हणजे टिळक सोसायटींतून बाहेर पडल्यानंतर, दुसऱ्याच वर्षीं पंचहौद मिशन गाजलें तें यामुळेंच. पुण्यांत स्वार-गेटापलीकडे वेताळ पेठेंत अद्यापहि पंचहौद मिशन आहे. तेथें पुण्यांतील प्रमुख मंडळींना व्याख्यानासाठीं बोलाविण्याची शक्कल गोपाळराव जोशी या वल्लीनें काढली. "पंचहौद मिशन"च्या शाळेच्या मुख्य शिक्षकां-मार्फत हीं निमंत्रणें पाठविण्यांत आलीं होतीं. त्या निमंत्रणानुसार न्या. रानडे, बळवंतराव टिळक, हरिभाऊ आपटे, गोविंदराव कानिटकर इत्यादि बावन्न सुशिक्षित मंडळी हजर होती. आगरकर गेलेले नव्हते. व्याख्यान झालें. नंतर मामुली शिष्टाचार म्हणून चहा देण्यांत आला. प्रत्येक निमंत्रितापुढें चहा व बिस्किटें ठेवलेलीं होतीं.

या "चहाच्या पेल्यांतून"च पुढें गंमतीचें वादळ निर्माण झालें. ख्रिस्त्याच्या हातचा चहा कसा घ्यावा? ही शंका त्यांतील बऱ्याच पाहुण्यांना आली. तो काळच तसा होता. आज आपल्याला त्याची जाणीव, कल्पनाशक्ति कितीहि ताणली तरी, येणें कठिण आहे. गोव्याच्या प्रांतांत मिशनऱ्यांनीं विहिरींत पावाचे तुकडे टाकल्यामुळें गांवेंच्या गांवें बाटलीं. हें आज आगगाडींत व उपाहारगृहांत कोठलाहि व कोणाचाहि पाव जठराग्नींत लोटणाऱ्या तरुणांना खरें कसें वाटणार ! मिशनऱ्याच्या हातचा चहा घेणें पुष्कळांना संकट वाटूं लागलें. पण 'तो घेत नाहीं' असें ठासून सांगण्याचें धैर्यहि त्यांना होईना. चहा घेतला तर धर्म बुडाला असें मानून लोक हसणार, न घेतला तर शिष्टाचार सोडला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असें मानून मिशनरी व बरोबरीचे लोक हसणार. अशा पेंचांत कांहीं लोक सांपडले. त्यांपैकीं कांहींनीं चहाला नुसता हस्तस्पर्श केला. कांहींनीं घोटभरच चहा घेतला, आणि कांहींनीं डोळे मिटून झटपट सारा कप फस्त केला. न्या. रानड्यांनीं पेला हातांत घेतला, शिष्टाचाराचा मान केला व पेला खालीं ठेवला. 'तेरी बी चूप मेरी बी चूप' असें मनांतल्या मनांत म्हणत हे पुण्यांतील व्याख्यानलोलुप व शिष्टाचारप्रवीण पंडित आपापल्या घरीं हसत हसत निघून गेले.

"पुणें वैभव" हें सनातनी पक्षाचें वर्तमानपत्र. त्यांत सहा महिन्यांनंतर मिशनच्या साऱ्या पाहुण्यांचीं नांवें प्रसिद्ध झालीं. कोणीं केलीं तीं नांवें प्रसिद्ध ? वाचकांना तर तो प्रश्न पडलाच. पण मिशनचा पाहुणचार घेणाऱ्यांना तर तो प्रश्न–प्रश्न कसला ?–प्राणसंकटच येऊन पडलें. त्यांना ज्यानें पहिल्या संकटांत घातलें त्यानेंच हें दुसरें संकट निर्माण केलें ! गोपाळराव जोश्यांनींच त्यांच्या नांवांची यादी 'पुणें वैभव' कारांना दिली. बड्या बड्या धेंडांचीं ढोंगें चव्हाट्यावर आणून आपण गंमत पहावी यापलीकडे गोपाळरावांचा कांहीं उद्देश असेल असें वाटत नाहीं. विचारानें सुधारक पण आचारानें सनातनी अशा या आंग्ल शिक्षितांचें बेंड फोडणें म्हणजे समाजसुधारणेला मदत करणें होय, असा विचार त्यांच्या चित्ताला स्पर्श करून गेला होता कीं काय हें सांगणें कठीण. 'पुणें वैभवांत' खऱ्याबरोबर कांहीं खोटींहि नांवें छापलीं गेलीं होतीं. जे मिशनमध्यें गेलेच नाहींत पण 'बाटलेल्यांच्या' यादींत ज्यांचीं नांवें आलीं अशा लोकांनीं 'पुणें वैभव'-कर्त्यांवर बेअब्रूची फिर्याद केली. संपादकाला दोनशें रुपये दंड झाला. तें ठीक झालें. पण जें मिशनमध्यें गेले त्यांची बेअब्रू समाजांत होतच राहिली.

शंकराचार्यांनीं त्यांचेवर नोटीसा बजावल्या. शंकराचार्यांच्या आज्ञेला रानडे-टिळक प्रभृतींनींहि मान दिला. शंकराचार्यांच्या 'कमिशन'नें या ग्रामण्य-प्रकरणाचा निकाल पुढीलप्रमाणें दिला. 'टिळकांनीं चहा घेतल्यानंतर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्रीक्षेत्र काशीस जाऊन सर्व प्रायश्चित्त घेतल्याचा खात्रीचा दाखला दिला. शिवाय पुण्यासहि दोन कृच्छ्र प्रायश्चित्त केलें. म्हणून त्यांनीं आणखी प्रायश्चित्त घेण्याचें कारण नाहीं. आठ जणांनीं ज्ञाताज्ञातदोषनिवारणार्थ प्रायश्चित्त मिळण्याबद्दल अर्जच दिला होता. सबब त्यांना तो त्यांचा अर्ज बहाल करून सर्व प्रायश्चित्त घेण्याचा हुकूम झाला.' हे आठ इसम म्हणजे रा. ब. माधवराव रानडे, रा. ब. विष्णु मोरेश्वर भिडे, रा. ब चिंतामण नारायण भट, रावसाहेब गोविंदराव कानिटकर, सितारामपंत देवधर, वामनराव रानडे आणि वामनराव परांजपे. सरकारी न्यायमंदिर आणि शंकराचार्यांचें न्यायमंदिर या राजकीय व धार्मिक अशा दोन्ही नियंत्रणांना दाद न देणारे कांहीं घट्ट कातडीचे लोक होतेच.

पुण्यांत इतका गाजावाजा झाला असतांना, त्यांत टिळक-रानड्यां-सारखीं मोहरीं सांपडलेलीं असतांना-आणि त्यांचे निमित्तकारण एक जीर्ण धर्मविचार असतांना, आगरकरांचा 'सुधारक' स्वस्थ कसा बसेल ? अस्तन्या मागें सारून त्यांनीं या सुशिक्षितांवर हल्ले चढविण्यास प्रारंभ केला. सुधारकांचे गुरु म्हणून मानले गेलेले न्या. रानडे यांनींसुद्धां प्राय-श्चित्त घेतलें. यामुळें "सुधारकांचें नाक ठेचलें गेलें" अशा आशयाचें एक पत्र "सुधारकां"त प्रसिद्ध झालें. या बाबतींत आगरकरांचीं मतें स्वच्छ ठाम होतीं. त्यांच्या लेखणीला लेचेपेंचेपणा माहीतच नव्हता. पण त्यांनाहि एक पेंच पडला. न्या. रानड्यांनीं प्रायश्चित्त घेतलें याचा अर्थ पाप केल्याचीं कबुली दिली. तें पाप कोणतें ? तर मिशनऱ्याकडचा चहा पिणें, यांत पाप कसलें ? असा आगरकरांचा प्रश्न. पण न्यायमूर्तींवर टीका करणें हें आगरकरांना गुरु, द्रोणावर शरसंधान करणाऱ्या अर्जुनाइतकेंच जड गेलें. आधीं वंदनाचे चार बाण पायाशीं सोडून अर्जुनानें जसा आदर-भाव व्यक्त केला, तसाच आगरकरांनीं रानड्यांवर टीका करतांना दाखविला. तारुण्याच्या उंबरठ्यावर उभे असतांना, राष्ट्रभक्तीचा ध्रुवतारा डोळयास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिसत असतांना, न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना करण्यापूर्वी, आगरकर-टिळकांनीं प्रथम कोणाचा सल्ला घेतला असेल आणि कोणाचें मार्गदर्शन मानलें असेल तर तर तें न्या. रानड्यांचेंच. शिवाय त्यांची अगाध विद्वत्ता, त्यांची बहुविध देशभक्ति आणि त्यांचा समुद्रासारखा शांत व उदार स्वभाव इत्यादि गुणांमुळें त्यांच्या विरुद्ध चार शब्द बोलणें व लिहिणें म्हणजे कोणासहि हिमालयावर थुंकण्यासारखेंच गैर वाटे.

"हें गूढ कोडें आहे" या नांवाच्या ता. १३ जून १८९२ च्या सुधारकांतील अग्रलेखांत आगरकरांनीं न्या. रानडे यांच्यावर टीका केली आहे, ती त्यांच्या विषयींचा सारा आदरभाव कायम ठेवून लिहिलेली आहे. आपल्या सुधारकी मताविषयीं अचल निष्ठा आणि न्यायमूर्तींविषयींची अगाध भक्ति या दोन्हीं वृत्तींना संभाळून आगरकरांनीं हा लेख मोठ्या कौशल्यानें लिहिलेला आहे. समतोल टीकेचा हा उत्कृष्ट नमुना होय. "या अत्यंत खेदजनक ग्रामण्यप्रकरणांविषयीं आम्हांस जें शांत विचारांतीं उचित वाटलें तें आपणांकडून होईल तितक्या काळजीनें लिहिलें आहे. असें असूनहि जर एखाद्या सन्मान्य पुरुषाविरुद्ध टाकांतून एखादा वेडा-वांकडा शब्द गेला असेल तर त्याबद्दल आम्हांस फार वाईट वाटणार आहे, हें सांगावयास नकोच." अशी आपली नम्र व हळुवार भूमिका आगरकरांनीं या लेखांत ठेवली आहे. "माधवराव लुथर किंवा बुद्ध नाहींत......सुधारकांच्या दृष्टीनें सांप्रत प्रसंगीं माधवरावजींचें वर्तन या इयत्तेंत उतरलें नाहीं." असें आपलें स्पष्ट मत आगरकरांनीं दिलें आहे. पण तें देतांना आपला नेहमींचा आवेश व उपरोध हीं शस्त्रें त्यांनीं म्यान करून ठेवलीं आहेत. "लोकाग्रणीत्वाप्रत पावलेल्या असामान्य पुरुषाच्या वर्तनाची चर्चा" किती जपून व जबाबदारीनें करावयास हवी याचा उत्कृष्ट कित्ताच आगरकरांनीं या लेखांत घालून दिला आहे. "त्यांनीं जें केलें आहे किंवा जें त्यांस करावयास लागलें, तें त्यांना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांच्या समजुतीप्रमाणें वावगें वाटत नसलेंच पाहिजे. तथापि लोकांना त्यांचें करणें बरोबर वाटत नाहीं." हें वाक्य तर जणूं कांहीं श्री. न. चिं. केळकर यांनींच लिहिल्यासारखें भासतें. न्या. रानडे यांचा द्वितीय विवाह म्हणजे तर टीकाकारांना पर्वणीच. घरीं २१ वर्षांची बहीण विधवा होऊन आलेली, पहिली बायको मरण पावून पुरते दोन महिने होत आहेत, तोंच ११ वर्षांच्या अशिक्षित कुमारिकेशीं त्यांनीं लग्न केलें!! पण आगरकरांचें टीकाशस्त्र या प्रकरणीं बोथटच राहिलें.

हा सारा हळुवारपणा आणि समतोलपणा फक्त रानड्यांपुरताच. टिळकांच्या बाबतींत थेट दुसरें टोक. एखादें सावज झाडाझुडुपांत अडकलेलें पाहतांच शिकाऱ्याला जो अनिवार हर्ष होतो व त्वेष येतो, तो आगरकरांना आपलें पूर्वीचे सहकारी पण आतांचे प्रतिस्पर्धी टिळक चहाग्रामण्यप्रकरणांत अडकलेले पाहतांना झाला. त्यांची लेखणी आवेशानें उसळूं लागली. त्या भरांत तिचें तारतम्याचें व सत्यासत्याचें ज्ञानहि सुटलें. आणि त्यांतून एक नवेंच खेकटें आगरकरांच्या पाठीशीं लागलें. त्यांनीं ता. १४ नोव्हेंबर १८९२ च्या सुधारकांत "वेळेवर सूचना" या नांवाच्या अग्रलेखांत संमतिवयाच्या बिलाचे विरोधकांवर खरपूस टीका केली आहे. ती करीत असतांना त्यांची त्वेषांध लेखणी असें लिहून गेली कीं, "ख्रिस्त्याच्या हातचा चहा पिऊन व स्टेशनावरील मुसलमान किंवा पोर्तुगीज मेसमनच्या हातचा भात व बिसकुटें झोडून, श्रीशंकराचार्यांशीं वर्दळ घालीत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं." टिळक कायदेपंडित. त्यांनीं "मेसमनच्या भाताचा" असत्य उल्लेख आधारास घेऊन ता. २२ च्या केसरींत आगरकरांवर झोड उठविली आणि सुधारकानें आपल्यावरील भात खाल्ल्याचा आरोप परत घ्यावा असें खडसावलें. त्याबरोबर ता. ५ डिसेंबरच्या अंकांत आगरकरांनीं आरोप सपशेल परत घेतला. "बोलणें फोल झालें." असें घळघळीत नांव त्यांनीं आपल्या या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माफीला दिलें. निःसंदिग्धपणें आरोप परत घेतांना ते लिहितात, "ज्या गृहस्थांच्या भरंवशावर आम्ही आपल्या टांकास इतकें स्वेच्छाचारी होऊं दिलें, ते आतां आम्हांस असें सांगतात कीं, "आमचें बोलणेंच तुम्हांस नीट समजलें नाहीं. टिळकांनीं भात व बिस्कुटें झोडलीं असें आम्हीं म्हटलें नाहीं, तर भात व बिस्कुटें झोडणाऱ्या मित्रांच्या समागमें टिळक होते, एवढेंच काय तें आम्हीं म्हटलें! कोल्हापूरच्या खटल्याची अद्दल घडली असून नुसत्या तोंडी पुराव्यावर आम्ही इतके कसें विसंबलों, याजबद्दल आम्हांस मोठा विस्मय वाटतो."

या माफी प्रकरणांबाबत सुधारकाचे एक सहसंपादक श्री. सीताराम गणेश देवधर यांनीं "माझा जीवनवृत्तांत" या ग्रंथांत जी माहिती दिली आहे तीवरून असें दिसतें कीं, त्या वेळीं श्रीशंकराचार्यांकडून सामाजिक सुधारणेच्या बाबतींत कांहीं साहाय्य मिळावें अशी खटपट रानड्यांनीं चालविली होती. त्या खटपटींत टिळकांसारख्यांची मदत मिळाली तर रानड्यांना पाहिजेच होती. हें समाजहिताचें धोरण मनाशीं बांधून, गोपाळराव गोखले व शिवरामपंत साठे या दोघांस बरोबर घेऊन न्या. रानडे ता. २८ नोव्हेंबर रोजीं आपण होऊन आगरकरांकडे गेले आणि टिळकांवरील भात खाल्ल्याचा आरोप परत घेण्यास परोपरीनें व आग्रहानें सांगूं लागले. त्यांचा शब्द आगरकरांना मोडवेना. म्हणून आगरकरांनीं बिनशर्त माफी मागितली. नाहीं तर त्याचें आधींच्या सुधारकांतच आगरकरांनीं आपल्या नेहमींच्या बाणेदार स्वभावानुसार असें लिहिलें होतें कीं, "आम्ही आपलें विधान परतहि घेत नाहीं व ज्याच्या आधारावर तें केलें आहे तो पुरावाहि आम्ही प्रसिद्ध करीत नाहीं; तुम्हांस काय करणें असेल तें तुम्हीं खुशाल करावें." या सडेतोड भूमिकेवरून माफीच्या पायरीवर उतरतांना आगरकरांना किती मनःक्लेश झाले असतील, आणि केवढा मनःसंयम करावा लागला असेल याची कल्पना कोणासहि करतां येण्यासारखी आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अशीच एक छोटीशी झटापट टिळक-आगरकरांमध्यें पुढील वर्षी झाली. ता. १२ जून १८९३ च्या सुधारकांत आगरकरांनीं एका विवाहाचें अभिनंदन केलें. या विवाहांतील वधू टिळकांची कन्या कृष्णाबाई ही होती. त्या वेळीं तिचें वय तेरा वर्षांचें होतें. मग त्यांत आगरकरांना अभिनंदनीय असें काय सांपडलें ? आदल्या वर्षी हीच कृष्णाबाई सहाव्या यत्तेंत बसली म्हणून आगरकरांनीं सुधारकांत आनंद प्रदर्शित केला होता आणि तिला यश चिंतिलें होतें. त्यानंतर 'ती उत्तीर्ण झाली हें कळविण्यास आम्हांस फार आनंद व अभिमान वाटतो,' असेंहि आगरकरांनीं पुढें लिहिलें. याचा हेतु उघडच होता. तो म्हणजे तेव्हां स्त्री-शिक्षण दुर्मिळ होतें. म्हणून सहावी शिकलेल्या मुलीचेंहि अभिनंदन आगरकरांनीं, आपलें टिळकाशीं असलेलें वाकुडेंपण विसरून, मनमोकळेपणें केलें. पण कृष्णाबाईच्या विवाहाचें अभिनंदन मात्र त्यांनीं इतक्या निर्मळ हेतूनें व निष्कलंक रीतीनें केलें असें दिसत नाहीं. 'या विवाहाचा विशेष निर्देश करण्याचें कारण या विवाहांतील वधूचें प्रौढ वय हें होय.' एवढेंच लिहून आगरकरांनीं 'दीर्घायुरस्तु, धनधान्यसमृद्धिरस्तु, इष्टकार्यसिद्धिरस्तु,' असा आशीर्वाद दिला असता तर सरळ झालें असतें. पण 'सोळा वर्षांपर्यंत आम्हीं आपल्या कन्येचा विवाह करणार नाहीं, अशा दुसऱ्या लोकांपासून सह्या मागणारे रा. टिळक यांनीं आपल्या कन्येचा त्या वयापूर्वी विवाह करावा,' या 'मानसिक धैर्याभावा' बद्दल आगरकरांनीं सूचक रीतीनें टिळकांना दूषण दिलें आहे. टिळकांनीं उत्तरादाखल केसरींत लिहिलें, 'सोळा वर्षांपर्यंत कन्येचा विवाह करणार नाहीं, अशा तऱ्हेच्या सह्या रा. टिळकांनीं कधीं केल्या होत्या ? हें सुधारककार निश्चयानें सांगतील तर बरें होईल.' आगरकरांचा आरोप होता सह्या 'मागितल्याचा' आणि टिळकांचा इन्कार आहे सह्या 'केल्याबद्दल.' १८९० च्या ऑक्टोबरांत टिळकांच्या सहीनें सुधारणाविषयक बाबींसंबंधीं पुढील कलमांचें पत्रक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रसिद्ध झालें होतें. (१) मुलीचें लग्न सोळा वर्षांच्या आंत करूं नये. (२) वीस वर्षांच्या आंत मुलाचें लग्न करूं नये. (३) पुरुषाचें लग्न चाळीस वर्षांपुढें होऊं नये. (४) चाळीस वर्षांपुढें लग्न करणें झाल्यास विधवेशीं विवाह करावा. (५) दारू पिणें बंद असावें. (६) हुंडा घेण्याची चाल अजीबात बंद करावी. (७) प्राप्तीचा दहावा भाग सार्वजनिक कामाकडे द्यावा. (८) विधवेचें वपन करूं नये. या वादांत आगरकरांची बाजू सत्याची होती, आणि म्हणून त्यांचा जय झाला.

टिळक-आगरकरांमधील या वैराच्या वैराण वाळवंटांत फक्त एकदांच स्नेहाची हिरवळ पसरली होती. त्या प्रेमळ प्रसंगाचें वर्णन श्री. यशोदाबाई आगरकर पुढील घरगुती शब्दांनीं करतात.

"याच सुमारास झाली काय गंमत, टिळकांच्या मुलाची मुंज निघाली. टिळक आमच्या घरीं आले व म्हणाले, 'गोपाळराव, तुमचे–आमचे मतभेद आहेत, असूं देत; पण माझ्या मुलाच्या मुंजीला मात्र तुम्हीं आलंच पाहिजे. त्याचं आणि तुमचं कांहींच वाकडं नाहीं.' तेव्हां ते म्हणाले, 'मी मुंजीला येणारच आहे; पण तुम्हांला माहीत आहे माझी प्रकृति ठीक नसते. शिवाय आई वारल्यापासून मी कोणाकडे जेवावयासहि जात नाहीं, मीं परान्न सोडलें आहे.' त्यावर टिळक हसत हसत म्हणाले, 'एक पावभर तांदूळ द्या म्हणजे झालें. जातों घेऊन! मग कसलं आलं आहे परान्न!" कौरव–पांडवांचें धर्मयुद्ध दिवसा लढलें गेल्यावर रात्रीं परस्परांच्या वीरांनीं गांठीभेटी घ्याव्या तसा हा प्रकार हृद्य वाटतो. तीच खेळीमेळीची व धर्मयुद्धाची भावना राजकारणांतहि सतत ठेवण्याचा काळ तेव्हां आलेला नव्हता, तो पुढें यावयाचा होता.

• • •

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जीवनाची सिद्धि : : ७

वादाचीं अशीं वादळें वर्तमानपत्रांत उठत असलीं, तरी शाळा-कॉलेजांचें यश शुक्लपक्षांतील चंद्रकलेप्रमाणें वाढतच होतें. १८९२ सालीं दुसऱ्या बी. ए. पर्यंतचे वर्ग सुरू होऊन कॉलेज पूर्णावस्थेस पोहोंचलें. त्याच्या नव्या इमारतीचा पाया याच वर्षी लॉर्ड हॅरिस यांनीं घातला. परीक्षेंत विद्यार्थ्यांनीं यशाहि मोठें नामी मिळविलें. मॅट्रिकमधील संस्कृत शिष्यवृत्ति ही तर जणूं कांहीं न्यू इंग्लिश स्कूलला आंदणच दिलेली. तिचें सारें श्रेय प्रिं. वामनराव आपटे यांना होतें. कॉलेजांत कडक शिस्त राखून विद्यार्थ्यांचे अभ्यास व्यवस्थितपणें करून घेण्याचें श्रेय आपट्यांचेंच. ते ता. ९ ऑगस्ट १८९२ रोजीं वारले. त्यांचे जागीं आगरकरांची नेमणूक फर्ग्यूसन कॉलेजचे प्रिन्सिपल म्हणून झाली. १८८५ सालीं आगरकर न्यू इंग्लिश स्कूलचे सुपरिंटेंडेंट झाले होते. १८९२ सालीं प्रिन्सिपलशिपची माळ त्यांच्या गळ्यांत पडली. मुंबई विश्वविद्यालयाचे ते फेलोहि त्याच वर्षी झाले. आपट्यांच्या मृत्यूबद्दल आगरकरांनीं हृदयस्पर्शी उद्गार काढले आहेत. " होतकरू तरुण विद्वान् अल्पायुषी होणें यांत समाजाचें मोठें नुकसान आहे. पण त्यांतल्या त्यांत स्वहिताकडे बिलकुल दुर्लक्ष करून ज्यांनीं आपली सारी बुद्धि व हिंमत देशकार्याकडे लाविली आहे व एखाद्या मोठ्या संस्थेचा बोजा आपल्या शिरावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घेतला आहे, अशांचा अकालिक वियोग फारच खेदजनक होतो. " असा तात्त्विक विचार आगरकरांनीं या मृत्युलेखाच्या आरंभीं मांडला आहे.

आपटे आगरकरांच्या आग्रहामुळेंच सोसायटीस येऊन मिळाले. त्यांच्या-बरोबर खांद्याला खांदा लावून आगरकरांनीं अनेक वर्षें काढलीं, त्यामुळें त्यांच्या अकालमृत्यूनें सोसायटीचें व समाजाचें जितकें नुकसान झालें त्यापेक्षां त्यांच्या सहकाऱ्यांचें–विशेषतः आगरकरांचें–शतपटीनें नुकसान झालें, हें सांगण्यासाठीं आगरकर आपलें हृदयच उकलून दाखवीत आहेत. ते म्हणतात–" त्यांच्या वियोगापासून त्यांच्या सहकाऱ्यांस होणाऱ्या अनिर्वचनीय दुःखाची कोण कल्पना करील? त्यांपैकीं ज्यांचें स्वभाव–सादृश्या-मुळें किंवा विचार–सादृश्यामुळें वामनरावांशीं विशेष संघटन होतें त्यांच्या डोळ्यांपुढून त्यांची ती वामनमूर्ति जात नसेल; घटकोघटकीं वामनराव आल्याचा व बोलल्याचा भास होत असेल; थोडा एकान्त झाला व मनास फुरसत सांपडली कीं एका ठिकाणीं बसून केलेल्या मोठमोठ्या बेतांची आठवण होऊन पोटांत भडभडून येत असेल. " 'वामनरावांचें स्मरण होऊन ज्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा खचित वाहूं लागतील ' असें आपण असल्याचेंहि आगरकरांनीं या लेखाच्या शेवटीं मोठ्या स्निग्धपणानें लिहिलें आहे.

फर्ग्यूसन कॉलेजच्या प्रिन्सिपलच्या जोखमीची धुरा आगरकरांनीं आपल्या मानेवर घेतली. आणि दम्यानें आपली प्रकृति पोखरून काढली असतांहि ती जबाबदारी पार पाडण्यासाठीं आपली सर्व शक्ति खर्च केली. १८९३ च्या अखेरीस बी. एस्सी.च्या संपूर्ण अभ्यासाची सोय फर्ग्यूसन कॉलेजांत करण्यांत आली. त्यामुळें वाङ्मयात्मक व शास्त्रीय अशा दोन्ही अंगांनीं कॉलेज परिपूर्ण झालें. त्याच वर्षी न्यू इंग्लिश स्कूल-साठीं वसतिगृहहि निघालें. " असमंजस मुलांना भलत्याच नादास लावणाऱ्या मोहक वस्तूंची समृद्धि पुण्या–मुंबईस असल्यामुळें चांगल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देखरेखीशिवाय त्यांना येथें ठेवणें मोठ्या धोक्याचें आहे." ही तत्कालीन स्थिति वर्णन करून आगरकरांनीं या वसतिगृहाचें महत्त्व पालकांना पटविलें होतें. यशाच्या अशा एकेक पायऱ्या सोसायटी चढत असतांनाच तिला पायबंद घालण्याचाहि कुटिल उद्योग याच वेळीं चालू झाला. सरकारचें डेक्कन कॉलेज दिवसेंदिवस वटत चाललें आणि सोसायटीचें फर्ग्यूसन कॉलेज अधिकाधिक बहरूं लागलें. 'पुण्यांत दोन कॉलेजांची जरूरी नाहीं." या सबबीवर फर्ग्यूसन कॉलेजची ग्रँट बंद करण्याचा प्रयत्न झाला. त्याचा निषेध मुंबईचे पुढारी फेरोजशहा मेहता यांनीं ता. ४ एप्रिल १८९३ रोजीं मुंबई येथील एका भाषणांत केला. त्यामुळें हें गंडांतर कोरड्या ढगांप्रमाणें डोक्यावरून आलें तसें गेलें. उलट मुंबईचे माजी गव्हर्नर सर जेम्स फर्ग्यूसन यांनीं ता. १३ फेब्रुवारी १८९५ रोजीं कॉलेजला भेट देऊन परम संतोष प्रगट केला.

आगरकर मुंबई विद्यापीटाचे फेलो म्हणून मुंबईस जात. तेथें त्यांना टिळकहि भेटूं लागले. कारण १८९४ च्या प्रारंभीं टिळक युनिव्हर्सिटीचे फेलो म्हणून निवडून आले. दोघेहि तरुण, दोघेहि विद्वान्, दोघेहि एकाच ध्येयानें आपलें तनमनधन झिजविणारे पण आतां मतभेदामुळे दोघांचे जीवनप्रवाह पांगलेले, किंबहुना एकमेकांवर आदळणारे—असे झाले असतांना त्या दोघांना पुनः एकाच कार्यासाठीं एकत्र आणण्याचें श्रेय देवी सरस्वतीनें मात्र मिळविलें. न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्यूसन कॉलेज यामध्यें मागासलेल्या जातींतील विद्यार्थ्यांना विशेष साहाय्य करण्याचा उपक्रम आगरकरांनीं सुरू केला.

फर्ग्यूसन कॉलेजच्या आयुष्यांतील एक संस्मरणीय प्रसंग १८९५ सालीं घडून आला. आजपर्यंतच्या साऱ्या संकटांची जणूं काय ती सांगताच होती. टिळक—आगरकर आदींच्या तपस्येची ती परिपूर्तीच होती. शास्त्रीबुवांनीं प्रवर्तित केलेल्या ज्ञानयज्ञाचें पसायदान लाभण्याचा सुयोग आतां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्राप्त झाला. शिवाजीनें चार मावळे गोळा केले; दोन शस्त्रें जमविलीं, मोंगली सत्तेशीं टक्कर दिली आणि एकामागून एक परक्या सत्तेंतील किल्ले सर केले, पण त्याला राजाचा बहुमान मिळूं लागला रायगडला राज्याभिषेक झाल्यानंतरच. तसा फर्ग्यूसन कॉलेजचा राज्याभिषेक ता. २७ मार्च १८९५ रोजीं मोठ्या थाटानें झाला. तो पाडव्याचा दिवस होता. कॉलेजची इमारत पूर्ण झाली होती. तें भव्य व रमणीय सरस्वतीमंदिर पाहण्यासाठीं पुण्याचे जिज्ञासु तरुण चतुःशृंगीजवळील त्या मैदानाकडे जात असत. मुंबईच्या विद्वानांनींहि फर्ग्यूसन कॉलेजची प्रशंसा चालविली होती. महाराष्ट्राचें विशिष्ट भूषण म्हणजे टणक डोंगर. त्यांची उंचसखल अशी छोटीशी रांग कॉलेजच्या इमारतीपाठीमागें दिसत होती. जणूं कांहीं चिपळूणकरप्रभृतींनीं जें शैक्षणिक स्वराज्य स्थापन केलें त्याला आशीर्वाद देण्यासाठींच सह्याद्रीनें आपले हे प्रतिनिधी पाठविले होते. शिवकालीन मावळ्याप्रमाणें फर्ग्यूसोनियन विद्यार्थी आणि विद्यार्थिनी त्या खत्रीर खडकावर माकडाप्रमाणें पटापट चढतील आणि खारीप्रमाणें शूळकन् धावत जातील व आपलें शरीर त्या डोंगरासारखें भक्कम बनवतील आणि आपलें मन त्या डोंगरावरील वाऱ्याप्रमाणें शुद्ध व मोकळें ठेवतील, अशी आशा त्या कॉलेजच्या पाठीराख्या सह्याद्रीनें तेव्हां मनांत धरली असेल काय ?

कॉलेजची इमारत उघडण्याचा समारंभ मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड सँढर्स्ट यांच्या हस्तें साजरा झाला. "ज्या कार्याकरितां मीं हा प्रवास अंगीकारला आहे त्याहून अधिक योग्यतेचें दुसरें एखादें कार्य शोधून काढतां येणें फार कठीण आहे," असे गौरवाचे उद्गार गव्हर्नरांनीं काढले. कोल्हापूरच्या छत्रपतींनीं आपल्या भाषणांत सोसायटीच्या संस्थापकांच्या त्यागाची प्रशंसा केली. डॉ. सेल्बी यांनीं गव्हर्नरांचे आभार मानतांना सोसायटीच्या कार्याचें वैशिष्ट्य सांगून तिचें अभिनंदन केलें. सर्वसामान्य नाग-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

रिकांनीं तर या सिद्धीस गेलेल्या शिक्षणकार्यावर प्रशंसेची पुष्पांजलि मुक्त हस्तानें वाहिली. आगरकरांना अपरंपार आनंद वाटला ! या समारंभा-करितां सोसायटीचे अध्यक्ष कोल्हापूरचे छत्रपति शाहू महाराज हे उपस्थित होते यांत नवल काय ? त्यांच्या वडिलांचा कैवार घेऊन सोसायटीचे आद्य संस्थापक टिळक–आगरकर यांनीं छत्रपतीच्या गादीची अविस्मरणीय सेवा केलेली होती. पण मिरज, कागल वगैरे संस्थानांचे अधिपतीहि समारंभा-साठीं आले होते.

काय घडलें व साधलें याचें हें वर्णन झालें. पण जें हुकलें व राहिलें तेंहि कांहीं थोडथोडकें नव्हतें. आणि जें होतें तें अत्यंत दुःखदायक. एखाद्या युद्धांत विजयश्री संपादन करून जिंकलेल्या किल्ल्यावर आपलें निशाण एखाद्या वीरपुरुषानें लावावें असा हा हर्षाचा व अभिमानाचा प्रसंग होता. पण त्या वीराला जिव्हारीं जखमा झालेल्या असाव्यात म्हणजे त्याच्या आनंदावर दुःखाचा तवंग जसा पसरत राहतो, तशी संमिश्र स्थिति झालेली होती. त्यांचे अग्रेसर मार्गदर्शक विष्णुशास्त्री हे तर वयाच्या ३२ व्या वर्षी, शाळा निघाल्यानंतर दोनच वर्षानंतर, वैकुंठवासी झाले. संस्थेच्या आद्य संस्थापकांपैकीं दुसरे सहकारी बळवंतराव टिळक यांनीं १८९० सालीं राजीनामा दिला. त्यानंतर लौकरच नामजोशी रजेवर म्हणून जे गेले ते पुनः कामावर आलेच नाहींत. प्रिं. आपटे हे तर १८९२ मध्यें ३४ व्या वर्षीच निधन पावले. त्यानंतरहि मृत्यूनें आपली वक्र दृष्टि फर्ग्यूसन कॉलेजवरून काढून घेतली नाहीं. आपट्यानंतर १८९४ च्या ऐन सुरवातीस प्रो. धारप यांचें अकाल निधन झालें. आणि शेवटीं १८९५ च्या मे महिन्यांत इंग्रजीचे प्रो. वासुदेवराव केळकर यांनाहि कृतांतानें अकालींच उचलून नेलें. फर्ग्यूसन कॉलेजांतील चार प्राध्यापकांचे मृत्युलेख लिहिण्याचे दुःखद प्रसंग आगरकरांवर आले " हा पत्रकर्तेपणा पत्करला नसता तर बरें झालें असतें, " असे खेदाचे उद्गार आगरकरांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केळकरांच्या मृत्युलेखांत काढले आहेत. त्यांची ही विषण्ण तक्रार मृत्यूनें ऐकली. आणि लवकरच दूरहि केली असें दिसतें. कारण केळकरांचा मृत्युलेख हा आगरकरांचा ' सुधारकांतील ' शेवटचा लेख !

डॉ. भांडारकर, न्या. रानडे प्रभृतींनीं " आधुनिक विद्वान् अकालीं कां मरतात ? " याची जाहीर चर्चा केली होती. बालविवाह, सकस अन्नाचा तुटवडा, व्यायामाची नावड, दारिद्र्य वगैरे कारणें देण्यांत आलीं. पण कॉलेजांत शिकत असल्यावेळेपासून शरीरांत वसति करण्यासाठीं आलेला दमा आणि कॉलेजांतील तंटयाबखेडांतून कष्टानें काढावा लागलेला मार्ग या दोहोंमुळें आणि एकंदर कामाच्या दगदगीनें आगरकरांचें शरीर क्षीण होत चाललें होतें. रोगानें शरीरस्थिति व कलहानें मनःस्थिति खिळखिळी झाली होती. तरी ते आपलें अंगीकृत कार्य निष्ठेनें, निर्भयतेनें व निरलसपणें पार पाडीत होते. समाजहितासाठीं त्यांचा जीव तिळतिळ तुटत असल्यानें कोणत्याही लहानमोठया कामासाठीं आपलें रक्त आटवून व आंतडें पिळवटून ते लिहीत व बोलत. पुण्यांतील सार्वजनिक हौदावर अस्पृश्यांना पाणी भरूं देण्यासाठीं त्यांनीं १८९३ मध्यें जीव तोडून लिहिलें आहे. म्युनिसिपालिटीच्या हौदावर " ब्राह्मणाकरितां " " शूद्रांकरितां " अशा पाट्या लावलेल्या असत. पण शूद्रांचे शिंतोडे ब्राह्मणांच्या अंगावर उडत. आणि त्यामुळें दोन्ही समाजांच्या शाब्दिक चकमकी झडत. तेव्हां या पाट्याच अजीबात काढून टाकाव्यात अशी सूचना त्यांनीं नगरपालिकेस केली. त्याचबरोबर धर्माभिमान्यांसहि त्यांनीं असें सुचविलें कीं, ' सार्वजनिक हौदावरची शिवाशिव मनांत न आणतां घरांत शिरल्याबरोबर आपण आपलें पाणी सोवळें मानावें म्हणजे झालें. '

आपलें मत समाजांत रुजविण्यासाठीं युक्तिवादाचें सतत सिंचन करण्यास ते कधीं चुकत नसत. ' ज्या दुसऱ्या असंख्य जाति आज आम्हांत आलेल्या आहेत त्या सर्वांचाहि ब्राह्मणांइतकाच म्युनिसिपालिटीवर हक्क आहे ' असा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कायद्याचा मुद्दा तर त्यांनीं सांगितलाच, पण त्याशिवाय कालाचा ओघ कसा वाहात आहे हें समजावून सांगतांना त्यांनीं लिहिलें, ' आतां अमक्याच्या पोटीं अमक्याचा जन्म झाला म्हणून तो श्रेष्ठ ही कल्पना आर्ष मानली जाणार. बुद्धिबलानें जो पुढें सरेल तोच श्रेष्ठ ठरेल. या जबरदस्त विचारओघाची गति अविचार–बांधानें थांबू शकणारी नाहीं. नको नको म्हणतां हिचा तुमच्यावर परिणाम झाला आहे, होत आहे व पुढेंहि झाल्यावांचून राहणार नाहीं. देशकालवर्तमानानुसार आपल्या आचारांत फरक करण्यास धर्माची आडकाठी नाहीं. मनुष्याचा व ईश्वराचा संबंध वेगळा व मनुष्यामनुष्यांचा संबंध वेगळा. तेव्हां पहिल्या संबंधांतून निघणारी धर्मभावना दुसऱ्या संबंधांतील सामाजिक व्यवहाराच्या आड येतां कामा नये. आमच्या अतिकर्मठपणामुळें आमचा अतिशूद्र वर्ग आम्हीं गमावल्यासारखा झाला आहे.–ख्रिस्ती धर्माच्या कळपांत लोटला आहे. ''

सर्व मानवप्राणी जन्मतः सारख्या योग्यतेचे अधिकारी असून त्यांचे हक्कहि एकसारखे असतात, इत्यादि सिद्धांतांचें प्रतिपादन करून आगरकर सनातनी लोकांना असे सवाल टाकतात कीं, " शूद्राच्या स्पर्शांत पाप दडून राहिलें आहे ही अत्यंत कोती समजूत जर आम्हीं अद्याप झुगारून देणार नाहीं, तर आम्ही इंग्लंडांत काँग्रेस भरविणार कशी ? व्यापाराकरितां इतर देशीं पेढ्या स्थापणार कशा ? व शिकागोस जाऊन येणार कसे ? तेथील हौदांवरहि अशा पाख्या मारविण्याची व्यवस्था होणार आहे असें निदान आमच्या तरी ऐकिवांत नाहीं ! '' उंबरठ्याच्या बाहेर आपल्या सोवळ्या-ओवळ्याचें प्रदर्शन करीत बसण्याच्या भानगडींत पडूं नका असा सल्ला आगरकरांनीं धर्माभिमानी लोकांना दिला आणि बजाविलें, " शहाणे असाल तर आमचें ऐका. ''

आपल्या अशा सुधारणाविषयक विचारांना कोठें कोठें मधुर फळें येत आहेत हें पाहण्याचें भाग्य आगरकरांना लाभलें. त्यांच्या प्रचाराच्या छापेंत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आलेले व फर्ग्यूसन कॉलेजांत प्राध्यापक म्हणून काम करणारे श्री. धोंडो केशव कर्वे यांनीं सुधारणेच्या बाबतींत प्रत्यक्ष कृतीचें पाऊल धडाडीनें टाकलें. १८९३ च्या मार्चमध्यें त्यांनीं विधवेशीं विवाह केला. मॅजिनो तटबंदी उध्वस्त करण्याइतकाच हा पुनर्विवाह तेव्हां वाटण्यासारखा होता. रूढींचे विंध्याद्रि ओलांडण्याचें प्रत्यक्ष कार्य फारच थोडे सुधारक करीत. पण कर्वे हे नांवाप्रमाणेंच 'करवे' होते. ते कॉलेजांत आले तेव्हांच ते विधुर होते. त्यांनीं न्या. रानड्यांप्रमाणें कुमारिकेशीं विवाह करून बोलक्या सुधारणेचा थंडा मार्ग न पत्करतां एका गतभर्तृकेचें पाणिग्रहण केलें. या पुनर्विवाहाच्या निमंत्रणपत्रिका आगरकर व रा. भि. जोशी यांच्या नांवानें निघाल्या होत्या. यावरून आगरकरांनीं त्यांत किती भाग घेतला होता हें दिसून येतें. विवाहाला शेंदोनशें मंडळी आली होती. आणि दहा वीस मंडळी वधूवरांबरोबर जेवलीसुद्धां! आगरकरांनीं या 'अत्युत्कृष्ट उदाहरणा'-चें अभिनंदन करून 'सुधारकां'त असें लिहिलें कीं, "बऱ्याच सुशिक्षित विधुर तरुणांकडून त्यांचें अनुकरण होईल तर आमच्या अप्रयोजक धर्म-समजुतीमुळें वरिष्ठ वर्गांतील शेंकडों तरुण गतभर्तृकांचा आज कित्येक शतकें जो अनिर्वाच्य छळ होत आहे त्याचा बहुतेक लोप होऊन आमच्या मनुष्यपणास लागलेल्या या पुरातन कलंकाचें निरसन होईल!" 'कर्वे प्रशंसेस पात्र आहेत' असें तेव्हां केसरीनेंहि लिहिलें. पुढील दोन वर्षांत आणखी चार-पांच पुनर्विवाह घडून आले.

सामाजिक विषय हा सुधारकाचा 'निशाणाचा हत्ती' होता हें खरें. पण राजकीय, आर्थिक वगैरे प्रश्न उभे राहिले म्हणजे त्यांचाहि परामर्श आगरकर सयुक्तिक रितीनें व सडेतोड भाषेनें घेत असत. १८९३ च्या ऑगस्ट महिन्यांत हिंदु-मुसलमानांचा दंगा झाला. तो बहुधा पहिलाच दंगा असावा. त्यांतून निघणाऱ्या राष्ट्रग्रासी ज्वालांची कल्पना त्या वेळीं कोणास असणें शक्य नव्हतें. त्या दंग्याच्या मूळ कारणांची जाणीव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होऊन त्यांच्या निराकरणाचे उपायहि तेव्हां सुचणें कठिणच होतें. त्यांतहि दंग्यांच्या धडामोडींत टिळकांप्रमाणें प्रत्यक्ष भाग घेणें आगरकरांच्या वृत्तीस, प्रकृतीस व परिस्थितीस मानवणारें नव्हतें. असें असूनसुद्धां त्यांनीं मुंबईच्या दंग्याची जी मीमांसा केली आहे ती त्यांच्या अचूक बुद्धिकौशल्याची साक्ष देते. "दंग्यास सुरवात मुसलमान लोकांकडूनच झाली. त्यांच्या घोर अज्ञानाबद्दल व दुराग्रहाबद्दल कींव करून त्यांची सुधारणा करण्याचे प्रयत्न करणें, हेंच अधिक उपयोगी व शहाणपणाचें होईल. या दंग्याशीं जसा समंजस हिंदूंचा संबंध नाहीं, तसाच समंजस मुसलमानांचाहि नाहीं. राजकीय दृष्टीनें पाहतां हिंदु व मुसलमान या दोघांचीहि स्थिति अगदीं सारखी असून ती सुधारणें असल्यास त्या कामीं उभय जातींतील पुढाऱ्यांत एकमत असलें पाहिजे. आपल्या दोघांच्या भांडणानें आपण तिऱ्हाइतांचा मात्र फायदा करून देत आहोंत." इत्यादि मूलगामी व दूरदर्शी विचार आगरकरांनीं 'सुधारकांत' मांडले.

विशेष हें कीं शेंडी ठेवणें, गंध लावणें, पागोटें घालणें इत्यादि ज्या हिंदूंच्या चालीरिती आगरकरांना पसंत नव्हत्या त्या सक्तीनें बंद पाडण्याचा कुणी प्रयत्न केला तर तो मूर्खपणाचा होईल असें म्हणून आगरकरांनीं त्याचा स्पष्ट निषेध केला आहे. कोणाच्याहि जुलमाचा निषेध करण्यास आगरकर सदा सिद्ध असत. व्यक्तिस्वातंत्र्यावर आक्रमण झालेलें त्यांना खपत नसे. त्यांना कोणतीहि सुधारणा बळजोरीनें घडवून आणावयास नको होती. विचारपरिवर्तन हेंच लोकशाहीचें साधन त्यांना संमत होतें. "ईश्वरानें निर्मिलेले सर्व मानवप्राणी सारख्या योग्यतेचे आहेत व त्या सर्वांचे हक्क सारखे आहेत, या श्रेष्ठ सुधारणा–तत्त्वाचा विजय झाला," अशी आनंदाची आरोळी आगरकरांनीं दादाभाई नौरोजी यांच्या पार्लमेंट–निवडणुकीला अनुलक्षून ठोकली. १८९३ मध्येंच लाहोर काँग्रेसचे अध्यक्षपद भूषविण्यासाठीं दादाभाई विलायतेहून आले होते. त्यांचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुण्यांत मोठें स्वागत झालें. त्या स्वागत-समारंभांत आगरकरांनीं प्रत्यक्ष भाग घेतला.

अशी आपल्या कार्याची यशःसिद्धि आगरकरांच्या डोळ्यांसमोर दिसत होती. गोखले, देवधर, कर्वे वगैरे तरुण कार्यकर्ते सुधारणेचा गाडा पुढें नेण्यास समर्थ असल्याचें ते पाहात होते. "आतां मी मरणाला तयार आहे, मला लोकांना जें सांगावयाचें होतें तें मीं सांगून टाकलें आहे." असेंहि ते बोलत असत. दम्यानें कुरतडलेली प्रकृति आणि आपल्याबरोबरचे चिपळूणकर, आपटे, धारप व केळकर या चौघांचे अकालमृत्यु या दोहोंचा विचार करतां आपलें गाडें फार दिवस धकेल असे त्यांना वाटत नव्हतें. सुधारकाचें व कॉलेजचें काम बाजूस ठेवून विश्रांति घेतली पाहिजे असें डॉक्टरांनीं त्यांना बजाविलें होतें. त्याप्रमाणें तें अकोल्यास कांहीं दिवस आपले मामा दत्तोपंत भागवत यांचेकडे जाऊन राहिले होते. कॉलेजच्या इमारतीच्या उद्घाटनासाठीं ते पुण्यास आले. नंतर उन्हाळा संपल्यावर मिरजेस जाऊन राहण्याचा त्यांचा विचार होता. पण नियतीचा विचार निराळाच होता. ता. १५ जून १८९५ रोजीं शनिवारीं त्यांनीं प्रकृति सुधारण्यासाठीं रेचक घेतलें, त्यामुळें त्यांना कमालीचा अशक्तपणा आला. हें ऐकतांच मध्यंतरींचा वैराचा वडवानल विसरून टिळक आगरकरांच्या भेटीस धावले. गोखले-देवधरप्रभृति अधूनमधून येत-जातच होते. आपल्यामागें "सुधारका"चें कसें होणार? ही एकच चिंता आगरकरांना होती. ती गोखले-देवधर यांनीं दूर केली. आगरकरांचे मामा दत्तोपंत भागवत यांनीं त्यांना अभिवचन दिलें होतें. "तुमच्यामागें तुमच्या कुटुंबाचा सर्व भार मजवर आहे. त्यांना मी अंतर देणार नाहीं. त्यांची तुम्ही काळजी करूं नका."

आगरकरांची अशक्तता वाढत चालली. रविवारीं रात्रीं ते उठले व स्वतः शौचाला जाऊन आले. आल्यावर हातपाय धुऊन ते आपल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कुटुंबाला म्हणाले, " आतां मला थोडें बरें वाटतें आहे, मी आतां निजतों आणि तुम्हीहि निजा." एवढ्या दुपारीनें जें माणूस बोलतें त्याच्यावर मृत्यूनं पाश टाकून त्याला आपलेसें केलें असें त्यांच्याजवळच्या माणसास तरी कसें वाटावें ! पण आगरकर जें बरें वाटतें म्हणून प्रसन्न चित्तानें बिछान्यांत जाऊन झोपले ते कायमचे झोपले. पहाटे घरची मंडळी उठली आणि पाहतात तों गोपाळराव चिरनिद्रा घेत असलेले !

मृत्यूची वार्ता पुणें शहरांत हां हां म्हणतां पसरली. गोखले, टिळक वगैरे आगरकरांचे सहकारी कॉलेजजवळील प्रिन्सिपलच्या बंगल्यांत आले. बंगल्याबाहेर शेंकडों विद्यार्थ्यांचा समुदाय खिन्न वदनानें उभा होता. " त्यांच्या प्रेतयात्रेला जमलेला विद्यार्थिसमूह आपला प्रेमळ बाप गेला असें समजून ढळढळां रडला " अशी माहिती आगरकरांचे शिष्य ह. भ. प. पांगारकर यांनीं दिली आहे. टिळकप्रभृति स्मशानयात्रेंत सामील झाले होते. हजारों नागरिकांच्या नेत्रांतून दुःखाश्रु गळाले. मागासलेल्या जातींतील लोक, स्त्रिया वगैरे ज्यांचा ज्यांचा म्हणून आगरकरांनीं झुंझारपणें कैवार घेतला होता त्यांना अपार दुःख झालें. त्याचीं निदर्शक अशीं पत्रें पुढें वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालीं. ता. १७ जून रोजीं सोमवारीं सकाळीं मुळामुठेच्या तीरावर आगरकरांचा पार्थिव देह सर्वभक्षक कालाच्या मुखांत लुप्त झाला. त्याच वेळीं 'सुधारक' पत्राचा सातव्या वर्षाचा ३६ वा अंक बाहेर पडला. पुढें थोडीं वर्षेंच 'सुधारक' चालला.

टिळक-आगरकरांचे मूळचे संबंध सहोदरासारखे. मतभेद काय? आज आहेत, उद्यां नाहींत. जशी ज्याची परिस्थिति व विचारपद्धति तशीं त्याचीं मतें. पण मतापेक्षां मन मोठें ! टिळक-आगरकर हे दोघेहि मोठ्या मनाचे व उच्च ध्येयाचे होते. वादाच्या ऐन धुमश्चक्रींतहि आगरकर हें सामरस्य विसरले नव्हते. " महाराष्ट्रीयांस अनावृत पत्र " या हृदयाचें मंथन करणाऱ्या लेखांत आगरकरांनीं पूर्वींच लिहिलें होतें कीं, " जेव्हां खुद्द

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आगरकरांच्या किंवा आगरकरांच्या निकट आप्तांच्या डोळ्यास पाणी येण्यासारखी कांहीं अनिष्ट गोष्ट घडेल तेव्हां इतरांपेक्षां टिळकांस व जेव्हां टिळकांच्या घरीं तसा अनिष्ट प्रकार घडेल, तेव्हां आगरकरांस विशेष वाईट वाटून डोळ्यांस पाणी येईल, व मतभेदामुळें उत्पन्न झालेल्या वैराचा एका क्षणांत विसर पडून एक दुसऱ्याला मदत करण्यास सहज प्रवृत्त होईल!" याचा साक्षात्कार खुद्द आगरकरांच्या मृत्यूच्या वेळेसच घडून आला.

आगरकरांचा मृत्युलेख केसरींत लिहिण्यास टिळकांना चार तास लागले. आपल्या मित्राच्या एकेक जुन्या आठवणी होऊन त्यांच्या मनांत प्रेमाचे उमाळ्यामागून उमाळे येत गेले. उपरण्यानें आपले डोळे पुसत पुसतच टिळकांनीं हा मृत्युलेख लिहिला. त्यांत ते म्हणतात, "मृत्यूचें स्वरूप इतकें उग्र व भयंकर आहे कीं, त्यामुळें बारीकसारीक गोष्टी विसरून जाऊन, प्रथमतः दृढनिश्चयानें त्यांनीं व आम्हीं कांहीं विशिष्ट लोकोपयोगी कार्यें करण्याचें मनांत आणलें व त्यानंतर तीं कार्यें सिद्धीस नेण्याकरितां एकदिलानें घरीं, दारीं, कारागृहीं जे व्रत व उद्योग केले, त्यांचें तीव्र स्मरण पुनः पुनः जागृत होऊन आमची बुद्धि व लेखणी गोंधळून जाते!" आगरकरांच्या अंगांतील लोकोत्तर गुणांचा गौरव टिळकांनीं या लेखांत खुल्या दिलानें केला आहे. अखेरपर्यंत समविचारी व सहकारी असलेल्या गोपाळराव गोखल्यांनीं तर २४ जूनच्या "सुधारकां"त इंग्रजी अग्रलेखांत असें लिहिलें कीं, "त्यांच्या मृत्यूनें पुणें किंवा महाराष्ट्र यांनाच नव्हे तर सर्व देशाला दैन्य आलें आहे. जन्मतःच मोठेपणा मिळणें हें एक मोठें भाग्य आहे. परंतु मोठेपणा संपादन करणें हें भाग्य त्याहून थोर होय." आगरकरांचे कागदपत्र चाळतांना गोखल्यांना एक पुरचुंडी मिळाली. तिच्यांत कांहीं रुपये होते. आणि वर लिहिलें होतें, "माझ्या प्रेतदहनार्थ!" ती चिठ्ठी वाचून गोखल्यांना रडूं कोसळलें.

आगरकरांच्या निधनानिमित्त त्यांच्या कुटुंबाला व सोसायटीला सहानु-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भूतीचे संदेश मुंबईचे गव्हर्नर, कोल्हापूरचे छत्रपति, इंदूरचे महाराज, न्या. रानडे, प्रिं. सेल्बी, दिनशा वाच्छा वगैरे 'थोरांमोठ्यांकडून आले. आपल्या महाराष्ट्रांतील एक स्वावलंबी विद्यार्थी, वत्सल शिक्षक, मराठीचा सेवेकरी, सत्याचा निष्ठावंत उपासक, स्त्रीजातीचा कैवारी, अस्पृश्यांचा उद्धारक, न्याय व समता यांचा प्रसारक आणि सामाजिक सुधारणांची गंगा वाहविणारा भगीरथ दृश्याच्या पडद्यांमागें अवघ्या एकूण-चाळीसाव्या वर्षी निघून गेला, म्हणून महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांतून दुःखाचे लाखों मूक संदेश किती तरी काळ निघत होते.

● ● ●

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वभावाचे पैलू : : ८

" अहो, आगरकर कोठें आहेत ? "

" कां ? आपलें त्यांचेशीं काय काम आहे ? "

" काम कांहीं विशेष नाहीं. पण त्यांची कीर्ति सारखी ऐकतों आहे. तेव्हां म्हटलं त्यांना समक्ष पहावं एकदां. "

" असं होय ? तर मग मीच तो आगरकर. "

" उगीच कां माझी अशी थट्टा करितां ? ते " सुधारका "चे संपादक आगरकर कोठें आहेत, तें मला सांगा. "

" मी आपली थट्टा करीत नाहीं. मीच तो " सुधारका "चा संपादक आगरकर. "

पृच्छकानें आगरकरांना आपादमस्तक न्याहाळून पाहिलें. अंगांत धाबळीची बाराबंदी घातलेली, डोक्याला पंचा गुंडाळलेला आणि हातांत चिलीम धरलेली—अशा जुन्यापुराण्या खेडवळ म्हाताऱ्याला शोभणाऱ्या पोषाखांत नवे विचार, नवीं मतें, नवीं तत्त्वें आग्रहानें व जोरजोरानें सांगणारे आगरकर आपल्याला दिसतील असें भविष्य त्या गृहस्थाला कोणीं सांगितलें असतें तर त्यावर त्याचा काडीमात्र विश्वास बसला नसता. पण आतां साक्षात् पुरावाच त्याच्या उघड्या डोळ्यांना दिसत होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फर्ग्यूसन कॉलेजच्या आवारांतील आपल्या घराच्या एका लहानशा खोलींत आगरकर बसले होते. सकाळची वेळ असल्यामुळें ते पंचा नेसले होते. वारा लागूं नये म्हणून दुसरा एक पंचा त्यांनीं डोकीस गुंडाळला होता. दम्याची व्यथा असल्यामुळें वैद्यांनीं सांगितलेली औषधी मिसळून ते चिलमींतून तंबाखू ओढीत होते. उंच शरीरयष्टि, मध्यमपणें भरदार छाती, विशाल मिशांचा लांबट चेहरा, किंचित् खोलगट अशा बारीक डोळ्यांच्या-मधील नकटें नाक, एकबोटी तिरपें गंध असलेलें रुंद कपाळ, डोक्यावर बहुशः काळी पगडी, अंगांत बनातीचा हरदासी पद्धतीचा अंगरखा, त्या-वरून उजव्या खाकेंतून आणि डाव्या खांद्यावरून घेतलेलें उपरणें, असें बाह्यस्वरूप 'सुधारकाच्या' संपादकाचे असेल असें कोणास वाटेल? त्या अव्वल इंग्रजीशाहींत चार बुकें शिकलेल्या तरुणाला स्वर्ग दोन बोटें उरत असे आणि स्वर्गांतल्या देवाप्रमाणें तो मानवापासून निराळा व उच्च रहात असे. बोलणें काय, लिहिणें काय, वागणें काय, थेट साहेबासारखें. बोलायचें तें इंग्रजींत, वाचायचीं तींहि इंग्रजी पत्रें व पुस्तकें, हंसायचें तेंसुद्धां साहेबाप्रमाणें तोंडाला रुमाल लावून खुदुखुदूं! पोषाख तर सुटा-बुटाचाच! कोठलें गंध अन् कोठल्या मिशा! 'हा इंग्रजच आहे, भारतीय नव्हे' अशा अपन्हुति अलंकाराचें चालतेंबोलतें उदाहरणच आगरकरांच्या ठायीं आपल्याला पहावयास सांपडेल अशा अपेक्षेनें तो पृच्छक आगरकराकडे गेला होता. 'स्त्रियांनीं जाकीटें घालावींत, जोडे घालावेत' असें सांगणाऱ्या माणसाच्या अंगावर कोट, पाटलोण व नेकटाय-स्टॉकिंग्ज न दिसल्यामुळें त्या बिचाऱ्याचा केवढा दारुण अपेक्षाभंग झाला! पण त्यांतच आगर-करांचें स्वत्व आहे.

'मूळ प्रकृति म्हणजे भारतीय आर्यत्व न सोडण्याचा' त्यांनीं जसा प्रचार केला तसा त्यांनीं आचारहि ठेवला. ब्रँडी वगैरे 'डयंत' वस्तूंत सुधारणा सांठवलेली नाहीं असें त्यांनीं स्पष्ट म्हटलें होतेंच. सुधारक

८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणजे चैनी, विलासी व इंग्रजांचा अंधानुयायी ही कल्पना त्यांच्या चित्तास कधींच स्पर्श करूं शकली नाहीं. त्यांचा भौतिकवाद म्हणजे स्वार्थी भोगवाद नव्हता. मनुष्याच्या कर्तृत्वाला व त्यागाला मनुष्यतेच्या सुखवर्धनासाठीं त्यांनीं आव्हान दिलेलें होतें. नास्तिक तरुण नैतिक वर्तनाचे नसतात असा आरोप न्या. रानडे यांनीं डेक्कन कॉलेजच्या एका समारंभप्रसंगीं केला असतांना त्याचा खडखडीत इनकार आगरकर, टिळक, महाजनी प्रभृतींनीं केला. 'खाना पिना और मजा करना' हें कांहीं सुधारणावादाचे ब्रीदवाक्य नव्हे. आगरकरांची सर्वच रहाणी अगदीं साधी असे. आयुष्याचा पूर्वार्ध गरिबींत गेला असला तरी उत्तरार्धांत त्यांना नव्या नोकाझोकानें रहातां आलें असतें. पण ते एखाद्या ऋषीप्रमाणें साधे-पणानें राहून लेखणीनें व वाणीनें प्रौढांस व मुलांस विद्यादान करीत होते. 'साधी राहणी व उच्च विचारसरणी' या उदात्त तत्त्वाचे अनेक पुतळे महाराष्ट्रांत निर्माण झाले आहेत त्यामध्यें आगरकरांचें स्थान वरचें आहे. फर्ग्यूसन कॉलेजचा प्रिंसिपल, मुंबई विद्यापीठाचा फेलो आणि 'सुधारक' पत्राचा संपादक अशा उच्च स्थानावर असूनहि आगरकर आमरण साधेपणानेंच राहिले. त्यांच्या साधेपणाची एक आठवण त्यांच्या सहधर्म-चारिणीनें दिली आहे. यशोदाबाई सांगतात :-

"मुंबईला कामानिमित्त यांचें वारंवार जाणेंयेणें घडे. एकदां काय वाटलें कुणास ठाऊक. ते मला म्हणाले, 'चल तुला मुंबई दाखवितों.' मला बरोबर घेऊन मुंबईला गेले, तेव्हां तिथें कॉंग्रेसचें अधिवेशन होतें. अर्थात् मला एकदम मुंबईला आलेली पाहून तेथील माहितीची सर्व मंडळी आश्चर्यचकित झाली! मला आपल्या भावाकडे म्हणजे माझ्या दीराकडे सोडून आपण राष्ट्रीय सभेच्या मंडपाकडे ते निघून गेले. अर्थात् मला भाऊजींनींच सर्व मुंबई दाखविली. मला बरोबर घेऊन ते स्वतः कांहीं मुंबईभर हिंडले नाहींत. मला जेव्हां यांनीं भाऊजींच्याकडे पोंचवलें,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

तेव्हां चाळींतील सर्व लोक डोकावून सुधारक आगरकर म्हणून यांच्याकडे पहात होते. हे बाहेर गेल्यानंतर ती मंडळी आपापसांत विनोदानें म्हणत, "हेच कां ते सुधारक ? यांच्या तर पागोट्याचे बंद गळ्यांत लोंबताहेत ! त्या वेळीं हल्लींप्रमाणें टोप्यांचा प्रघात नव्हता. रुमाल बांधण्याची पद्धत मात्र होती. यांचें एक भलेंमोठें पागोटें असे. तें पाहूनच या मंडळींनीं चेष्टा केली ! पुढें पुढें ते पगडी घालीत. पगडी अगदीं शेवटीं शेवटीं व फक्त कॉलेजला जातांना तेवढी वापरीत. नेहमीं पागोटेंच !"

दारिद्र्य व दमा या दोन दुर्धर दुष्मनांना सतत तोंड देण्यांत आगरकरांची शक्ति व उत्साह खर्च होत असे. तरी त्यांच्या वृत्तींतील आनंद आणि भाषेंतील विनोद कधींहि आटला नाहीं. 'हास्यविनोद म्हणजे अतिरिक्त उत्साहाला आलेला फेंस' असें मानलें जातें. आगरकरांचा उत्साह मरेपर्यंत कमी झाला नाहीं, वाढतच गेला. ते आपल्या रोगाचाहि राग न धरतां त्याचें वर्णन विनोदानें करीत. एकदां ते म्हणाले, "या दम्यासाठीं इतकीं औषधें माझ्या पोटांत गेलीं आहेत कीं, मी मेल्यावर जर माझें पोट एकाद्या वैद्यानें ठेवून दिलें तर त्याच्या हातांत एक दवाखानाच आल्यासारखें होईल." "माझा कोटा म्हणजे सर्व रसायनांचा अर्क आहे." असेंहि ते एकदां म्हणाले. तसेंच "माझ्या पावशेर मिशा मला फिल्टरसारख्या उपयोगी पडतात." असेंहि ते म्हणत. याहीपेक्षां त्यांच्या विनोदाची लकेर त्यांच्या लेखांतून वारंवार ऐकूं येते. "सुधारक-बोवा", "तेलीबोवा" यांना उद्देशून त्यांनीं मोठा विनोद निर्माण केला आहे. आकाशांतील शनीची शास्त्रीय माहिती देण्यासाठीं त्यांनीं एक विस्तृत लेख लिहिला, पण त्याला चटकदार प्रारंभ जोडला. "हे सूर्यतनया, ग्रहश्रेष्ठा, शनीश्वरा" अशा संबोधनांनीं आळवून "शनि-महात्म्याची कथा" मिस्कीलपणानें आगरकरांनीं सांगितली आहे. एवढेंच नव्हे तर 'कवितादेवीच्या करांगुलीचाहि स्पर्श' नसलेल्या आगरकरांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विनोदबुद्धींतून शनिदेवाची आधुनिक आरती बाहेर पडली आहे. ती त्यांच्या विनोदाचा एक नमुना म्हणून वाचण्यासारखी आहे. ती आरती अशी :—

जय देव जय देव जय शनिराया ॥
अज मज झाली बुद्धि तुजला वर्णाया ॥ जय ॥
भाविक शास्त्रज्ञांसि संमत अशि गाथा ॥
गाउनि चित्ताकर्षी केली तव कथा ॥
यास्तव प्रसन्न होउनि 'वर माग आतां' ॥
ऐसें म्हणशील तरी दे हें तत्त्वतां ॥ जय ॥
जे न 'सुधारका' पढतील त्यांसी ॥
त्याची वा किंमत न देती त्यांसी ॥
राशीस येऊनी छळावें गा देवा!"
वद नाहीं नामी कां पत्र हें राया ॥ जय ॥
येथें बारा आणे मुंबापुरी रुपया ॥
फक्त दीड रुपया दुसऱ्या गांवीया ॥
बंगींत मागतां पोष्टेजासकट ॥
फक्त अठरा आणे, हें कां संकट ? ॥ जय ॥
वाचुनि यातें जोडी तो तत्त्वज्ञानाला ॥
संतती, संपत्ती सद्‌गति दे त्याला ॥
तैसेंच, यांतील विचार ज्या मान्य ॥
त्या महाराष्ट्रीयां दे दे सुखदान ॥ जय ॥

क्षोभकारक लेख लिहिणारे आगरकर स्वभावानें फार शांत होते, हा विरोधाभास लक्षांत ठेवण्यासारखा आहे. शांतिब्रह्म न्या. रानडे यांचें उदाहरण त्यांचे डोळ्यांपुढें होतेंच. आणि त्यांना पक्कें ठाऊक होतें कीं, जगाच्या इतिहासांत सुधारणा केव्हांहि मुंगीच्या पावलांनींच होत असते. आपल्या अपेक्षेप्रमाणें समाज आपण सांगतों त्या दिशेनें जलदीनें पावलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टाकत नाहीं म्हणून रागावण्याचा उपयोग काय आहे ? मिशनऱ्याची शांति मनांत बाळगूनच समाजाला सुधारलें पाहिजे हें तत्त्व आगरकरांच्या रोमरोमांत भिनलेलें होतें. लहानमोठ्या, खाजगी–सार्वजनिक अशा कोणत्याहि प्रसंगीं त्यांची शांति सहसा ढळत नसे. एकदां त्यांची आई मृत्युशय्येवर असल्याचें त्यांना कळलें. त्यांनीं कराडला जाण्याचें ठरविलें. पुणें स्टेशनावर जाण्यासाठीं त्यांना टांगा हवा होता. कॉलेजचा शिपाई कोंडिबा याला त्यांनीं टांगा आणण्यास सांगितलें. कोंडिबानें इतका उशीर केला कीं, आगरकर स्टेशनवर गेले तेव्हां गाडी निघून गेलेली होती. त्यामुळें त्यांची आईची भेट होऊं शकली नाहीं. कराडहून परत आल्यावर त्यांनीं कोंडिबास फक्त एक रुपया दंड केला. पण पुढें तोहि माफ केला. आईच्या निधनानंतर क्षौर करण्यास आगरकरांनीं नकार दिला व तत्काळ ते पुण्यास परत आले. बाराव्या दिवशीं दोन पायलींचा भात शिजवून शेंसवाशें मधुकऱ्यांना एकेक मूद व एक पैसा यांचें दान मात्र त्यांनीं केलें.

सार्वजनिक जीवनांत रागावण्याचे प्रसंग घडोघडी आले. "आगरकर हे खास :ब्राह्मणबीजाचें नाहींत." असा शिवराळ आरोप करून "
"पुणें वैभव" पत्रानें आपल्या मनोवैभवाचें प्रदर्शन केलें ! तेव्हां आगरकरांना त्यांचे स्नेही म्हणाले, "खेचा या नरपशूला कोर्टात." पण आगरकरांची शांति अथांग व अढळ. ते एवढेंच म्हणाले, "पुणें वैभवकाराचा माझ्याशीं व्यक्तिदृष्ट्या कोणताहि हेवादावा नाहीं...हा पत्रकर्ता ज्या परिस्थितींत लहानाचा मोठा झाला, त्याच परिस्थतींत दुर्दैवानें मला काळ कंठावा लागला असता व शिक्षणानें मनावर होणाऱ्या सुसंस्कारांना मला पारखें व्हावें लागलें असतें, तर मला वाटतें कीं, या बाबतींत कदाचित् त्याच्यावरहि मीं ताण केली असती. तेव्हां अशा मनःस्थितीबद्दल त्याची कींव करून सहिष्णुता धारण करण्यानेंच परिणामीं सुधारणापक्ष विजयी होण्याचा जसा संभव आहे, तसा कायद्याचा धाक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दाखवून त्यांचीं तोंडें बंद करूं पाहण्यानें नाहीं. " पुढें पुणें वैभवकारांनीं जाहीर दिलगिरी प्रदर्शित केली.

ही नुसती शाब्दिक चकमक झाली. पण प्रत्यक्ष मारहाण झाली तरी आगरकरांची शांतता त्यांच्या मनाला सोडून गेली नाहीं. संमतिवयाचें बिल मि. स्कोबल यांनीं कौन्सिलांत आणलें होतें तेव्हां "आमच्या धर्मांत इंग्रजांचा कायदा शिरावयास नको." म्हणून साऱ्या देशभर विरोधाचें वादळ उठलें. सर रमेशचंद्र यांसारख्या विद्वानानेंहि त्या बिलास विरोध केला. पुण्यांतलि मठ, आश्रम व देवळें यांना तर धरणीकंपाचे धक्के बसले. विरोधाच्या सभांचें एकसारखे गडगडाट होऊं लागले. क्रीडा-भुवनांत तर टिकेचा प्रत्यक्ष वर्षावच झाला. तेथें सुधारकांची सभा भरली होती. शेपाऊणशें श्रोते हजर होते. त्या सभेची धूळधाण कर-ण्याचा चंग बांधून आलेले कांहीं पुराणमताभिमानी वीर शेणाचे गोळे, विटांचे तुकडे वगैरे आयुधांनिशीं शेजारच्या कौलावर मोर्चे लावून बसले होते खालीं सभा सुरू होतांच बाजीच्या व तानाजीच्या धैर्यानें व आवेशानें त्यांनीं " हर हर महादेव " केला आणि आपल्या आयुधांचा माराहि सुरू केला. त्यांत आगरकरांना थोडी दुखापतहि झाली. तरी त्या वीरांच्या पराक्रमाबद्दल आगरकरांनीं असें लिहिलें कीं, "शाबास! वीरांनो शाबास!! तुम्हीं केवळ चालतींबोलतीं प्रेतें आहां, असें मला वाटत होतें; पण तुमच्या या आजच्या सज्जतेवरून तुम्हांला मन आहे, तुम्हांला राग-द्वेषादि मनोविकार आहेत हें उत्तम प्रकारें सिद्ध होतें. आणि आतां आमच्या या हतभागी देशाचा अभ्युदयकाळ फार दूर नाहीं, अशी मला आशा वाटूं लागते."

सुधारकाचे अंक अंथरलेली आपली स्वतःची प्रेतयात्रा रस्त्यावरून गुंडाळून नेली जात असतांना ती आगरकर माडीवरून शांतपणें पाहात होते. यापेक्षां त्यांच्या मनःशांतीचा पुरावा दुसरा कोणता हवा?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

अध्यात्मचिंतनानें मनाला प्राप्त होणारा प्रसाद केवळ कर्तव्यनिष्ठेच्या निःस्वार्थी उपासनेंतून त्यांना मिळाला होता काय ?

बाणेदारपणा हें तर आगरकरांचें जीवित-सूत्रच ! प्रसंगविशेषीं त्याला स्वाभिमान, स्वदेशाभिमान, तत्वनिष्ठा अशीं निरनिराळीं नांवें मिळालीं. पण अगदीं लहानपणापासून मरेपर्यंत बाणेदारपणा हा त्यांच्या आयुष्याचा कणा होता. गरिबीनें त्यांच्या शिक्षणाचें फाटक बंद केलें असतांना तें त्यांनीं अनेकवार मोडून तोडून टाकलें. १८७२ सालीं प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांचे आप्त त्यांना म्हणाले, "कॉलेजचा नाद सोडून द्या." तेव्हां गोपाळरावांनीं ठाम उत्तर दिलें, "मी डिग्री घेतल्यावांचून राहणार नाहीं." डिग्री घेतली. नंतर प्रश्न आला व्यवसायाचा. गोपाळरावांचे संतापी मामा रामभाऊ यांनीं सबजज्ज होण्यास सांगितलें. पण त्यांनाहि गोपाळरावांनीं जाब दिला. "मी शिक्षकच होणार." एक दिवस अकोल्याच्या शाळेंत असतांना घरच्या कामामुळें गोपाळरावांना वर्गांत जाण्यास उशीर झाला. तेव्हां त्यांचेवर कृपाछत्र धरणारे गुरुजी विष्णुपंत महाजनी चेष्टेनें म्हणाले, "तुमचा काय अभ्यास होणार ! तुम्हीं असेंच रखडत पडणार." गुरुगौरवार्थहि आगरकर गप्प न बसतां ताडकन म्हणाले, "मी आपल्यासारखा एम्. ए. झालों तरच नांवाचा आगरकर !" पुढें केशवसुतांच्या स्वाभिमानी वृत्तीला त्यांच्या शिक्षकांनीं असेंच छेडल्यानंतर आपल्या "दुर्मुखलेल्या मुखांतुनि" काव्यजलौघ वाहणार असल्याची आत्मविश्वासपूर्वक ग्वाही दिल्याचें प्रसिद्धच आहे. गुरूचा बाणेदारपणाहि शिष्यानें उचलला !

गोपाळरावांना लहानपणापासून नाटकाचा षोक. एकदां एक मित्र त्यांना म्हणाला, "चला आपण नाटक पाहायला जाऊं." गोपाळरावांनीं उत्तर दिलें, "मजजवळ पैसे नाहींत. "मी देतों" असें मित्रानें म्हणतांच गोपाळरावांच्या मानी मनानें गर्जना केली. "दुसऱ्यांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पैशावर मी मजा मारणार नाहीं." कॉलेजांत फी भरण्याला पैसे नव्हते तेव्हां कोणाजवळ याचना करण्याऐवजीं आगरकरांनीं नाटक लिहिण्यास घेतलें. आणि त्यांतून पैसे काढण्याचें ठरविलें. पुढें "डोंगरीच्या राजगृहांत" सरकारचा पाहुणचार घेत असतांनाहि त्यांनीं हॅम्लेटचें मराठी भाषांतर केलें. खटल्यामुळें केसरीला झालेलें कर्ज आपण आपल्या मनगटाच्या बळावर फेडावें हा त्यांतील हेतु.

आगरकरांच्या मातुःश्री वारल्या, त्या वेळीं ते कऱ्हाडास गेले होते. तेव्हां भाऊसाहेबांनीं "क्षौरविधि करा" म्हणून सांगितलें. आगरकरांनीं उत्तर दिलें, "हा वेडगळ विधि मी करणार नाहीं." भाऊसाहेब संतापून म्हणाले, "तर मग चालता हो." गोपाळराव मुकाट्यानें उठले आणि कऱ्हाडहून रातोरात पुण्यास निघून गेले.

सिंहीण आपल्या पिलांवर गुरगुरत असेल, त्यांच्यावर रागानें पंजे मारीत असेल, किंबहुना दांतानें चावेहि घेत असेल, पण तीं पिलेंच हिरावून नेण्यासाठीं हात कोणी पुढें केला, तर मात्र त्या पिलांना पोटाशीं घेऊन तो हात रक्तबंबाळ करण्यास सिंहीण सिद्ध व समर्थ असते. तशीच वृत्ति आगरकरांची होती. आपल्या समाजांतील दोष दूर करण्यासाठीं आपलेपणानें व प्रेमानें ते समाजाच्या पाठीवर कोरड्यांमागून कोरडे ओढीत होते. पण म्हणून इंग्रज सरकारनें त्या समाजावर कांहीं अन्याय केले तर त्यांची गय ते करीत असें मात्र नाहीं. उलट दुसऱ्या कोणाहिपेक्षां ते आपल्या देशाचा, त्यांतील कलांचा, संस्कृतींचा जोरानें कैवार घेऊन कडाडून हल्ले चढवीत. मद्रासच्या "नॅशनल रिव्ह्यू" मासिकांत ॲशबर्नरसाहेबानें भारतीय विधवांबद्दल अत्यंत कुत्सित व अपमानकारक विधान केलें. सक्तीच्या वैधव्याविरुद्ध जळफळून लिहिणारे व विधवांच्या केशवपनावर दांतओंठ खाऊन तुटून पडणारे, किंबहुना क्वचित् होणाऱ्या त्यांच्या पदस्खलनाचाहि निर्देश करणारे आगरकर या ॲशबर्नरसाहेबाला खडसावून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सांगतात, " तुमच्या मडमांनीं आमच्या स्त्रियांचें तीर्थ घेऊन त्या पापापासून मुक्त व्हावें इतक्या त्या: पवित्र आहेत, असें म्हणण्यास आम्हीं कधींहि सोडणार नाहीं ! हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या पातिव्रत्याइतकें शुद्ध पातिव्रत्य बहुधा दुसऱ्या कोणत्याहि देशांत सांपडणार नाहीं."

इंदूरच्या महाराजांनीं देऊं केलेली पांचशें रुपयांची नोकरी नाकारण्यांत व त्यांनीं प्रत्यक्ष दिलेली चारशें रुपयांची देणगी मत्सरानें ग्रासलेली पाहतांच ती सोसायटीला अर्पण करण्यांत, स्वतःच्या प्रेतसंस्काराचा भार मित्रांवर पडूं नये म्हणून २० रुपयांची पुरचुंडी बांधून ठेवण्यांत—एक ना दोन, शेकडों लहान-मोठ्या प्रसंगीं आगरकरांची बाणेदार व स्वाभिमानी वृत्ति उसळून आल्याशिवाय राहात नसे: आणि तीच त्यांच्या अंतःकरणांतील दिव्यत्वाची ज्योत होती.

या करड्या बाणेदारपणाचा वृक्ष त्यांच्या प्रेमळ वृत्तींतूनच वाढला होता हें विशेष ! त्यांची भाषा जितकी कडक तितकेंच त्यांचें मन कोमल. न्यू इंग्लिश स्कूलचे सुपरिंटेंडेंट असतांना ते एकदां निरनिराळ्या वर्गावर देखरेख करीत होते. एका वर्गांत एक शिक्षक जे शिकवीत होते तें चुकीचें आहे असें आगरकरांना आढळलें. त्यांनीं वर्गांत जाऊन शिक्षकाची चूक दुरुस्त केली. पण मागाहून त्यांच्या मनांत आले कीं, यामुळें आपल्या हातून त्या शिक्षकाचा विद्यार्थ्यांसमोर पाणउतारा झाला. लगेच त्यांनीं त्या शिक्षकाची क्षमा मागितली. प्रत्यक्ष आपल्या मुलाची क्षमा मागणारा महात्मा हिंदवासीयांस पुढें दिसला. गरीब विद्यार्थ्यांबद्दल तर त्यांना साहजिकच कळवळा येई. त्या तापत्या वाळवंटावरून चालत जातांना पायाला किती तीव्र चटके बसतात आणि कपाळावरून घामाच्या धारा कशा वाहात असतात याचा साक्षात्कारच त्यांना घडलेला होता ना ! त्यामुळें त्यांनीं (पुढें सेवासदन स्थापणाऱ्या) गोपाळराव देवधरांना नादारी दिली, एवढेंच नव्हे तर कांहीं पुस्तकेंहि दिलीं. आगरकर, गोखले व देवधर या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घराण्यांतील तिन्ही गोपाळरावांना गरिबीनें गांजले असलें तरी त्यांनीं तिच्या अपकाराची फेड समाजाची सेवा करूनच केली. आगरकरांच्या शिष्य-वात्सल्यासंबंधींचा एक प्रसंग विशेष लक्षांत ठेवण्यासारखा आहे. आगरकर हे जितके नितांत सुधारक तितकेच निस्सीम ईश्वरभक्त असलेले पांगारकर हे त्यांचे शिष्य होते. तेहि गरीबच होते. नादारीच्या पांगुळगाड्यावरच ते शिक्षणाची वाटचाल करीत होते. एके वर्षी त्यांना परीक्षेंत अपयश आलें. तेव्हां त्यांची नादारी बंद करण्याची सूचना आली. पण "तो देशभक्त आहे, उत्साही आहे" असें म्हणून पांगारकरांस आगरकरांनीं नादारी दिली. "आगरकरांशीं मुलें थोरल्या भावाप्रमाणेंच बोलत" अशी साक्ष एका विद्यार्थ्यानें दिली आहे.

'सीझरच्या पत्नीचें चारित्र्य संशयातीत असावें' अशी इंग्रजी म्हण आहे. तसेंच पुढाऱ्यांच्या वागणुकीचेंहि आहे. त्यांच्या भक्तांचें अनुकरणासाठीं व विरोधकांचें छिद्रान्वेषणासाठीं त्यावर सतत सूक्ष्म लक्ष असतें. त्यांतहि नव्या पंथाच्या, नव्या विचारांच्या नेत्यांनीं फारच शुद्ध असलें पाहिजे. परीटघडीच्या कपड्यावर बारीकसाहि डाग उठून दिसतो व डोळ्यांवर येतो. आगरकरांचें चारित्र्य टिळकांप्रमाणेंच सर्वथैव निष्कलंक होतें. तांबे यांचे वाड्यांत आगरकर पुण्यास राहात असतां त्यांच्याकडे एकदां चोरी झाली. सिटी पोलीस इन्स्पेक्टर मि. स्मिथ यांनीं चौकशी केली, पण पत्ता नाहीं. तेव्हां चोरीस गेलेल्या मालांपैकीं १५० रु.चा माल आगरकरांचे स्नेही रा. सा. मेहेंदळे एंजिनीअर यांचा असल्यामुळें, ठेवीचा रक्षक या नात्यानें आपल्या नैतिक जबाबदारीसाठीं, आगरकरांनीं मेहेंदळ्यास त्याची भरपाई केली.

आगरकरांच्या स्वभावाचे असे निरनिराळे पैलू इतके तेजस्वी व रमणीय आहेत कीं, त्यामुळें त्यांच्याशीं मतभेद बाळगणाऱ्या माणसाचीहि दृष्टि दिपून जाते व मान त्यांच्यापुढें आदरानें लवते.

• • •

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोठेपणाचें मोजमाप : : ९

" विचारानें क्षुद्रबुद्धि निरस्त होऊन मन विस्तृत झालें, आणि 'वसुधैव कुटुंबकम्' अशी वृत्ति त्यांत उत्पन्न झाली म्हणजे जो आनंद होतो तो कांहीं अनिर्वाच्य असतो. "—आगरकर.

आगरकरांचें मोठेपण कशांत होतें ?

गरिबींतून डोकें वर काढण्यांत ? अडचणींतून विद्येचा पैलतीर गांठण्यांत ? कॉलेजचे प्रिंसिपल होण्यांत ? कीं, 'सुधारक' पत्र काढून ते यशस्वी करून दाखविण्यांत ?

" आगरकरांची योग्यता एम्. ए. होण्यांत नाहीं, ग्रंथ-वाचनांत नाहीं, महाराष्ट्र-लेखनपटुत्वांत नाहीं आणि 'सुधारक' पत्र चालविलें यांतहि नाहीं. " असें उत्तर लो. टिळकांनीं १९१६ सालच्या आगरकरांच्या श्राद्धतिथीस उद्देशून केसरींत दिलें आहे. " केवळ सुधारणेसाठीं गोपाळरावांस सत्पुरुषांच्या मालेंत गोंवण्यास तयार झालेले लोक कोत्या बुद्धीचे आणि एककल्ली होत " असें मतहि त्यांनीं मांडलें आहे. " त्यांस सगळा आगरकर नको होता, किंबहुना तो त्यांच्या पचनींहि पडला नसता. " ही लोकमान्यांची मीमांसा आगरकरांचें अष्टपैलु मोठेपण दाखविणारीच आहे. हें त्यांचें मोठेपण कशांत होतें ? याचें उत्तर देतांना लोकमान्य लिहितात : " परिस्थितीचा गुलाम न बनतां परिस्थितीला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यथासंभव, यथाशक्ति व यावच्छक्य आपल्या ताब्यांत आणण्यास जो मनोनिग्रह, स्वार्थत्याग, निर्लोभीपणा आणि धैर्य लागतें तें ज्याच्या अंगांत आहे; आणि दुःखाची अथवा संकटांची भीति अगर पर्वा न बाळगतां जो आपल्या ठायीं असणाऱ्या या सद्‌गुणांचा लोकोपयोगार्थ उपयोग करतो तोच मोठा म्हणावयाचा. गोपाळराव आगरकर हे या कोटींतले होते."

मनुष्यतेचें ऐहिक सुख-वर्धन हा आगरकरांच्या ध्येयाचा ध्रुवतारा होय. त्यांच्या सुधारणावादाचीं मुख्य चार तत्त्वें म्हणजे बुद्धिवाद, समाजाची गतिमानता, व्यक्तिस्वातंत्र्य व समता. जुन्या ऋषींना समाजासाठीं विधि-निषेध सांगण्याचा जितका अधिकार होता तितकाच आम्हांलाहि आहे, असा आगरकरांचा दावा. वेद अपौरुषेय आहेत, चातुर्वर्ण्य ईश्वरनिर्मित आहे आणि म्हणून समाज बदलला तरी त्याच्या जीर्ण आचारांत बदल करावयास नको. समाजाच्या जीवनाचा प्रवाह पोथ्या, पुराणांच्या तटां-तूनच वाहिला पाहिजे या समजुतीमध्यें ज्यांचीं मनें बुडालेलीं होतीं त्यांना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जाणीव करून देऊन स्वातंत्र्याचें व समतेचें नवीन तत्त्व पटवून आपल्या बुद्धीस पटेल तसेंच वागा आणि परिस्थितीस योग्य असे फेरफार समाजस्थितींत करा, असा नवा क्रांतिकारक मंत्र आगरकरांनीं हिंदुसमाजाला कंठशोष करून सांगितला. इतर आंग्ल शिक्षिताप्रमाणें ते द्रव्यार्जनाच्या मागें लागले नाहींत, तर त्यागी जीव-नाची पर्णकुटी बांधूनच त्यांनीं सारा जन्म कंठला. इतर सुधारकांप्रमाणें त्यांनीं पाश्चात्य विलासांचा अनुभव घेतला नाहीं, तर संन्याशाच्या साधे-पणानें सारे जीवन व्यतीत केलें. अन्य नास्तिकांप्रमाणें सत्याला सोडचिठ्ठी देऊन व नीतिनिर्बंधनांना धाब्यावर बसवून स्वेच्छाचारी वर्तन करणारे आगरकर नव्हते. ईश्वरनिष्ठ माणसालाहि मागें सारण्याइतकी सत्यनिष्ठा, नीतिशीलता व निर्भयता आगरकरांच्या समग्र जीवनांत ओतप्रोत भरून राहिलेलें आहे. त्यांच्या वैयक्तिक वर्तनांत साधेपणा, त्याग, सत्य व सेवा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हे जसे चार ठळक गुण दिसून येतात तसे त्यांच्या सार्वजनिक तत्त्वज्ञानांत बुद्धिवाद, परिवर्तनशीलता, व्यक्तिस्वातंत्र्य व क्षमता हीं चार नवीं तत्त्वें आढळतात.

आगरकरांच्या वैयाक्तिक तत्त्वांचा विजय हा कीं, त्यांच्या विरोधकांनाहि त्यांच्याबद्दल तेव्हां व आतांहि आदरभाव वाढतच राहिला. किंबहुना आतां राजकीय प्रश्न सुटल्यामुळें सामाजिक प्रश्न सोडविण्याकडेच सर्वांचें लक्ष लागलेलें आहे. आणि ते सोडविण्याच्या कामीं आगरकरी तत्त्वज्ञानांचेंच मार्गदर्शन आवश्यक आहे. त्यांनीं पुरस्कारिलेलें अस्पृश्यता निवारणाचें कार्य गांधीजींनीं तडीस नेलें. म्हणूनच त्यांना अस्पृश्य समाजाला हिंदु समाजांत कायमचें ठेवतां आलें. अस्पृश्यांना वेगळें काढणाऱ्या जाति-निर्णयाला आपल्या प्राणांतिक उपोषणानें गाडून टाकतां आलें. म्हणूनच स्वतंत्र भारताची घटना हिंदुधर्मशास्त्र यांचा नवा पाया डॉ. आंबेड-करांना घालतां आला. याच्या उलट हिंदु व मुसलमान या दोन समाजांत सख्य, सहकारिता व सामरस्य निर्माण करण्याचें प्रयत्न फारसे झालेच नाहींत. आणि त्या दूरीभावांतून व अलगपणांतून पाकिस्तान-सारखें हलाहल बाहेर पडलें. खान–पाणंदीकर विवाहानें महाराष्ट्रांत केवढा हलकल्लोळ उडवून दिला होता. आजमित्तीलाहि हरिजन तरुणाचा मराठा किंवा ब्राह्मण तरूणीशी विवाह होणें ही एक दुर्मिळ व म्हणून अभि-नंदनीय गोष्ट होऊन बसली आहे. घटस्फोट व संततिनियमन या नव्या सुधारणाहि कुजबुजण्याच्या अवस्थेंत आहेत. हिंदुकोड बिलाला तर भल्या भल्या शहाण्यांचाहि विरोध ! वास्तविक गेल्या ५०–६० वर्षांत निर-निराळ्या कायद्यांनीं व न्यायमूर्तींच्या निर्णयांनीं ते बदल हिंदु व्यवहार धर्मांत आधींच होऊन गेलेले आहेत व अंमलांत आलेले आहेत त्या सर्वांचा सुसूत्र समुच्चय हेंच मुख्यतः हिंदुकोडाचें स्वरूप आहे. पण राज-कीय स्वातंत्र्यासाठीं हट्टाहास धरणारे लोक धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देण्याच्या कामीं फेरफार करण्यास कांकू करतात. इतकें कशाला ? साधी कपड्याची गोष्ट घ्या. हवामानाप्रमाणें व थैलीच्या लांबरुंदीप्रमाणें कोणी कोणताहि पोषाख करावा. पण मुंडीचाट सदरा (बुश् शर्ट) घालावा कीं न घालावा याचा ऊहापोह १९५० सालीं वर्तमानपत्रांतून होत आहे. किंबहुना मुंबई टाईम्समधील एका पत्रलेखकानें "बुश् शर्ट असोसिएशन" स्थापन करून तिच्या द्वारें हें सामाजिक "महान्" उत्थान घडवून आणा अशी मोठ्या गंभीरपणें सूचना केली आहे. सामाजिक सुधारण्याच्या बाबतींत समाजाची प्रगति कोल्हापूरच्या अंबाबाई-पुढील नंदीसारखीच असते. तो नंदी वर्षाकांठीं गहूंभर पुढें सरकतो. आणि तिळभर मागें सरकतो ! त्यांतून पदरांत पडेल तेवढी प्रगति ! !

'सुधारक' म्हणून आगरकरांचें नांव महाराष्ट्रांत जितकें चिरकाल टिकेल तितकेंच 'संपादक' म्हणूनहि राहील यांत तिळमात्र शंका नाहीं. "देशी वर्तमानपत्रांस हल्लीं जर कांहीं महत्त्व आलें असलें तर तें बऱ्याच अंशीं ग. रा. आगरकर यांच्या बुद्धिमत्तेचें व मार्मिक लेखांचें फळ होय." हें टिळकांनीं त्यांच्या मृत्युलेखांत केलेलें वर्णन कोणालाहि केव्हांहि मान्य होण्यासारखेंच आहे. कवडीचीहि किफायत नसतांना केसरींत सात वर्षें व सुधारकांत सात वर्षें मिळून चौदा वर्षें सतत आगरकरांनीं संपादकीय लेख सात आठशें तरी लिहिले असावेत. या लेखाशिवाय त्यांनीं केलेली साहित्य-सेवा म्हणजे—

(१) विकारविलसित.
(२) डोंगरीच्या तुरुंगांतील आमचे १०१ दिवस.
(३) वाक्यमीमांसा.

यांपैकीं 'विकार-विलसित' या नाटकाचें थोडेंफार गुणदोषविवेचन पूर्वीच्या एका प्रकरणांत केलें आहे.

'वाक्य-मीमांसा' हें व्याकरणविषयक पुस्तक १८८८ सालीं छापलेलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. त्याचीं पानें १२० असून किंमत ९ आणे आहे. लेखकाचा निर्देश ' तर्कशास्त्राचे प्रोफेसर ' असा केला आहे. बेनच्या व्याकरणग्रंथाला ' बाट पुसत ' आगरकरांनीं हें पुस्तक रचिलें. त्याशिवाय मेसन, गॉरनॉल्ड, व्हिटने, इत्यादि इतर इंग्रज व्याकरणकार व दादोबा पांडुरंग, कृष्णशास्त्री चिपळोणकर, कृष्णशास्त्री गोडबोले वगैरे मराठी व्याकरणकार यांचेंहि साहाय्य घेऊन त्यांनीं आपलें पुस्तक ' होईल तितकें वाचनीय ' केलें आहे.

केसरीपूर्वी मराठी वृत्तपत्रें नव्हतीं असें नाहीं. दर्पण (१८३२), ज्ञानप्रकाश (१८४९), इंदुप्रकाश (१८३२) अशीं पत्रें निघालीं होतीं, पण विषयांची विविधता, लेखनाचा भारदस्तपणा आणि ध्येयवादाची तेजास्विता या गुणांची पेरणी मराठी वर्तमानपत्रांत केसरीनेंच प्रथम सुरू केली. आणि तिचें बहुतांश श्रेय आगरकरांकडे आहे. भाषेची शुद्धता व डौलदारपणा यांचें कैलासलेणें चिपळूणकरांनीं निबंधमालेच्या द्वारें कोरून अमर करून ठेविलें होतेंच. तो वारसा केसरीला मिळाला. आणि सुधारकांच्या भाषेवरहि निबंधमालची छाप पडलेली आढळून येतें. चौदा चौदा ओळींची पल्लेदार वाक्यें, उपमा, रूपकादि अलंकारांची जडणघडण, प्रतिपक्षाची कधीं हुर्येवडीनें तर कधीं प्रहारानें धूळधाण, विनोद, उपरोध इत्यादि " मृदुतीक्ष्ग " साहित्यशस्त्रांचा उपयोग वगैरे निबंध-मालेच्या भाषाविषयक गुणांचा वारसा टिळकांपेक्षां आगरकरांनाच अधिक मिळालेला दिसतो. शास्त्रीबुवांचीं सामाजिक व धार्मिक मतें, नव्या संस्थांचीं व कार्यांची उभारणी आणि लोकसमुदाय पाठीशीं घेऊन पुढें जाण्याची प्रवृत्ति हे गुण टिळकांच्या वांटणीस आलेले दिसतात. शास्त्रीबुवांच्या जिंदगीची वांटणी होऊन साहित्य–रत्नें वगैरे जंगम माल आगरकरांकडे गेला; तर स्वदेश व स्वधर्म यांच्या अभिमानाची स्थावर मिळकत टिळकांना मिळाली, असें म्हटलें तरी फारसें चूक होणार नाहीं. अर्थात् इकडची मालमत्ता तिकडे थोडीफार होणें अपरिहार्य होतें. आगरकरांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लेखनसंप्रदायांत पुढें जसें वामनराव जोशी चमकलेले दिसतात तसें टिळकांच्या वाङ्मयपरंपरेत खाडिलकरांचें नांव झळकतांना आढळतें.

आगरकरांना अवघ्या पंधरा वर्षांच्य नांगरटीनंतर व मेहनतमशागतीनंतर आपल्या कार्याला मोहोर आल्याचें दृश्य पाहतां आलें हें त्यांचें भाग्य होय. ते म्हणतात,

'बालविवाहाचा पगडा बराच कमी झाला आहे; स्त्रीशिक्षणाचा प्रसार झपाट्यानें होत आहे; विधवावपन बरेंच मागें पडत चाललें आहे; शेंपन्नास स्त्री-पुनर्विवाह झाले आहेत, व थोड्या वर्षांत त्यांची संख्या बरीच होऊन त्यांतील अधर्मतेचा व अप्रशस्तपणाचा भाग नाहींसा होऊन अशीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं आहेत. संमतिवयाचा कायदा तर पसार होऊन गेला.'

किल्ल्यांमागून किल्ले सर केल्यानंतर एखादा विजयी सेनापति आपल्या समशेरीच्या टोकानें आपल्या सैनिकांना पुढील मोहिमेचें उद्दिष्ट जसें आत्मविश्वासानें व अभिमानानें दाखवीत असतो तसें आगरकरांनीं पुढील वाक्यांत आपल्या अनुयायांना अंतिम साध्याचें दर्शन घडविलें आहे. "मनुष्यतेचें ऐहिक सुखवर्धन ह्या सार्वत्रिक भावी धर्माची ज्यांनीं दीक्षा घेतली असेल त्यांनीं कोणास न भितां, आपल्या मनास जें शुद्ध, प्रशस्त, व कल्याणप्रद वाटत असेल तें दुसऱ्यांस सांगावें, आणि तदनुसार होईल तेवढें आचरण करावें, हें त्यांस उचित आहे."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar